मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३५०३९/तक्रार क्र. ६४/०१

श्री. प्रदिप एन. कापडिया -- तक्रारदार
पारेख महल, ६ वा मजला,
८०, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

विरुध्द

१ उप सचिव -- उत्तरवादी
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (का.ल.९)
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

---*विवेचन*---

श्रीयुत प्रदिप एन कापडिया यांनी आयोगाकडे दि. १८ सप्टेंबर, २००८ रोजी अशी तक्रार सादर केली आहे की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनहि त्यांना कागदपत्रे मिळाली नाहीत. वरील तक्रारीची सुनावणी दि. १ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलकर्ते व जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यात आले की, तक्रारदारास ४०० ते ५०० पेजेस असलेली संपूर्ण नस्तीतील प्रती देण्यांत आलेल्या आहेत. त्याव्यतिरिक्त संबंधित विषयावर विभागामध्ये इतर कुठचेहि कागदपत्र नाहीत. नस्तीची पाहणी केली असतांना संपूर्ण नोटींग साईडसकट तक्रारदारास सर्व प्रती देण्यांत आलेल्या आहे असे दिसून आले. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार आता त्यांना पर्यायी जमिन देण्याचे काम कोणत्या विभागाकडे आहे असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यांना पर्यायी जमिन देण्याचा कुठलाहि निर्णय झाला नसल्याचे अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस सांगितले.

विभागाकडून संपूर्ण माहिती तक्रारदारांस देण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>*---आदेश---*</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/२९७५९/अपील क्र. ३४१८/०१

श्री. अरुण शिवाजी घाटगे -- अपीलार्थी
१/६, घरकुल निवास, १ ला मजला,
एम.डी. केणी मार्ग, भांडूप (पूर्व), मुंबई ४२.

विरुध्द

१.अपिलीय अधिकारी -- उत्तरवादी
. पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालय,
परि- ९, वांद्रे (पश्चिम) मुंबई
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे (पश्चिम ) मुंबई

*---विवेचन---*

श्री. अरुण शिवाजी घाटगे यांनी आयोगाकडे दि. १३/२/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. विभागातर्फे जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांना त्यांच्या वेतन निश्चितीची थकबाकीबाबत ( दि. १/४/७६ ते ३१/१०/२०००) काय कार्यवाही केली याची माहिती पाहिजे होती. ही माहिती अपीलार्थी यांना देण्यांत आली. पण अपीलार्थींचे समाधान थकबाकी मिळण्यानेच होणार असल्यामुळे त्यांनी

अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. अपीलार्थींनी अपील अर्जामध्ये वेतननिश्चितीच्या थकबाकी मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. सदर बाब ही प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे अपीलार्थी यांना संबंधित प्रादेशिक विभागाकडे पाठपुरावा करावा असे निर्देश देण्यांत आले व अपील निकाली काढण्यात आले.

अपीलार्थीस सद्य:स्थितीची माहिती देण्यांत आलेली आहे व त्यांचे सेवापुस्तक अजूनहि प्राप्त न झ ााल्यामुळे त्यांच्या वेतन निश्चितीचे प्रकरणाबाबत अजूनहि निर्णय घेण्यांत आलेला नाही असे सुनावणीच्या वेळेस सांगण्यांत आले. त्यामुळे सद्य:स्थितीची माहिती जरी देण्यांत आली असली तरी अपीलार्थींच्या तक्रारीचे निवारण होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने त्यांचे सेवापुस्तक मागवून घेवून वरील प्रश्नाची तड लावण्यात येईल असे सुनावणीच्या वेळेला संबंधित अधिका-यांनी सांगितले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/२९७६५/अपील क्र. ३४२०/०१

श्री. एहतेशाम कुतुबुद्दीन सिद्दीकी -- अपीलार्थी
यु.टी.नं. ८२२/०८, २/४, मुंबई सेंट्रल जेल,
आर्थर रोड, मुंबई - ४०० ०११.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (प्रतिबंधक ) -- उत्तरवादी
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई .
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे)
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.

*---विवेचन---*

श्रीयुत एहतेशाम कुतुबुद्दीन सिद्दीकी , मुंबई सेंट्रल जेल, ऑर्थर रोड यांनी आयोगाकडे दि. ५/२/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते, विभागातर्फे जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस दि. ११ जुलै, २००६ रोजी झालेल्या रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणामध्ये अटक केलेल्या आरोपींच्या बाबतीत पोलीस स्टेशन डायरीमधील नोंदी, अपीलार्थींची वैद्यकीय तपासणीचे रिपोर्ट , ATS ने दिलेले प्रेझिटींग वगैरे बाबत माहिती पाहिजे होती.

वरील माहिती ही अपीलार्थीस नाकारण्यात आली. व हाच निर्णय प्रथम अपिलात सुध्दा कायम करण्यात आला. सुनावणीच्या वेळेला विभागातर्फे पुढील निवेदन करण्यात आले.

"१. उपरोक्त आरोपी आ मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट दहशतवाद विरोधी पोलीस ठाणे गु.नों. क्र. ०५/०६ मधील अटक आरोपी असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

२. सदरचा गुन्हा हा विशेष मोक्का न्यायालयात चालविला जात असून त्याचा केस क्रमांक विशेष मोक्का केस क्रमांक २१/०६ असा आहे.

३. सदर गुन्हयात एकूण १३ आरोपी अटक व १५ पाहिजे आरोपी असून श्री. एहतेशाम कुतुबुद्दीन सिद्दीकी हा आरोपी क्रमांक ४ आहे.

४. सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र विशेष मोक्का न्यायालयात दिनांक ३०/११/२००६ रोजी दाखल करण्यात आले असून त्याचा विशेष मोक्का कोर्ट केस क्रमांक २१/०६ असा आहे. दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर ताबडतोब सर्व आरोपीतांना दोषारोपपत्राच्या प्रती तसेच गुन्हयाच्या संदर्भात पुरावा म्हणून दाखल केलेल्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रती मा. न्यायालयाच्या समक्ष आरोपीतांना देण्यांत आलेल्या आहेत.

५. या गुन्हयातील आरोपी क्रमांक ११ नामे जमीन मोहमद लतिफ उर रहेमान शेख याने सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका क्रमांक १५९६२/०७ दाखल केली असता मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त केस चालविण्यास स्थगिती आदेश दिले आहेत.

६. उपरोक्त आरोपीने माहिती अधिकार २००५ अंतर्गत माहिती मागितलेली होती. सदरची माहिती ही दिनांक ११ ऑक्टोबर, २००५ रोजी महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक **CRTI.2005/C.R.265/05/5,** च्या सब सेक्शन (२) च्या सेक्शन २४ माहिती अधिकार २००५ (२२ च्या २००५ ) अंतर्गत नाकारण्यात आलेली आहे. "

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २४ नुसार ज्या गुप्तवार्ता व सुरक्षा संघटनांना हा कायदा लागू होणार नाही अशांच्या बाबतीत शासनाने दि. ११ ऑक्टोबर, २००५ रोजी नोटीफिकेशन पारीत केले असून तशा संस्थांमध्ये राज्य गुप्तवार्ता विभाग व संलग्न संस्था यांचा समावेश केलेला आहे. दहशतवाद विरोधी पथक हे ८ जुलै ,२००४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे निर्माण करण्यात आले आहे. हे पथक राज्य गुप्तवार्ता विभागाचा एक भाग समजला जातो. त्यामुळे अपिलीय अधिका-यांनी घेतलेला निर्णय कायम करण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०४०८/अपील क्र. ३४२३/०१

श्री. कमलेश दत्ताराम हडकर -- अपीलार्थी

१४/५२५, सुभाष नगर, नवीन मिल रोड,
कुर्ला (पश्चिम) मुंबई - ७०

विरुध्द

१. अप्पर पोलीस आयुक्त -- उत्तरवादी
लाचलुचपत प्रतिबंध विभाग,बृहन्मुंबई विभाग,
मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला,
पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - १३
२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंध विभाग,बृहन्मुंबई विभाग,
मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला,
पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - १३

*---विवेचन---*

श्री.कमलेश दत्ताराम हडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याकरिता दि. १५/१२/२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. सदर अर्जाद्वारे श्री. कमलेश दत्ताराम हडकर यांनी एसीबी कार्यालयाने मा. विशेष न्यायालयात संकिर्ण अर्ज क्र. २१८/२००७ (एसीबी गु.र.क्र.७४/२००७ ) मध्ये दाखल केलेल्या म्हणण्या (Say) संदर्भातील एसीबी कार्यालयात नोंदविलेल्या १. श्री. देवर, २, श्री. एल.बी .शेख, ३. श्री. कदम व ४. श्री. देसाई यांच्या जबाबाच्या प्रमाणित प्रतीची मागणी केली होती. सदर अर्जास जा.क्र.२७/एसीबी/बिएमयु/२०७ दि २/१/२००८ अन्वये अपीलार्थी यांना ए.सी.बी मुंबई गु.र.क्र.७४/२००७ हा गुन्हा तपासाधिन असल्याने सदर गुन्हयातील कागदपत्रे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१)(एच) अन्वये त्यांना देता येत नसल्याचे शासकीय माहिती अधिकारी तथा अपर पोलीस उप आयुक्त, ए.सी.बी. मुंबई यांनी कळविले होते.

सदर माहितीने अपीलार्थींचे समाधान न झाल्याने त्याविरुध्द त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे दि. १६/१/२००८ रोजी प्रथम अपील केले होते.

अे.सी.बी. मुंबई गु.र.क्र.७४/२००७ या गुन्हयाचा तपास चालू असल्याने सदर गुन्हयाच्या तपासात साक्षीदार श्री. देसाई, श्री. देवर, श्री. कदम व आरोपी श्री. एल.बी .शेख, यांच्या नोंदविलेल्या जबाबाच्या प्रती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(१)(एच) अन्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस उप आयुक्त, अे.सी.बी. मुंबई यांनी योग्यरित्या नाकारल्या असे मत प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभाग, मुंबई यांनी नोंदवून सदरचे अपील फेटाळले.

वरील निर्णयाविरुध्द श्रीयुत हडकर यांनी आयोगाकडे केलेल्या दि. १२ मार्च २००८ रोजीच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. २ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

गुन्हयाचा तपास अद्यापि चालू असल्यामुळे या स्टेजला माहिती देता येणार नाही हे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ग्राहय धरण्यात येत आहे. मात्र शक्य तितक्या लवकर गुन्हयाचा तपास पूर्ण करुन अपीलार्थीस हवी असणारी माहिती देण्यात यावी.

<u>*---आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०९८०/अपील क्र. ३४२४/०१

श्री. दिपक राजाराम हिंदळेकर -- अपीलार्थी

साईज्योत इमारत, ए-२, प्लॉट नं. १७७-१७८,
सेक्टर १९, कोपर खैरणे, नवी मुंबई - ७०१.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -- उत्तरवादी
सशस्त्र पोलीस व दंगल नियंत्रण पथक,
नायगांव, मुंबई.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशा)
सशस्त्र पोलीस दल, ताडदेव, मुंबई ३४

***---विवेचन---***

श्री. दिपक राजाराम हिंदळेकर यांनी आयोगाकडे दि. १२/३/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. २ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्रीयुत हिंदळेकर यांनी दि. ७/१०/२००७ रोजी पोलीस आयुक्त यांना सहाय पोलीस आयुक्त व वरिष्ठ पोलीस निरीक्षक नायगांव या अधिका-यांच्या जाचातून मुक्ती मिळण्यासाठी जो तक्रार अर्ज केला होता त्या तक्रारीच्या चौकशीबाबत माहिती विचारली होती. याबाबत कुठचेहि कागदपत्र उपलब्ध नाहीत व यासंदर्भात ज्या ज्या कार्यालयात यासंबंधी कागदपत्रे सापडण्याची शक्यता होती त्यासंबंधीच्या सर्व कार्यालयात वरिष्ठ पोलीस निरीक्षक सशस्त्र पोलीस ताडदेव, पोलीस उप आयुक्त सशस्त्र पोलीस ताडदेव, पोलीस उप आयुक्त, सशस्त्र पोलीस दल वि.पो.नायगाव, अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस नायगांव व पोलीस आयुक्त अधीक्षक वि.चौ. यांच्याशी पत्रव्यवहार केला. मात्र कोणत्याही कार्यालयाकडून या संदर्भात काही कागदपत्रे असल्याचे दिसून आले नाही. व तसा अहवाल त्यांनी दिलेला आहे. त्यामुळे अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती देता येत नाही. श्री. हिंदळेकर आता सेवानिवृत्त झालेले आहेत असेहि सुनावणीच्या वेळेस सांगण्यांत आले.

अपीलार्थीच्या तक्रार अर्जाविषयीची कागदपत्रे जेथे जेथे असण्याची शक्याता होती त्या सर्व ठिकाणी शोध घेण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसतो. मात्र कुठचेहि कागदपत्रे सापडण्याची

शक्यता नसल्यामुळे ती कागदपत्रे अपीलार्थीस देता येत नाही हे म्हणणे नाईलाजाने मान्य करावे लागते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०९८५/अपील क्र. ३४२५/०१

श्री. दिपक गणपत नाईक -- अपीलार्थी
ब-३०/१, प्रशासकीय वसाहत,

वांद्रे (पूर्व) मुंबई ५१

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (परि ३) -- उत्तरवादी
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाउंड,
डॉ. बी.ए.रोड, भायखळा, मुंबई - २७
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाउंड,
डॉ. बी.ए.रोड, भायखळा, मुंबई - २७

*---विवेचन---*

श्रीयुत दिपक गणपत नाईक, वांद्रे (पूर्व) मुंबई यांनी आयोगाकडे दि. १७/३/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. २ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींच्या अपीलातील मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत -

१. मी दि.११/९/२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी व सहायक पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक कक्ष, बावला कंपौंड ,भायखळा, मुंबई यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम

२. २००५ अंतर्गत विविध मुद्दयांवर माहिती मागविली असता, त्यांनी विविध आस्थापनांकडून मागविली. संकलीत केली, ती आम्हांस उपलब्ध करुन दिली. त्याची रक्कम रु ९१/(रुएक्क्याण्णव फक्त) रु ८६/- एकूण प्रती - ४३ व रु.५/- पोस्टल खर्च माझेकडून घेण्यात आलेले आहे.

३. सदर माहितीचे अवलोकन केले असता त्यांतील पाने क्रमांक १,२,११,१२,१३,१४,२६,२८,२९,३२,३७ (९) ही त्यांनी इतर प्रभागांशी केलेला पत्रव्यवहार

,फॉरवर्डींग लेटर्स, असून त्याचे शुल्क माझेकडून वसूल केलेले आहे. त्यामध्ये अर्जदाराच्या माहितीचा कांहीही संबंध नाही.

४. पाने क्रमांक १३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,३५,३६ (१०) ही डबल रिपीट केलेली आहेत. परंतु त्याचेही शुल्क माझेकडून वसूल केलेले आहे ते अयोग्य आहे.

५. आवश्यक माहिती ही पान क्रमांक ३,४,५,६,७,८,९,१०,(२१,२२) २३,२४,२५,३०,३३,३४,३८,३९,४०(१९) अशी असून यामध्ये पान क्रमांक २७ हयावरील मजकुर हा आवश्यक संबंधित असूनही त्याची अस्पष्ट प्रत (unreadable) देणेत आलेली आहे. ती सुस्पष्ट (Readable) उपलब्ध करुन देणेचा आदेश व्हावा.

६. यामधील अनुक्रमांक (१) व (२) ची गरज नसताना ही अर्जदारास देण्याचा भुर्दंड त्यांनी माहिती अधिकार कायद्याच्या कोणत्या अधिनियमान्वये त्यांनी केलेला आहे याचा खुलासा त्यांचेकडून अभिप्रेत आहे.

७. तसेच अनुक्रमांक (३)ची माहिती उपयुक्त असल्याने सदर माहितीचे अनुज्ञेय मुल्य रु४०/- (रु चाळीस ) (पाने २० फक्त) घ्यावेत व इतर पैसे अर्जदारास परत करणेबाबतचे आदेश निर्ममित व्हावेत. याबाबत अपिलीय अधिका-यांनी सादर केलेला खुलासा पुढीलप्रमाणे आहे.

"१. सदर बाबत शासकीय माहिती अधिकारी यांना विचारणा करता अपीलार्थी यांनी दि. ११/९/२००७ रोजी केंद्राचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जात मागितलेली माहिती ही पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ मुंबई, पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश विभाग, मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दादर पोलीस ठाणे मुंबई अशा तीन ठिकाणाहून संकलीत करण्यात आल्याचे तसेच सदर संकलीत करण्यात आलेली माहिती अपीलार्थी यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

२. शासकीय माहिती अधिकारी यांनी तीन ठिकाणांहून संकलीत केलेली माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. त्यात काही प्रती अपीलार्थीस दोनदा देण्यात आलेल्या आहेत. परंतु सदर प्रती तीन ठिकाणांहून संकलीत करुन दिल्याने त्या अपीलार्थीस दोनदा दिल्या गेल्या आहेत. त्यात त्यांनी जाणुन बुजून सदरच्या

प्रती अपीलार्थीस दोनदा दिल्याचे दिसून येत नाही. सबब अपीलार्थीचा अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे. "

अपीलार्थीना देण्यात आलेली माहिती विविध कार्यालयातून संकलित करुन दिली गेली आहे व कांही कार्यालयात तीच माहिती असल्यामुळे कांही प्रती दोनदा देण्यांत आल्या आहेत असे दिसून येते. मात्र जाणुन बुजून सदरच्या प्रती अपीलार्थींना दोनदा देण्यांत आल्याचे दिसून येत नाही. असे जरी असले तरी व यात जन माहिती अधिका-यांचा कुठचाहि कुहेतू नाही जे जरी स्पष्ट होत असले तरी अपीलार्थीस मात्र विनाकारण भुर्दंड पडलेला आहे हे निश्चित. तसेच अपीलार्थीस देण्यात येत असलेली माहिती ही आटोपशिर व नेमकीच असावी. त्यात इतर प्रभागाशी केलेला पत्रव्यवहार, फॉरवर्डिंग लेटर वगैरेची कांहीही आवश्यकता नाही. त्यामुळे अपीलार्थीस २३ पेजेस विनाकारण घ्यावे लागले व त्याचे रु. ४६/- शुल्क हे विनाकारण द्यावे लागले ही गोष्ट तेवढीच खरी. त्यामुळे सदरील रक्कम रु. ४६/- ही अपीलार्थीस परत करण्याचे आदेश आयोग देत आहे. तसेच जे पत्र अस्पष्ट आहे ती स्पष्ट प्रत देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविलेली आहे.

जन माहिती अधिका-यांचा दुबारा प्रत देण्यामध्ये कुठचाहि कुहेतू नाही हेहि दिसून येत असल्यामुळे शास्तीचे आदेश नाही. त्यामुळे आयोग पुढील आदेश देत आहे.

*--आदेश---*

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थीस रु. ४६/- परत करण्यात यावेत.

अपीलार्थींना दिलेले जे पत्र अस्पष्ट आहेत त्याची स्पष्ट प्रत देण्यात यावी.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१२२८/अपील क्र. ३४२६/०१

श्री. हबीब रहेमान फजलु रहेमान अन्सारी -- अपीलार्थी
व.पो.नि. म.शाखा, वि.शा.१,
गुन्हे अन्वेषण विभाग, ग्लॅमर हाउस,
२ रा मजला, फ्लॅट नं. ३१, आर्थर बंदर रोड,
कुलाबा, मुंबई ३९ .

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -- उत्तरवादी
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, (आस्थापना)
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.
२. जन माहिती अधिकारी
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, (आस्थापना)
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

*---विवेचन---*

श्रीयुत हबीब रहेमान फझलू रहेमान अन्सारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी आयोगाकडे दि. ५/४/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. २ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपीलार्थीनी दि. ३/९/२००७ रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक यांच्याकडे अर्ज करुन पोलीस उप अधीक्षक/ सहा.पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नतीस पात्र असणा-या पोलीस निरीक्षकांची सन २००६-२००७ मध्ये तयार केलेल्या निवडसूचीमध्ये

अनुक्रमांक १९ व यादीतील अ.क्र.४४ मध्ये त्यांना दर्शविण्यात आले आहे. तसेच त्यांना असे समजले की, कांही कारणास्तव महाराष्ट्रातील कांही कार्यरत अधिका-यांना मागे ठेवण्यात आलेले आहे तसेच महाराष्ट्रातील त्यांच्याबरोबर दाखल झालेल्या कार्यरत अधिका-यांची निवडसूचीच्या यादीमध्ये नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे अंत:र्भूत केलेल्या अधिका-यानंतर महाराष्ट्र

पातळीवर त्यांचा कितवा क्रमांक आहे तसेच त्यांच्या क्रमांकापर्यंत असलेल्या महाराष्ट्रातील सर्व निवडसूचीतील अधिका-यांच्या नावाची यादी त्यांना पुरविण्यात यावी.

वरील अर्जानुसार त्यांना असे कळविण्यात आले की, सन २००६-२००७ च्या निवडसूची बनविण्यासाठी तयार केलेल्या निर्देशसूचीवर नवीन नावांमध्ये अनुक्रमांक ३८ वर त्यांचे नांवे अंतःर्भूत करण्यात आलेले आहे.

वरील माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी केलेल्या प्रथम अपीलात त्यांना पदोन्नती कां नाकारण्यात आली याचे निवेदन आहे. मात्र शासकीय माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र शासन, गृह विभाग पत्र क्र.रापोसे/१३०७/प्र.क्र.६२७/पोल-१ अ, दि. १०/१२/२००७ च्या पत्राची प्रत अपीलार्थीस द्यावी असे निर्देश अपिलीय अधिका-यांनी आपल्या निकालात काढले.

त्यानेहि समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि. ५/४/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी निवडसूची व निर्देशसूचीमध्ये फरक विषद करुन सांगितला. प्रथम निर्देशसूची तयार करण्यात येत असते व त्यानंतर निर्देशसूचीतील अधिका-यांचे गोपनीय अहवाल व इतर बाबींचा विचार करुन शासनाची निवडसमिती ही निवडसूची तयार करीत असते.

अपीलार्थींनी जरी निवडसूची असा शब्दप्रयोग केला असला तरी सुनावणीच्या वेळेला त्यांनी असे सांगितले की, सन २००६-०७ ची निवडसूची बनविण्यासाठी ज्या निर्देशसूचीचा

वापर केला असेल त्या निर्देशसूची ज्यामध्ये त्यांना ३८ व्या क्रमांकावर दाखविण्यात आलेले आहे ती सूची त्यांना देण्यात यावी.

अपीलार्थींना इतर सर्व माहिती वेळोवेळी पुरविल्याचे दिसते. व ही माहिती सुध्दा त्यांच्या अर्जात स्पष्टता नसल्यामुळे देता येवू शकत नाही असे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे आहे. तेव्हा ५ दिवसांच्या आंत वरील माहिती अपीलार्थीस देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले.

अपीलार्थीची जन माहिती अधिका-यांना शास्ती लादावी अशी मागणी आहे. पण शास्ती लादण्यासाठी कोणतेही कारण दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपीलार्थीस वर निर्देशिल्याप्रमाणे निर्देशसूची ही ५ दिवसांच्या आंत देण्यांत यावी.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०९६९/अपील क्र. ३४३१/०१

श्रीमती स्मृती प्रभाकर लोके -- अपीलार्थी
१०/१०४१, इंद्रप्रस्थ को.ऑप.हौ.सोसा.
म्हाडा वनराई कॉलनी, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,

गोरेगांव (पूर्व) मुंबई ६५.

विरुध्द

१. जिल्हा उपनबिंधक, सहकारी संस्था (३) -- उत्तरवादी
गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,
वांद्रे (पूर्व) मुंबई ५१
२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था के/पूर्व विभाग,
मल्होत्रा हाउस, जी.पी.ओ.समोर, मुंबई - ०१

*---विवेचन---*

श्रीमती. स्मृती प्रभाकर लोके, गोरेगांव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले ते आयोगास दि.१८/३/२००८ रोजी प्राप्त झाले त्या अपीलाची सुनावणी दि. २ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी आदर्श इंडस्ट्रीज प्रिमा को.ऑप.सो.लि. या संस्थेबाबत त्यांचे अशील मेसर्स. झि ाअस एअर सर्विस प्रा.लि. यांनी केलेल्या तक्रारीबाबत जनमाहिती अधिकारी कार्यालयाने काय कारवाई केली अशी माहिती विचारली होती.

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी ,के/पूर्व विभाग यांनी अपीलार्थीस असे कळविले की, दि. ५/३/२००७ व १७/३/२००७ रोजीच्या अर्जावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

यावरील केलेले प्रथम अपिल अपिलीय अधिकारी यांनी सदरचे अपील फेटाळून लावले. मात्र प्रशासकीयरित्या असे आदेश दिले की, त्यांच्याकडे अपीलार्थी यांचेकडे दि. ८/९/२००७ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आलेल्या व त्यास दि. ५/३/२००७ व १७/३/२००७ च्या उत्तराच्या अनुषंगाने सहकारी संस्था अधिनियमाच्या अंतर्गत आवश्यक ती कारवाई करुन अपीलार्थी यांना कळविण्यात यावे.

अपीलार्थी यांन कारवाईत रस असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले होते. नमूद केलेल्या अर्जाच्या संबंधात जी कांही परिस्थिती असेल ती जन माहिती अधिका-यांनी कळविली आहे. मात्र अपिलीय अधिका-यांनी प्रशासकीय आदेश दिल्यानंतर काय कारवाई झाली असे विचारले असता उपनिबंधक तथा जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयाने सदरील तक्रारीबाबत संस्थेची दप्तरतपासणी घेतली आहे व संस्थेने त्या तक्रार अर्जाबाबत कांही खुलासाहि दिलेला आहे. त्या खुलाश्याची प्रत अपीलार्थी यांना हवी असल्यास देण्यात येईल व त्यांचे त्यावर काय म्हणणे आहे हे ऐकून घेतल्यानंतर तक्रारीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यांत येईल. त्यामुळे जी सद्य:स्थिती आहे त्या सद्य:स्थितीची माहिती अपीलार्थीस करुन देण्यांत आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*--आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१२४३/अपील क्र. ३४३०/०१

श्री. अशोक आर. कदम -- अपीलार्थी
इशकृपा इमारत, फ्लॅट नं.६,
एस.एम. जाधव मार्ग, दादर, मुंबई - १४

विरुध्द

१. सहायक आयुक्त -- उत्तरवादी

बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ दक्षिण विभाग,
डॉ. बी.ए. आंबेडकर रोड, परेल नाका,
परेल, मुंबई - ४०० ०१२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का.)

बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ दक्षिण विभाग,
डॉ. बी.ए. आंबेडकर रोड, परेल नाका,
परेल, मुंबई - ४०० ०१२.

*---विवेचन---*

श्रीयुत अशोक आर. कदम यांनी आयोगाकडे दि. ३१/३/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये सादर केलेल्या अपीलावर दि. २ डिसेंबर, २००८ रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का) एफ/दक्षिण विभाग,बृहन्मुंबई महानगरपालिका हे उपस्थित होते.

अपीलार्थीस त्यांचा दि. २५/८/२००७ रोजीचा अर्ज व त्यांच्या वकीलांनी दि. २१/९/२००७ रोजी दिलेल्या नोटीशीबाबत महापालिकेने काय कारवाई केली याची माहिती ,

महापालिकेस दि. १४/११/२००७ रोजी प्राप्त झालेल्या अर्जानुसार पाहिजे होती. त्यावर सद्य:स्थितीची माहिती देणारे पत्रदि. ११/१२/२००७रोजी अपीलार्थीस पाठविण्यात आले. त्याने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थींनी जे प्रथम अपील सादर केले त्या अपीलावर करावयाच्या कारवाईबद्दल ब-याचशा प्रशासकीय सूचना या अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या प्रशासकीय अधिकारात जन माहिती अधिका-यांना दिलेल्या होत्या.

माहितीचा अधिकार अधिनियमानुसार एखादया केसच्या बाबत जशी कागदपत्रे असतील त्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात व त्याद्वारे अपीलार्थीस माहिती उपलब्ध करून देणे ही पध्दत असते.

अपीलार्थीस प्रत्यक्ष कृतिची अपेक्षा त्यांच्या अपीलावरुन दिसून येते. यासंदर्भात सुनावणीच्या वेळेला प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

" ईशकृपा इमारत ही नायगांव, दादर येथील म.न.पा. च्या जमिनीवर आहे. सन १९४२ मध्ये एकूण ११ व्यक्तींना म.न.पा.च्या जमिनींची व्यवस्था पहाणा-या मालमत्ता खात्याने नायगांव येथे भूखंडावरील ११ प्लॉट दिले होते. तेथे त्या व्यक्तींनी इमारती बांधल्या व त्यामध्ये भाडेकरु ठेवले. काही मालक व काही भाडेकरु अशी नायगांव को.ऑप. सोसायटी स्थापन करण्यात आली. त्यामध्ये ११ पैकी १ इमारतीचा समावेश नसल्याचे, पण फक्त त्या इमारतीच्याच मालकाशी म.न.पा. चा भूखंड मक्त्यावर देण्याचा करार अलिकडे २००७ मध्ये झाला असल्याचे समजते.

हे ११ भूखंड व त्यावरील इमारती याबाबत झालेले करार, इमारतींचे मान्यताप्राप्त आराखडे, ब्रिचेस कोणते आहेत, कोणत्या नोटीसेस किंवा अन्य प्रकारची कारवाई केली आहे, कोर्ट प्रकरणे आहेत कां ही सर्व माहिती मालमत्ता खात्याने अभिलेखावर तपासून अभिप्राय देणे आवश्यक आहे. मालमत्ता खात्याचे सक्षम अधिकारी, सहाय्यक आयुक्त (मालमत्ता ) हे आहेत.

तसेच दि. २५/८/०७ व २१/९/०७ रोजीच्या पत्रांमध्ये गच्चीवरील वाढीव बांधकाम भाडेकरु डॉ. जैन यांच्याकडून करण्यात येत असल्याबाबत तक्रार असली तरी डॉ. जैन यांच्या म्हणण्याप्रमाणे सदर बांधकाम जूनेच असून तसा उल्लेख त्यांचा प्लॉट क्र.७ घेताना सन २००६ च्या कॅनरा बँकेच्या अहवालामध्ये फोटोसह आहे. त्यामुळे सदर तक्रारांकीत वाढीव खोलीच्या बांधकामाबाबत कायदेशीरपणा तपासणे आवश्यक आहे. तसेच अपीलार्थींचा पूर्वी २२/२/२००७ च्या अर्जामध्येही बांधकाम जुने असल्याचा उल्लेख आहे. अर्जदार श्री. अ.र.कदम यांच्या घरात होणारी पाणीगळती, वीजबटणे खराब होणे, गच्चीचा वापर करण्यास डॉ. जैन यांच्याकडून अडथळा होणे व डॉ. जैन यांच्या फ्लॅटला सुरक्षा दरवाजा, पत्रपेटी व कॉलबेल जिन्यामध्ये लावणे हया बाबींकरीता सुनावणी स्थगित ठेवून त्यानंतर पहाणी करुन सुनावणी आदेश काही दिवसानंतर देता आले असते. परंतु सदर बाबी सुनावणी दिवशी पूर्ण करुन घेण्यांत आल्या.

श्री. अ.र. कदम यांनी दुस-या अपीलामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांशी मी सहमत नाही. याचे कारण असे की, जन माहिती अधिका-यांनी डॉ. जैन यांना पाठविलेले पत्र व त्याला आलेले उत्तर ही दोन माहितीची पत्र होती. ती अपीलार्थीना दाखविण्यात आली होती. परंतु अपीलार्थींचा भर (१) त्यांच्या घरी

होणारी पाणी गळती (२) गच्चीचा वापर करुन देण्याबाबत (३) पाण्याच्या टाक्या गच्चीवर बसविण्याबाबत हया मुद्दयांवर जास्त होता. म्हणून सुनावणी आदेश देताना, मालमत्ता व विधी खात्यांचे अभिप्राय / अहवाल मागवून घेण्यास लिहिले आहे. तसेच त्यावेळेला सोसायटीमार्फत गच्चीवरील लादीकरण, इमारत दुरुस्ती/ रंग इत्यादी कामे सुरु होती. म्हणून गच्चीतून होणारी पाणीगळती तपासण्यासही लिहिले आहे.

हया सुनावणी आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मालमत्ता खाते व विधी खात्यास लगेचच अवगत करुन अभिप्राय/ अहवाल मागितले आहेत. पण अद्यापपर्यंत एफ/दक्षिण विभागास अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

दिनांक १७ ते २० मे २००८ दरम्यान किडवाई मार्ग व झकेरीया बंदर मार्ग येथील सुमारे १००० झ ाोपडयांचे निष्कासन करण्यात आले. एफ/दक्षिण विभागात छाननी प्रक्रिया मार्च, एप्रिल महिन्यात प्राधान्याने करण्यात येत होती व त्याचे भरपूर काम एफ/दक्षिण विभागाकडे होते. तसेच त्यानंतरही भोईवाडा पुनर्वसन प्रकल्पांतर्गत एव्हिक्शन मोहिम पावसाळी आपत्कालीन कामे व महात्मा फुले पथक्रांती म.न.पा. च्या जागांवरील सार्वजनिक हिताच्या प्राधान्याने करावयाच्या योजना हया कामांचा भार आहे. तसेच इमारत खात्यातील एका कनिष्ठ अभियंत्याची कमतरता व दुय्यम अभियंत्यांची बदली झाल्यामुळे हया व अन्य काही प्रकरणे पुढील कार्यवाही वेळेत होवू शकली नाही. अपीलार्थीच्या तक्रारीत उल्लेखिलेले ईशकृपा इमारतीच्या गच्चीवरील फ्लॅट क्र. ७ कायदेशीर आहे पण वाढीव बांधकाम कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे याची तपासणी करुन त्यानुसार आवश्यक कारवाई करण्यात येईल. तसेच अपीलार्थीच्या घरामध्ये पाण्याची गळती थांबली नसेल तर सोसायटीवर म.न.पा. कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

निम्नस्वाक्षरी यांची एफ/दक्षिण विभागात दि. १५/१०/२००८ पासून नियुक्ती झाली आहे व द्वितीय अपील सुनावणीची माहिती प्राप्त होईपर्यंत हया अपीलाबाबत पूर्व माहिती नव्हती. म्हणून अपीलकर्त्यांना पुन्हा एकदा मी संयुक्त चर्चेस बोलावून त्यांच्या गा-हाण्यांचे निवारण करण्यास पूर्ण मदत करीत व संबंधितांना योग्य कार्यवाहीबद्दल मार्गदर्शन करीन. "

वरील निवेदनावरुन महापालिका करीत असलेल्या कार्यवाहीची दिशा ही स्पष्ट होते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०९३०/अपील क्र. ३४०८/०१

श्री. हबीब रहेमान फजलु रहेमान अन्सारी -- अपीलार्थी
व.पो.नि. म.शाखा, वि.शा.१,

गुन्हे अन्वेषण विभाग, ग्लॅमर हाउस,
२ रा मजला, फ्लॅट नं. ३१, आर्थर बंदर रोड,
कुलाबा, मुंबई ३९ .

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (मुख्या १) -- उत्तरवादी
पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,
क्रॉफर्ड मार्केटसमोर, डी.एन.रोड,
मुंबई - ४०० ००१.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या १)
पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,
क्रॉफर्ड मार्केटसमोर, डी.एन.रोड,
मुंबई - ४०० ००१.

---*विवेचन*---

श्रीयुत हबीब रहेमान फजलु रहेमान अन्सारी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या) यांना दि. २/१/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम ६ अन्वये अर्ज करुन ५० वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांसंदर्भात त्यांच्या ५ वर्षातील पोस्टींग विषयी माहिती विचारली होती.

याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" अपीलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी अर्जातील मुद्दा क्र. १ व २ ची माहिती ही अत्यंत व्यापक स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (९) अन्वये नाकारण्यात आली. तसेच मुद्दा क्र. ५ मधील माहितीमधील माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(१)(ञ) अन्वये अशी माहिती नाकारण्यात आली.

सदर माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थी श्रीयुत हबीब रहेमान फजलु रहेमान अन्सारी यांनी दि. २९/२/२००८ रोजी अर्ज करुन प्रथम अपील दाखल केले होते. सदर अपील अर्जाची सुनावणी दि. १३/३/२००८ रोजी घेण्यांत आली. सुनावणी आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

शासकीय माहिती अधिकारी व श्री हबीब रहेमान फजलु रहेमान अन्सारी यांचे युक्तीवाद ऐकल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने माहिती मागितल्यानंतर माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. त्यामुळे दि. २९/२/२००८ रोजी अपीलार्थीने अपील केले आहे. अपील केल्यानंतर दि. ७/३/२००८ रोजी संबंधित कक्षाने शासकीय माहिती अधिका-यांना माहिती पुरविली आहे. संबंधित कक्षाने माहिती पुरविण्याकरिता २ महिन्यांचा अवाजवी कालावधी घेतला असल्याने शासकीय माहिती अधिका-यांना असे आदेशित करण्यात येते की, त्याबाबत त्यांना "ताकीद " देण्यात यावी. संबंधित कक्षाने पुरविलेल्या माहितीमध्ये सदरची माहिती व्यापक स्वरुपाची असल्याने दिलेली नाही. तरी त्यांना आदेशित करण्यात येते की, अपीलार्थीनी अर्जात नमूद केलेल्या अधिका-यांची मागील ५ वर्षांची गोपनीय अहवाल सोडून अन्य माहितीचा तपशील द्यावा. सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आता श्रीयुत हबीब रहेमान फजलु रहेमान अन्सारी यांनी द्वितीय अपील अर्जात खालील मुद्दा उपस्थित केलेला आहे.

<u>द्वितीय अपीलात उपस्थित केलेला मुद्दा</u> - दि. २/१/२००८ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ते ५ अन्वये माहिती मागितली होती. परंतु ती माहिती प्राप्त झाली नाही अथवा ती प्राप्त होणार आहे किंवा नाही याबाबत विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारेचे उत्तर प्राप्त झालेले नाही.

<u>खुलासा</u> - अपीलार्थीने मागणी केलेली माहिती दि. २/१२/२००८रोजी जा.क्र.पोआ/कक्ष ३/वआ/२१०७/०८ नुसार कक्ष-३ (वरिष्ठ आस्थापना) या कार्यालयातून प्राप्त झाली. दि. २/१२/२००८ रोजी अपीलार्थीशी दुरध्वनीवरुन संपर्क साधून प्राप्त झालेली माहिती त्यांना देण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी माहिती पाठवून द्यावी असे सांगितले असता जा.क्र.०४/सपोआ/मुख्या-१/माअअ/०८ दि. २/१२/२००८ अन्वये विक्रोळी पोलीस ठाणे येथे अपीलार्थीस सदर माहिती पाठविण्यात आली. परंतु अपीलार्थी यांनी सदर माहिती प्राप्त करुन न घेता सदर माहिती आयोगासमोर प्राप्त करुन घेवू असे कळविले. "

अपीलार्थीस प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेश होवूनहि माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी दि. २६/३/२००८ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलाची सुनावणी दि. ३/१२/२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिका-यांनी याअगोदर माहिती देवू केली होती पण ती आयोगाच्या सुनावणीनंतरच घेवू असे अपीलार्थींना सांगितले. जन माहिती अधिका-यांनी आणलेली माहिती ही अपीलार्थीस देण्यांत आली. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक रा.मा.आ-२००८/२७७६६/तक्रार क्र. १९/०१

श्री. अफताब ए. सिद्दीकी -- तक्रारदार

सदानंद क्लासिक, प्लॉट नं. ५२८,
३३ वा मार्ग, खार (पश्चिम) मुंबई - ४०० ०५२.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता -- उत्तरवादी
इमारत प्रस्ताव विभाग (पश्चिम उपनगर)
बृहन्मुंबई महानगरपालिका एच व के पूर्व विभाग,
आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

*---विवेचन---*

श्रीमती. अफताब ए सिद्दीकी यांनी आयोगाकडे दि. १९ नोव्हेंबर, २००७ रोजी तक्रार अर्ज देवून असे निवेदन केले की, त्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार पुढील ५ नस्त्यांच्या संदर्भात त्यांना त्या नस्त्या उपलब्ध होवू शकत नसल्यामुळे माहिती देण्यांत आलेली नाही.

| | | |
|---|---|---|
| **1.** | **GB/99/A** | **25/5/65** |
| **2** | **CE/6614/BSII** | **14/2/80** |
| **3** | **CE/7367/BSII** | **6/3/82** |
| **4.** | **CE/942/MSC** | **31/1/09** |
| **5.** | **CE/028/AH** | **8/4/94** |

सदर तक्रारीची सुनावणी दि. १ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलकर्त्या श्रीमती. अफताब सिद्दीकी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सर्वतोपरी प्रयत्न करुनहि या नस्त्या रेकॉर्डला उपलब्ध झालेल्या नाहीत, म्हणून तक्रारदारांस हवी असलेली माहिती देता येवू शकली नाही असे सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिका-यांनी सांगितले व पुढीलप्रमाणे निवेदन केले.

" तक्रारदार श्रीमती आफताब सिद्दीकी यांनी त्यांच्या दिनांक १३.८.२००८ च्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जान्वये प्लॉट सी.टी.एस. क्र. एफ/३६४ (एम.के.बिल्डींग), ३३ वा रस्ता बांद्रा या भूखंडावरील इमारतीबाबतची माहिती व नकाशांच्या प्रती मागितल्या होत्या.

इमारत प्रस्ताव (प.उ.-१) च्या विभागातील सर्वेक्षण खात्यातील नोंदीनुसार खाली नमूद केलेल्या ५ प्रस्तावांचे क्र. सदर भूखंडावर नमूद केल्याचे आढळले.

१. सी.ई/६६१४/बी.एस.II दि. १४.२.१९८०

२. सी.ई/७३६७/बी.एस.II दि. ६.३.१९८२

३. सी.ई/०२८/डब्ल्यु.एस./अे.एच. दि. ८.४.१९९४

४. सी.ई/९४२/मिसलेनियस दि. ३.१.१९९१

५. जी.बी./९९/अे. दि. २५.५.१९६५

वर नमूद केलेल्या क्र. १ ते ३ मधील फाईल्सचे रजिस्टर उपलब्ध असून त्यातील नोंदीनुसार अनु. २ म्हणजेच फाईल क्र. सीई/६६१४बीएस II हया इमारत प्रस्तावास १९८० मध्ये मंजुरी व तद्नंतर १२.८.१९८० मध्ये भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचे दिसून येते. क्र. २ म्हणजे फाईल नं. सीई/७३६७/बीएस II हया प्रस्तावास १९८२ मध्ये फेरफार करण्यास दिनांक १८.३.१९८२ रोजी मंजुरी दिलेली होती असे दिसते. क्र. ३ म्हणजेच सीई/०२८/डब्ल्युएस/ऐएच हया प्रस्तावास कोणतीही मंजुरी न देता सदर प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे.

अनु.क्र. ५ म्हणजेच फाईल नं. सीई/९९/II हा १९६५ सालीच्या प्रस्तावाची फाईल ही असल्याचे आढळून आले. क्र. ४ म्हणजे सीई/९४२/मिसलेनियस हया फाईलची कोणतीही नोंद रजिस्टरमध्ये आढळून आली नाही. सदर इमारत प्रस्तावांच्या फाईल्स हया खूप वर्षापूर्वीच्या आहेत.

येथे असे नमूद करावेसे वाटते की, इमारत प्रस्ताव (प.उ.) येथील रजिस्टर मध्ये असलेल्या नोंदीनुसार कार्यालयात सुमारे ३८,००० ते ४०,००० फाईल्सच्या नोंदी असून सदर फाईल्सचा कालावधी सुमारे ३० ते ५० वर्षापासूनच्या कालावधीच्या आहेत.

सदर फाईल्स कार्यालयाच्या इमारतीमधील तसेच भांडूप कॉम्प्लेक्स मधील गोडावूनमध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. गेल्या कित्येक वर्षात कार्यालयीन कामासाठी तसेच माहितीच्या अधिकारासाठी माहिती पुरवतांना पहाणी करण्यासाठी वारंवार हाताळल्या जातात व तेव्हा असे आढळून आले आहे की, कित्येक फाईल्स उपलब्ध होऊ शकत नाहीत.

येथे असे नमूद करावेसे वाटते की, तक्रारदाराच्या उपरोक्त अर्ज आल्यानंतर खूप शोध घेऊन देखील वर नमूद केलेल्या फाईल्सपैकी कोणतीही फाईल मिळाली नाही. तेव्हा हया फाईल्सचा शोध घेण्यासाठी दि. २६.९.२००८ रोजी परिपत्रक जारी करण्यात आले व ते परिपत्रक महापालिकेच्या इतर विभागांनाही वितरीत करण्यात आले. तसेच इमारत प्रस्ताव खात्यामधील सर्व अभियांत्रिकी कर्मचा-यांच्या निदर्शनास आणण्यात आले. सर्वत्र शोध घेऊन देखील अजूनपर्यंत हया जुन्या फाईल्स उपलब्ध होऊ शकल्या नाहीत.

तसेच उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांकडून सदर फाईल्सचा शोध घेण्यात आलेला होता. सदर कर्मचा-यांनी भांडूप संकुल मधील गोडावून मध्येही शोध घेतला. परंतु सदर फाईल्स खूप वर्षापूर्वीच्या असल्यामुळे उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. सदर फाईल्स इतर फाईल्स बरोबर मिसळल्या गेल्या असण्याची शक्यता आहे.

सर, येथे असे नमूद करावेसे वाटते की, दर महिन्याला सुमारे ४०० ते ४५० अर्ज हया कार्यालयात माहितीच्या अधिकार २००५ अंतर्गत, म्हणजे 'एच' विभाग (इमारत प्रस्ताव), प्राप्त होतात. सुमारे ९९% म्हणजे ४४० ते ४४५ अर्जदारांना हवी ती माहिती दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात येते.

खेदाने येथे असे नमूद करावेसे वाटते की, सदर अर्जदाराने मागितलेल्या फाईल्स खूप जुन्या असून या कार्यालयातील कर्मचा-यांच्या अथक शोधानंतर व खूप प्रयत्न करूनही मिळू शकल्या नाहीत. गेल्या १५ वर्षात वर नमूद केलेल्या भूखंडावर नविन बांधकामासाठी प्रस्ताव सादर झालेला आढळून येत नाही.

सदर सुनावणीच्या वेळी तक्रारदाराने उपस्थित केलेले मुद्दे हे सदर भूखंडावरील अस्तित्वात असलेल्या इमारतीमधील होत असलेल्या कामाबद्दल व सदर कामासंदर्भात कोणताही प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. तसे तक्रारदारास कार्यालयाच्या संबंधित कर्मचा-यांकडून अवगत करण्यात आले होते.

येथे मी नम्रपणे नमूद करू इच्छितो की, वर नमूद केल्याप्रमाणे कर्मचा-यांच्या खूप प्रयत्नानंतर ही सदर जुन्या फाईल्स उपलब्ध न झाल्याने तक्रारदारास दस्तऐवज उपलब्ध करून देता येऊ शकले नाही व

सदर बाबत कोणताही पूर्वदुषित ग्रह नसून सदर तक्रारदारास या पूर्वी इतर प्रकरणांबाबत हवी असलेली माहिती वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. "

बृहन्मुंबई महानगरपालिकेत विशेष करुन बांधकाम परवानग्यांच्या बाबतीतल्या अनेक नस्त्या गहाळ आहेत व त्या नस्त्या तक्रारदारांना उपलब्ध होवू शकत नाहीत ही बाब अनेकदा महापालिका आयुक्त यांच्या निदर्शनाला आणण्यात आलेली आहे, व त्यांना यासंबंधी योग्य त्या रेकॉर्ड मॅनेजमेंटद्वारे कार्यवाही करण्याच्या सूचनाहि करण्यात आलेली आहे. तरी पण याबाबतची कार्यवाही अत्यंत धिम्या गतीने चालू आहे असे आयोगास वाटते.

सदरील प्रकरणामध्ये जन माहिती अधिका-यांनी नस्त्यांचा शोध घेण्याच्या प्रयत्नांची माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ अधिका-यांनी याची खात्री करुन घ्यावी व तसे प्रमाणपत्र रेकॉर्डला ठेवावे.

प्रयत्न करुनहि या नस्त्या उपलब्ध होवू शकत नसतील तर तक्रारदारांना वरिल प्रकरणी माहितीचा अधिकार कायद्यान्वये मदत करता येणे कठीण वाटते. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना असे निर्देश देण्यात येतात की, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील संबंधातील विभागाच्या नस्त्याबाबत, नस्त्या व रेकॉर्ड अद्ययावत ठेवण्याबाबत सूचना द्याव्यात व त्याचे कटाक्षाने पालन होईल याची दक्षता घ्यावी.

---आदेश---

वरील परिस्थितीत नाईलाजाने तक्रार निकाली ठेवण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ४ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१४०९/अपील क्र. ३४१३/०१

श्री. गणेश तेजधर तिवारी -- अपीलार्थी
१६, महावीर तिवारी चाळ, गुंदवली हिल,
आझाद रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०० ०६९.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -- उत्तरवादी
परिमंडळ १२, शैलेंद्र नगर,
दहिसर (पूर्व) मुंबई - ४०० ०६८.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,

कांदिवली (पूर्व) मुंबई - ४०० १०१.

## ---*विवेचन*---

श्रीयुत गणेश तेजधर तिवारी यांनी आयोगाकडे दि. ५/४/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. ३ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिका-यांनी सदरील अपीलाच्या बाबतीत पुढीलप्रमाणे निवेदन केलेले आहे.

" अपीलार्थी श्री. गणेश तेजधर तिवारी यांनी दि. १४/११/२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहिती मिळण्याकरीता अर्ज सादर केला होता. त्यात अपीलार्थी तसेच त्यांचे वकील श्री. के.के.पांडे यांचे दहिसर पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक श्री.ढोले यांनी घेतलेले जबाबाची प्रत मिळणेबाबत नमूद केले होते. सदरची माहिती दि. ११/१२/२००७ रोजी दहिसर पोलीस ठाणे येथून प्राप्त करण्यात आली त्यात अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम अन्वये दि. २७/१०/२००७ रोजी दहिसर पोलीस ठाणे येथे केलेला मूळ अर्ज तसेच दहिसर पोलीस ठाणेकडून अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती ही जा.क्र. १२६७/०७ दि.६/११/२००७ अन्वये अंधेरी पोलीस ठाणे येथे पाठविण्याचे नमूद होते.

जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयांमार्फत अधिक माहिती मिळण्याकरीता अंधेरी पोलीस ठाणे येथे जा.क्र. सपोआ/मा.अ/८१९/०७ प्रमाणे दि. ११/१/२००८ रोजी पत्र पाठविण्यात आले. अंधेरी पोलीस ठाणेकडून पाठविण्यात आलेला अहवाल दिनांक २२/१/२००८ रोजी प्राप्त झाला त्यात अंधेरी पोलीस ठाणेच्या अभिलेखावर मागणी केलेले कागदपत्र नसल्याचे त्यांनी कळविले. त्या अनुषंगाने पुन्हा दहिसर पोलीस ठाणेकडून सदर बाबत अहवाल मागविण्यात आला असता संबंधित कागदपत्रही अंधेरी पोलीस ठाणेकडे पाठविण्यात आलेबाबत कळविले.

अपीलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी व परिमंडळ १२ , मुंबई यांचेकडे अपील अर्ज सादर केला असता दि. ७/१/२००८ रोजी अपील आदेश पारित करण्यात आले. त्यात मागणी केलेले कागदपत्र संबंधितांकडून मागवून देण्यात यावे असे नमूद आहे.

अपील आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंधेरी पोलीस ठाणे व दहिसर पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त अहवाल अपीलार्थी यांना दि. १६/५/२००८ रोजी देण्यांत आलेले आहेत.

अपीलार्थी यांनी प्रस्तुत द्वितीय अपीलात (५/४/२००८) मध्ये माहिती मिळण्याकरीता केलेल्या संबंधात आयोगाकडे दि. ३/१०/२००८ रोजी अपील क्रमांक ३०२८/०२ प्रमाणे सुनावणी झाली असून अपील आदेशाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. "

अपील क्रमांक ३०२८ या अपीलाचा विषय आणि या अपीलाचा विषय हा एकच आहे. अपीलार्थीस हवी असलेली माहिती दि. १६/५/२००८ रोजीच देण्यांत आलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ४ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१२४९/अपील क्र.३४३२/०१

श्री. आनंद स्वामी कोळी -- अपीलार्थी
३७, ६/७, शास्त्री नगर, इर्ला सोसायटी रोड,
इर्ला, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ५६.

विरुध्द

१. अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) -- उत्तरवादी
पश्चिम उपनगरे, मुंबई यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, वांद्रे (प)
मुंबई - ४०० ०५१.
२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी
(अति/निष्का), रुम नं. ६८, गृहनिर्माण भवन,

वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१

*- --विवेचन---*

श्रीयुत आनंद स्वामी कोळी , इर्ला विलेपार्ले, मुंबई यांनी आयोगाकडे दि. ३/४/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ४ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी, व जन माहिति अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस इर्ला नाला रुंदीकरणात येणा-या संबंधित झोपडयांचे सर्वेक्षणाबाबत कांही माहिती पाहिजे होती. ही माहिती अपीलार्थीस दि. १/११/२००७ रोजीच्या पत्राने दिलेली आहे. तसेच अपीलार्थींना संबंधित नस्तीचे अवलोकन करुन कागदपत्रे प्राप्त करुन घेतलेली आहेत. मात्र सुनावणीच्या वेळेला अपीलकर्त्यांचे म्हणणे असे की, नस्तीत असलेल्या कांही कागदपत्रांच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाहीत. तेव्हा दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलकर्त्यांनी दि. ६ डिसेंबर, २००८ रोजी जन माहिति अधिका-यांच्या कार्यालयात जावे व नस्तीतील हवी असलेली कागदपत्रांची निवड करावी व निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन द्याव्यात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ५ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०३०७/अपील क्र.३४४०/०१

श्री. केशवमणी बगईराम यादव -- अपीलार्थी
शिवधारी यादव चाळ, मशरानी लेन,
हेलाव पूल, कुर्ला (पश्चिम) मुंबई - ७०

विरुध्द

१. शिक्षण उपसंचालक -- उत्तरवादी
शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग कार्यालय,
जवाहर बालभवन, चर्नी रोड, मुंबई - ४०० ००४.
२. जन माहिती अधिकारी

शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग कार्यालय,
जवाहर बालभवन, चर्नी रोड, मुंबई - ४०० ००४.

<u>- --विवेचन---</u>

श्रीयुत केशवमणी बगईराम यादव, आयोगाकडे दि. ४/२/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ४ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी ते ज्या शाळेत शिकवतात त्या शाळेच्या मुख्याध्यापकांविरुध्द तक्रार केली होती त्या तक्रारीवर काय कारवाई झाली याबाबतची त्यांना माहिती पाहिजे होती.

सुनावणीच्या वेळेला ज्यांच्या अखत्यारित ही शाळा येत आहे त्याचे शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळ तथा उप आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, या शाळेतील मुख्याध्यापक व अपीलार्थी हे एकमेकांविरुध्द तक्रारी करीत असतात. लोकआयुक्तांकडे सुध्दा त्यांच्या तक्रारीवर सुनावणी झालेली आहे व या एकमेकांविषयीच्या तक्रारींबाबत त्यानी जी संस्था ही शाळा चालविते त्या दुर्गा एज्युकेशन सोसायटीच्या सचिवांना पुढीलप्रमाणे पत्रहि लिहिलेले आहे.

" श्री. केशवमणी ब. यादव व मुख्याध्यापक , शारदा विद्यामंदिर ,दिवा नाका यांच्यामधील विविध तक्रारींबाबत या कार्यालयात पत्रव्यवहार होत असतो. दि. १६/७/२००८ रोजी (मा.लोकआयुक्त यांचेकडील प्राप्त प्रकरणावर ) झालेल्या सुनावणीमध्ये आणि माहिती अधिकार २००५ अंतर्गत दि २५/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये असे निदर्शनास आले की, श्री. राममूर्ती यादव, मुख्याध्यापक, शारदा विद्यामंदिर दिवा नाका व श्री. केशवमणी यादव, सहशिक्षक, शारदा विद्यामंदिर, दिवा नाका हे दोन्ही पक्षक एकमेकांस लेखी माहिती न देणे, एक-दुस-याचे टपाल न स्वीकारणे अशा बाबी त्यांच्या स्तरावर करत असतात. त्यानंतर या कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील प्रमाणे सबबी सुनावणी अधिका-यांकडे मांडल्या जातात. त्यामुळे या कार्यालयाचा महत्वाचा वेळ वाया जातो. उदा. दि. १६/७/२००८ रोजीच्या सुनावणीमध्ये केशवमणी वयादव, यांचे वैद्यकीय बिलाबाबत मुख्याध्यापक व श्री.केशवमणी यादव, या दोघांना परस्परांना सहकार्य करुन बिल फेरसादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. मात्र

याबाबत दोघांनी लेखी स्वरुपात पूर्तता अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला नाही. तसेच दि. २५/११/२००८ रोजीच्यामाहिती अधिका-यांच्या सुनावणीमध्ये मुख्याध्यापक यांनी अर्जदार श्री. केशवमणी यादव यांनी माहिती शुल्क भरले नसल्याचे स्पष्ट केले. मात्र या प्रकरणातली त्यांनी अर्जदारास माहिती शुल्काबाबत दि. २८/११/२००८पर्यंत लेखी कळविले नसल्याचे आढळते.

तरी सदर प्रकरणी आपणास सुचित करण्यात येते की, मुख्याध्यापक यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रकरणांवर लेखी अभिलेख ठेवणे व प्रलंबित प्रकरणांवर नियत वेळेनंतर श्री. केशवमणी यादव यांनी व्यक्तिशः किंवा कार्यालयास दिलेल्या अधिकृत पत्त्यावर स्मरणपत्रे देणे आवश्यक आहे. तरी, मुख्याध्यापक व श्री. केशवमणी यादव यांना आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात, अन्यथा संबंधितावर नियमानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी लागेल याची नोंद घ्यावी. "

उपरोक्त पत्राची प्रत अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. त्यावरुन अपीलार्थीस त्यांच्या तक्रारीवर काय कारवाई झाली हे स्पष्ट होते. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ५ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०२९३/अपील क्र.३४४२/०१

श्री. राजकुमार वजीरचंद वजीरानी -- अपीलार्थी
३०४, ३ रा मजला, साई श्रध्दा को.ऑप.हौ.सो.
जी.जी. रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई - ८०

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (परि-९) -- उत्तरवादी
पोलीस उपआयुक्त परि-९ यांचे कार्यालय,
वांद्रे (पश्चिम) मुंबई
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम पोलीस नियंत्रण कक्ष,
वांद्रे (पश्चिम) मुंबई .

*- --विवेचन---*

श्रीयुत राजकुमार वजीरचंद वजीरानी यांनी आयोगाकडे दि. १०/३/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ४ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी अनुपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

रि. ११/३/२००२ रोजी अपीलार्थीच्या मोटर सायकलला अे.सी.पी. श्रीयुत डी.एस.ठाकुर (मोटरसायकल क्र. **MH-4-AH-1526**) यांच्या गाडील धडक झाल्याची तक्रार नोंदवून घेतली गेली नाही म्हणून अपीलार्थी यांनी पोलीस आयुक्तांकडे दि. १८/३/२००२ रोजी अर्ज केला होता. त्या अर्जावर काय कारवाई झाली म्हणून अपीलार्थी यांनी दि. १/३/२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज केला होता.

दि. ५/३/२००७ रोजीच्या पत्राने तो अर्ज अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग यांचे कार्यालयास पुढील कारवाईसाठी पाठवून दिला आहे. या तक्रारी विरुध्द केलेल्या कारवाईच्या माहितीसाठी सहायक पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष यांच्याशी संपर्क साधावा असे त्या पत्रात लिहिले.

अपीलार्थीनी पुन्हा दि. २०/३/२००७ रोजी संबंधित माहिती अधिका-याला अर्ज केला असता अप्पर पोलीस आयुक्त यांच्याकडे पाठविलेला अर्ज हा त्यांचे कार्यालयात अभिलेखाची पडताळणी केली असता उपलब्ध नाही असे उत्तर देण्यांत आले. त्यामुळे अनेक अर्ज व त्याविरुध्द अनेक माहितीच्या अधिकाराखाली अर्ज व अपीले करुन अंतीमतः पुढील उत्तर मिळाले.

" अर्जदार श्री. राजकुमार वजराणी यांचे तक्रार अर्जान्वये मुलुंड पोलीस ठाणे येथील अभिलेखाची पाहणी करुन सदर कालावधीतील वाहतूक अपघात नोंदवही, मार्गस्थ नोंदवही, आवक-जावक नोंदवही इत्यादी अभिलेख तपासला असता, सदर घटनेबाबत कोणतीही नोंद मिळून येत नसलेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलुंड पोलीस ठाणे यांनी अहवाल सादर केलेला आहे. तसेच यापूर्वी मुलुंड पोलीस ठाणेकडून जा.क्र. १७७४९/०७ दि. २२/१२/०७ अन्वये माहितीच्या अधिकारान्वये मागविलेला अहवाल परिमंडळ ७ या कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे. "

त्यामुळे अपीलार्थी यांच्या तक्रारीचे निराकरण करुन घेण्याची बाब पुन्हा मुळ पदावर आल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दि. १०मार्च २००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

अपीलार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. पण सर्व कागदपत्रांचे वाचन केले असता असे दिसून येते की, जरी सद्य:स्थितीची व कागदपत्रांची परिस्थिती अपीलार्थीस माहिती करुन देण्यात आली असली तरी त्यांची मुळ तक्रार सोडविण्याच्या दृष्टीने कांहीही कारवाई झालेली नाही.

तेव्हा याबाबत अपीलार्थी यांनी पोलीस आयुक्तांशी संपर्क साधणे हे जास्त श्रेयस्कर ठरेल. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ५ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०९२४/अपील क्र.३४४३/०१

श्री. ब्रम्हानंद आर. पान्डेय -- अपीलार्थी
गौरव रेसिडन्सी, ई - १०२, सिनेमॅक्स पुढे,
मेयर बंगल्याच्या समोर, मिरा रोड (पूर्व)
जिल्हा ठाणे.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (परि-९) -- उत्तरवादी
पोलीस उपआयुक्त परि-९ यांचे कार्यालय,
वांद्रे (पश्चिम) मुंबई
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम पोलीस नियंत्रण कक्ष,
वांद्रे (पश्चिम) मुंबई .

- --*विवेचन*---

श्रीयुत ब्रम्हानंद पान्डेय यांनी आयोगाकडे दि. ६/३/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ४ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी दिलेला मुळ अर्ज व त्यावर करण्यात आलेली कारवाई ही घटनाक्रमानुसार जन माहिती अधिकारी यांनी सादर केली ती पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | अर्जाचा दिनांक | माहितीबाबत तपशिल |
|---|---|---|
| १. | अ) अपीलार्थी यांनी दि. १६.०४.०७ रोजीचा मुळ अर्ज या कार्यालयात सादर केला होता. | सदर अर्जास अनुसरू न सहाय्यक माहिती अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त, बांद्रा विभाग, मुंबई यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा पोलीस ठाणे यांनी सादर केलेली माहिती या कार्यालयात जा.क्र.११५७/सपोआ/बांवि /०७, दि.२१.४.०७ अन्वये प्राप्त झालेली माहिती अपिलार्थी यांना या कार्यालयाने जा. क्र. १७२६/सपोआ/माअअ/पानिक/०७, दिनांक २३.४.०७ अन्वये माहिती देण्यात आलेली आहे. |
| २. | अपिलार्थी यांना या कार्यालयाने जा.क्र. १७२६/सपोआ/माअअ/पनिक/०७,<br>दिनांक २३.४.०७ अन्वये देण्यात आलेल्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकार बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयात अपिल अर्ज सादर केला. | सदर अपील अर्जाबाबत मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयात सुनावणी होवून मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम मुंबई यांनी जा.क्र. ८७९/पोउआ/परि-९/माअअ/०७, दि. ११.७.०७ अन्वये आदेश दिले होते. |
| ३. | मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांनी जा.क्र. ८७९/पोउआ/परि-९/माअअ/०७, दि. १९.७.०७ अन्वये आदेश दिले. | मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या आदेशान्वये "सहाय्यक माहिती अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त, बांद्रा विभाग, मुंबई यांनी सदर प्रकरणी संपूर्ण तपासणी करून पोलीस ठाणेच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली आवश्यक माहिती अपिलार्थी यांना देण्यात यावी" असे आदेशामध्ये नमुद केले होते. त्याप्रमाणे सहाय्यक पोलीस आयुक्त, बांद्रा विभाग, मुंबई यांनी त्यांचा कार्यालयीन जा.क्र. २३७१/सपोआ/बांवि/०७, दि. २४.७.०७ अन्वये या कार्यालयात अपिलार्थी श्री. |

| | | |
|---|---|---|
| | | ब्रम्हानंद आर. पांण्डेय यांना दि. २०.५.०७ रोजी मागितलेल्या प्रती देण्यात आल्या. साक्षिदार श्री. ब्रम्हानंद आर. पाण्डेय यांचे विरोधक जेराल्ड जॉन गोम्स व ओझा यांच्यावर चॅप्टर केस क्र. १५/२००७, कोर्ट केस क्र. ३१/०७, कलम १०७ फौदप्रसं अन्वये या कार्यालयात सदरचे प्रकरण चालु आहे. तरी अपिलार्थी यांनी मागितलेली कागदपत्रे ही त्यांना देण्यात आलेली आहेत व त्यांची सदर प्रतीवर दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात आली आहे. |
| ४. | अपिलार्थी यांनी पुन्हा मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयात अर्जावर २० रूपयेचा कोर्ट फी स्टँप न लावता अर्जासोबत मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांचा जा.क्र. ८७९/पोउआ/परि-९/माअअ/०७, दि. ११.७.०७ अन्वयेचा आदेश जोडून अर्ज केला होता. सदरचा अर्ज मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयाने जा.क्र. १३८७/पोउआ/परि-९/०७, दि. २७.११.०७ रोजी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता प्राप्त झाला होता. | मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम मुंबई यांच्या कार्यालयाने जा.क्र. १३८७/पोउआ/परि-९/०७, दि. २७.११.०७ रोजी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता प्राप्त झालेल्या अर्जाची माहिती अपिलार्थी यांना या कार्यालयाने जा.क्र. ७०१३/सपोआ/माअअ/पनिक/०७, दि. २१.१२.०७ अन्वये माहिती पोस्टाने पाठविली आहे. |
| ५. | सदरहू माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झालेने अपिलार्थी यांनी पुन्हा मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयात अपिल अर्ज केला होता. | सदर अपील अर्जाबाबत मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयात सुनावणी होवून मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांनी जा.क्र. २८२/पोउआ/परि-९/माअअ/०८, दि. ३.३.०८ अन्वये आदेश दिले होते. |
| ६. | मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम मुंबई यांनी जा.क्र. २८२/पोउआ/परि-९/माअअ/०८, दि. ३.३.०८ अन्वये आदेश दिले. | मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम मुंबई यांनी जा.क्र. २८२/पोउआ/परि-९/माअअ/०८, दि. ३.३.०८ अन्वये दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रकरणातील अभिलेख प्रत्यक्ष तपासणी |

| | | |
|---|---|---|
| | | करून त्यामध्ये उपलब्ध व त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात आल्या आहेत. त्यांना पाहिजे असलेली कागदपत्रे मिळाल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली असे सहाय्यक पोलीस आयुक्त, बांद्रा विभाग यांनी त्यांचा कार्यालयीन जा.क्र. ६४४/सपोआ/बांवि/०८, दि. ७.३.०८ अन्वये या कार्यालयात पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे. |
| ७. | अपिलार्थी यांनी पुन्हा मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयात अर्जावर २० रूपयेचा कोर्ट फी स्टँप न लावता दिनांक २२.१.०८ रोजी अर्ज केला होता. सदरचा अर्ज मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांनी त्यांचा कार्यालयीन जा.क्र. ११७/पोउआ/परि-९/०८, दि. २५.१.०८ अन्वये माहिती व पुढील कार्यवाहीकरीता या कार्यालयात पाठविण्यात आला होता. | मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपीलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयाने जा.क्र. ११७/पोउआ/परि-९/०८, दि. २५.१.०८ रोजी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता प्राप्त झालेल्या अर्जाची माहिती अपिलार्थी यांना या कार्यालयाने जा.क्र. ८५८/सपोआ/माअअ/पनिक/०८, दि. १३.२.०८ अन्वये पोस्टाने पाठविली आहे. |

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, अपीलार्थीस माहिती देण्याबाबत वेळोवेळी योग्य ती कारवाई करण्यात आलेली आहे. अपीलार्थी जरी सुनावणीस उपस्थित नसले तरी उपस्थित पोलीस इन्स्पेक्टर यांनी अपीलार्थींना दिलेली माहिती मिळाली आहे तसेच केलेल्या कारवाईमुळे ते समाधानी असल्याचे सांगितले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ५ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल   झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१९९५/अपील क्र.३४४७/०१

श्री. दिपक  राजाराम हिंदळेकर -- अपीलार्थी
साईज्योत इमारत, ए-२, प्लॉट नं. १७७-१७८,
सेक्टर  १९, कोपरखैरणे, नवी मुंबई.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (मुख्या १) -- उत्तरवादी
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
मुंबई - ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या १)
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,

मुंबई - ४०० ००१.

<u>- --विवेचन---</u>

श्री. दिपक राजाराम हिंदळेकर यांनी त्यांच्या दि. ३०/१/२००८ रोजीच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसारच्या अर्जान्वये शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांच्याकडे त्यांना देण्यात आलेली स्वेच्छा सेवा निवृत्ती कोणत्या शासन नियमानुसार देण्यात आलेली आहे त्या नियमाच्या प्रतींची मागणी केलेली होती. शासकीय माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी श्रीयुत हिंदळेकर यांना दि. २०/२/००८ रोजी माहिती दिलेली आहे.

प्रथम अपीलात जी माहिती दिलेली आहे ती योग्यच आहे असा निर्णय घेतला होता. त्याविरुध्द अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि. २/५/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील सादर केले आहे त्याची सुनावणी दि. ५ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी द्वितीय अपीलात उपस्थित केलेला मुद्दा व त्यावर जन माहिती अधिका-यांनी केलेला खुलासा पुढीलप्रमाणे आहे.

<u>"मुद्दा -</u> मी दि. ३/५/२००६ रोजी स्वेच्छा निवृत्ती होण्यास परवानगी मिळणेबाबत मा.पोलीस आयुक्त कक्ष-९(६) (कनिष्ठ आस्थापना ) बृहन्मुंबई यांचे कार्यालयास मा. वरिष्ठामार्फत विनंती अर्ज सादर केलेला असताना त्यानंतर जवळ जवळ ६ महिने पूर्ण झाल्यानंतर म्हणजेचदि. २५/११/०२ (म.पू.) पासून मला स्वेच्छा सेवा निवृत्त होण्यास दिलेली परवानगी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम- १९८२ मधील कोणत्या नियमानुसार १ याची प्रमाणित प्रत मिळणेस विनंती आहे.

<u>खुलासा -</u> अपीलार्थी श्री. दिपक राजाराम हिंदळेकर पोलीस हवालदार क्रमांक ३५९/ आर.सी.एफ. पोलीस ठाणे यांचा दि. ३/५/२००६ रोजी स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबतचा विनंती अर्ज पूर्व प्रादेशिक विभाग या कार्यालयास प्राप्त झाला. बृहन्मुंबई पोलीस सहकारी पतसंस्था, नायगांव याची रुपये १,१८,०००/- इतकी कर्जाची रक्कम अर्जदाराकडे बाकी असल्यामुळे त्यांच्या स्वेच्छा निवृत्तीबाबतच्या अर्जावर निर्णय घेण्यात आला नाही. अर्जदारास तसे लेखी कळविण्यात आले. तद्नंतर अपीलार्थी यांनी दिनांक १३/१०/२००६

रोजी पतसंस्थेच्या कर्जाची संपूर्ण रक्कम भरणा केली. याबाबतचे पूर्व प्रादेशिक विभाग या कार्यालयाचे दि.६/११/२००६ व १८/११/२००६ चे पत्र कार्यालयास प्राप्त झाले. सदर पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (१) अन्वये अपीलार्थीची २० वर्षे अर्हतकारी सेवा पूर्ण झाली आहे या कारणास्तव अपीलार्थी यांना पो.प.प.क्र. ४०७/भाग-३ दि. २४/११/२००६ अन्वये दिनांक २५/११/२००६ (म.पू.) पासून स्वेच्छा निवृत्ती देण्यात आली आहे. "

वरील खुलासा योग्य वाटतो. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ५ डिसेंबर, २००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३२५५७/अपील क्र.३४४८/०१

श्री. अशोक तुकाराम राजम -- अपीलार्थी
बी- २४ /२०३, सराफ चौधरी नगर,
ठाकूर संकूल, कांदिवली (पूर्व) मुंबई - ४०० १०१.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (मुख्या १) -- उत्तरवादी
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
मुंबई - ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या १)
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
मुंबई - ४०० ००१.

## - --विवेचन---

श्रीयुत अशोक तुकाराम राजम यांनी सशस्त्र व निशस्त्र पोलीस संवर्ग यांच्या एकत्रित सिनियॉरिटी व त्यात अपीलार्थींच्या जेष्ठतासुचीमधील नावाबाबत कांही माहिती अपीलार्थीने मागितली होती व ती माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलात बिंदुनामावली व जेष्ठतासुचीचे काम चालू आहे व ते काम पूर्ण करुन अपीलार्थीस मागणी केलेली माहिती देण्याचे आदेश प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आहेत.

द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ५/१२/२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळैला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थींनी द्वितीय अपीलात उपस्थित केलेला मुद्दा व

त्यास विभागाने केलेला खुलासा हा पुढीलप्रमाणे आहे.

" मुद्दा - प्रथम अपिलीय अधिकारी/ मा. पोलीस उप आयुक्त (मुख्या-१), बृहन्मुंबई यांच्या आदेशानुसार मी मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत मला मिळालेली नाही. तसेच सदर माहिती मिळाल्यानंतर जनहित दिसुन येईल.

खुलासा - पोलीस अंमलदाराची ज्येष्ठतासुची तयार करण्यासाठी दि. १/१/२००८ रोजी बृहन्मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या सर्व पोलीस अंमलदाराची माहिती संकलित करण्यासाठी कक्ष-९ या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील पोलीस अंमलदाराच्या नांवाच्या वेगवेगळया यादया बृहन्मुंबई पोलीसांच्या www.mumbaipolice.org या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. संबंधित कार्यासनाने सर्व अंमलदारांची माहिती त्यांची सेवापुस्तके तपासुन त्यामध्ये बदल असल्यास त्याची माहिती, विहित नमुन्यात भरुन कक्ष-९ या कार्यालयास पाठविण्याबाबत तसेच ज्या अंमलदारांची नांवे सदर सूचीमध्ये समाविष्ट नाहीत, त्यांची माहिती विहित नमून्यामध्ये सादर करण्याबाबत कक्ष-९ या कार्यालयाचे पत्र क्र.पोआ/कक्ष-९(६,७,८,)/ जेसू/३२०१/२००८ दि. १/८/२००८ अन्वये कळविण्यात आले आहे. तथापि, सदर बाबतची माहिती सर्व कार्यालयाकडून अद्याप प्राप्त झाली नाही. त्यासाठी वेळोवेळी सर्व कार्यालयांना

स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. सदर कामाची व्याप्ती लक्षात घेता ज्येष्ठतासुची पूर्ण करण्यास निश्चित किती कालावधी लागेल हे सांगणे शक्य नाही. दिनांक ३०/११/२००७ रोजीची पोलीस अंमलदारांची संवर्गनिहाय बिंदू नामावली तयार करण्यात आली आहे. परंतु सदर बिंदू नामावली अद्याप प्रमाणित झाली नाही. त्यामुळे त्यापुढील बिंदू नामावली तयार करण्यात आलेली नाही. सदर कामास निश्चित किती कालावधी लागेल हे सांगणे शक्य नाही. "

वस्तुस्थितीप्रमाणे अपीलार्थीस माहिती दिली हे जरी खरे असले तरी ज्येष्ठता यादी अजून तयार न झाल्यामुळे कनिष्ठ पोलीस संवर्गातले अनेक कर्मचारी हे आयोगाकडे याबाबतीत धाव घेतात. ही गोष्ट लक्षात घेता पोलीस आयुक्त यांनी या ज्येष्ठता सूचीचे काम सक्षम यंत्रणा राबवून पूर्ण करुन घ्यावे असे सुचविण्यात येत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

या आदेशाची एक प्रत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात यावी.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१७९२/अपील क्र.३४५२/०१

श्रीमती वंदना वामन नारकर -- अपीलार्थी
पोलीस निरीक्षक, ६०२, गंगा निवास, गणेश गल्ली,
लालबाग, मुंबई १२ .

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी (आस्थापना विभाग ) -- उत्तरवादी
पोलीस महासंचालक कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई.
२. जन माहिती अधिकारी (आस्थापना विभाग )
पोलीस महासंचालक कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई.

*- --विवेचन---*

श्रीमती वंदना वामन नारकर यांनी दि. २५/४/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्याची सुनावणी दि. ५ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींना विशेष सुरक्षा विभागातील अधिका-यांच्या वैयक्तिक सुरक्षा अधिकारी प्रशिक्षणाबाबत माहितीचा तपशील पाहिजे होता. ही माहिती त्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ११/१०/२००५ रोजीच्या अधिसूचनेनुसार गुप्तवार्ता विभागाला माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाहीत असे कारण दर्शवून ही माहिती नाकारण्यात आली व हाच निर्णय प्रथम अपिलात कायम करण्यात आला. म्हणून अपीलार्थी यांनी सदरचे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केलेले आहे.

अपीलकर्त्यांच्या म्हणण्यानुसार अधिनियमाच्या कलम २४(४) नुसार जरी गुप्तवार्ता संघटनांच्या संबंधातील भ्रष्टाचार व मानवी हक्कभंगाचे विषय हे वगळले जाणार नाहीत असे पंरतुकात नमूद केलेले आहे. अपीलार्थींचे म्हणणे असे की, अधिकारी/कर्मचा-यांचे प्रशिक्षण होवो अगर न होवो प्रत्येकालाच देय भत्ते हे मिळतच असतात.

अपीलार्थींच्या विनंतीनुसार विशेष सुरक्षा विभागातील कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या संगनमताने त्यांना देय नसलेले ५० टक्के वेतन वर्षानुवर्षे देत आहे व त्यामुळे शासनाची फसवणूक करीत आहेत. अपीलार्थीनी मागितलेली माहिती गोपनीय, संवेदनाक्षम नाही व ती दिल्याने देशाच्या सुरक्षिततेबद्दल धोका निर्माण होणार नाही. सदर माहिती ही प्रशासकीय कार्यपध्दतीबद्दल असून ती देण्यास राज्य गुप्तवार्ता विभागाने नकार देणे म्हणजे या भ्रष्ट अधिका-यांना संरक्षण दिल्यासारखे आहे.

अपीलार्थीनी मागितलेली माहिती ही, अधिनियमाच्या कलम २४ (४)च्या परंतुकामध्ये जी भ्रष्टाचार व मानवी हक्कभंग यासंबंधी माहिती द्यावी असे म्हटले आहे त्या परंतुकाच्या तरतुदीखाली येते असे आयोगास वाटते. मात्र अपीलार्थीनी ही नांवे मागितलेली आहेत ती नांवे न देता त्यांची आकडेवारी देण्यात यावी. ॲड्व्हान्स बिलांच्या बाबतीत त्यांना माहिती देण्यात यावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थींनी ज्या मुद्दयांवर माहिती मागितलेली आहे त्यातील मुद्दा क्र.१,२ याबाबत सांखिकी स्वरुमात माहिती देण्यात यावी.

मुद्दा क्र. ३ च्या बाबतीत प्रशिक्षण न झाल्याने जर कोणावर कारवाई केली असेल तर अशा किती कर्मचारी/अधिका-यांवर कारवाई केली याची माहिती देण्यात यावी.

तसेच ॲडव्हान्सच्या व प्रलंबित बिलांच्या बाबतीत माहिती देण्यांत यावी.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३२२८८/अपील क्र.३४५७/०१

श्री. चिमनलाल सिधुराम मेघराजानी -- अपीलार्थी
सी-१, अमोल को.ऑप.हौसिंग सोसायटी लि,
व्ही.बी. चाळके मार्ग, मुलुंड (पूर्व) मुंबई - ८१

विरुध्द

१. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (२) -- उत्तरवादी
कोंकण भवन, २ रा मजला, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४.
२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था , टी वार्ड, मुलुंड,
जे. एस. डोसा मार्ग, मुलुंड (प) मुंबई - ८०

*- --विवेचन---*

श्रीयुत चिमनलाल सिधुराम मेघराजानी यांनी दि. ९/१०/२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था टी वार्ड ,मुलुंड यांच्याकडे २३ पानी अर्ज करुन ओम विनायक दर्शन को.ऑप. हौसिंग सोसायटी या संस्थेकडे असलेल्या कागदपत्रांसबंधीची माहिती मिळण्याबाबत अर्ज केला होता.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासनाचे भरीव सहाय्य दिलेले नाही अशा संस्था या वरील कायद्याखाली जनप्राधिकरण नाहीत अशा आशयाचे परिपत्रक सहकार आयुक्त यांनी दि. ८/२/२००६ रोजी प्रसृत केलेले आहे. नुकताच कर्नाटक हायकोर्टाने सुध्दा असाच निर्णय मान्य केलेला आहे. त्यामुळे सहकार कायद्यानुसार सोसायटीची जी माहिती त्या सोसायटीने उपनिबंधकांना द्यावी लागते ती माहिती उपनिबंधक कार्यालयाकडून घेतला येईल. मात्र सोसायटी पातळीवरची माहिती ही अपीलार्थीस सोसायटीकडूनच सहकार कायद्याअंतर्गत मिळवावी लागेल. जर सहजतेने अथवा ती माहिती सोसायटीचे पदाधिकारी/ कर्मचा-यांकडून मिळत नसेल तर सहकार कायद्याअंतर्गत उपनिबंधकाकडे तक्रार करु शकतात, व त्या तक्रारीची दखल घेवून माहिती मिळवून देणे हे उपनिबंधकाचे कर्तव्य असते.

सदरील केसमध्ये अपीलार्थीस लागणारी माहिती ही सोसायटी पातळीवरची असल्यामुळे दोन्ही पक्षाशी चर्चा करुन पुढीलप्रमाणे ठरविण्यांत आले.-

उपनिबंधक यांनी अपीलार्थी व सोसायटीचे पदाधिकारी याना दि. १८/।२/२००८ रोजी अपीलार्थींच्या तक्रारीबाबत चर्चा करण्यासाठी बोलाविले होते. पण अपीलार्थी यांनी मेडिकल टेस्ट १६ डिसेंबर २००८ रोजी होणार असल्यामुळे अपीलार्थींच्या विनंतीवरुन ती तारीख दि. २९/१२/२००८ रोजी करण्यांत आली.

मात्र दि. १४/१२/२००८ पूर्वी उपनिबंधकांनी त्यांचे सहकार अधिका-यांना सोसायटीच्या कार्यालयात पाठवून त्यांनी अपीलार्थीस जी काय माहिती सोसायटीने द्यायची आहे त्याबाबत चर्चा करुन अपीलार्थीस संबंधित माहिती मिळवून द्यावी म्हणजे ज्या माहितीच्या बाबतीत मतभेद असतील तेवढयापुरते उपनिबंधकांकडे येतील. अशा रितीने अपीलार्थींच्या माहितीची निकड भागविण्यात यावी.

<u>*--आदेश----*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ६ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३२४५३/अपील क्र.३४५९/०१

श्री. संदिप ठाकूर -- अपीलार्थी
एफ-८/ आर एच-६/ सेक्टर-६,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

विरुध्द

१. उप सचिव -- उत्तरवादी
नगर विकास विभाग ( नवि/११)
मंत्रालय, मुंबई - ३२
२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
नगर विकास विभाग ( नवि/११)
मंत्रालय, मुंबई - ३२

*- --विवेचन---*

श्रीयुत संदिप ठाकूर यांनी आयोगाकडे दि. २१ मे, २००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केलेले आहे त्या अपीलाची सुनावणी दि. ६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीबाबत नगर विकास विभागाने दि. १२ डिसेंबर २००७ रोजी जर अधिसूचना काढलेली आहे त्यासंदर्भात कांही मुद्दयांच्या कायदेशीर अचुकतेबाबत खातरजमा करुन घेतलेली आहे किंवा नाही यासंदर्भात व या प्रकरणातील त्यांनी नमूद केलेल्या कांही कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केलेली होती.

अपीलार्थींचा माहितीचा अर्ज दि. २८/१/२००८ रोजीचा होता व तो विभागाच्या रजिस्ट्रीमध्ये दि. ३०/१/२००८ रोजी प्राप्त झाल्याची अपीलार्थींकडे पोचपावती आहे. त्यांना यासंदर्भात दि. ३ मार्च २००८ रोजी असे कळविण्यात आले की, संबंधित नस्ती अपीलार्थींच्या विनंतीनुसार पाहण्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली होती त्याप्रमाणे अपीलार्थींनी ज्या कागदपत्रांची मागणी केली होती त्याच्या प्रतींसाठी रु. ५८२/- शुल्क विभागाकडे भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

अपीलार्थींच्या अर्जाचा रोख उलटतपासणी स्वरुपाचा आहे. मात्र अपीलार्थींना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर अपीलार्थीस शोधून काढता येवू शकेल अशा प्रकारे त्यांच्याकडे विभागात उपलब्ध असलेली माहिती देणेहि तेवढेच आवश्यक आहे. तेव्हा विभागाने कुठच्याहि प्रकरणाची तपासणी कशा रितीने संस्करण (Processing) केलेली आहे ते नोटींग साईडला असते. तेव्हा अपीलार्थींनी संपूर्ण नोटींग मागितले नसले तरी या प्रकरणातील संपूर्ण नोटींगची प्रत त्यांना देण्यांत यावी, त्यावरुन त्यांना विभागाने कशा रितीने संस्करण (Processing) केलेले आहे, ते कायदेशीर व कोणत्या व्यक्तीकडून तपासणी करुन घेतली यासंबंधी माहिती मिळू शकेल.

माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये ज्याप्रमाणे लोकसभा किंवा विधानसभा यामध्ये प्रश्नोत्तराच्या स्वरुपात उत्तर व उपप्रश्नांवरील उत्तरे मिळू शकतात. त्या पध्दतीने माहिती मिळू शकेल अशी अपीलार्थींची अपेक्षा असते, पण माहितीच्या अधिकारामध्ये त्या पध्दतीने माहिती देणे हे अपेक्षित नाही. त्यामुळे

अपीलार्थीस संपूर्ण नोटींगच्या प्रती तसेच अपीलार्थींनी जी कागदपत्रे पेज नंबर देवून मागितलेली आहेत ते सर्व कागदपत्र अपीलार्थीस देण्यात यावीत.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती ही त्यांना १ महिन्याच्या आत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ती माहिती अपीलार्थीस विनामूल्य देण्यात यावी.

विभागाने रजिस्ट्रीला प्राप्त झालेला अर्ज हा त्याचदिवशी संबंधित जन माहिती अधिका-यांकडे पोहोचेल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी कटाक्षाने लक्ष द्यावे. म्हणजे माहिती १ महिन्याच्या आत न दिल्यामुळे विनामूल्य माहिती देण्याची पाळी त्यांच्यावर येणार नाही. एक महिन्याचा कालावधी हा प्राधिकरणाकडे ज्यादिवशी अर्ज प्राप्त होतो त्या दिवसापासून मोजायचा असतो. जन माहिती अधिका-यांकडे तो अर्ज प्राप्त होतो त्या दिवसापासून नव्हे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

विभागाने अपीलार्थीस एका आठवडयाच्या आंत माहिती देण्याबाबतची कार्यवाही करावी.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३२५७१/अपील क्र.३४६०/०१

श्री. किशोर काशिनाथ घोगरे -- अपीलार्थी
३८, तृप्ती सदन को ऑप. हौ. सोसायटी,
काजूपाडा, साकीनाका, मुंबई - ७२

विरुध्द

१. अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) -- उत्तरवादी
पूर्व उपनगरे , इंडस्ट्रीयल ॲश्यूरन्स इमारत,
१ ला मजला, चर्चगेट, मुंबई - २०
२. जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी
(अति/निष्का) टोपीवाला कॉलेज, मुलुंड (पश्चिम)
मुंबई - ८०

*- --विवेचन---*

श्रीयुत किशोर काशिनाथ घोगरे, यांनी दि. १/११/२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) यांच्याकडे अर्ज करुन मिठी नदीजवळच्या जरीमरी, संदेशनगर, सहयोग नगर, क्रांतीनगर, मोरारजी नगर, जयभिम नगर, व अन्य जागेवरील पुनर्वसन योजनेबाबत व जनतेकडून सादर केलेले पुरावे, कागदपत्रे , पात्र-अपात्र नागरिकांच्या नावांची यादी वगैरे माहिती मागितली होती.

माहिती न मिळाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलावर निर्णय देतांना अप्पर जिल्हाधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २९/२/२००८ रोजीच्या आदेशात अपीलार्थीस वरील माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, असेहि आदेश दिलेले आहेत.

अपिलीय अधिकारी यांनी दि. २९/१/२००८ रोजी आदेश पारित करुनहि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी पुन्हा अप्पर जिल्हाधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केली होती. त्यावर अपीलार्थीस आयोगाकडे द्वितीय अपील करण्याचे आदेश अपिलीय अधिकारी यांनी दिले. त्यानुसार अपीलार्थींनी आयोगाकडे दि. २८/५/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये द्वितीय अपील सादर केलेले आहे. त्या अपीलाची सुनावणी दि. ६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलकर्ते, विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यात आले की, अपीलार्थींच्या अर्जातील मुद्दा क्र. १,२,व ३ या माहितीशी संबंधित सर्व माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपीलार्थी यांना दुरध्वनीवरुन कळविण्यात आले. तथापि, अपीलार्थी यांनी कार्यालयातून माहिती प्राप्त करुन न घेतल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील वसूली कारकून श्री. आर.व्ही. डवले यांनी दि. २७/२/२००८, १४/३/२००८ ,१९/४/२००८ व दि. ५/५/२००८ रोजी अपीलार्थी यांचे निवासस्थानी त्यांनी मागितलेली माहिती पोहोच करण्यात आली. सदरची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात मोठया प्रमाणात असल्यामुळे (४५०० पेजेस मोफत )ती माहिती टप्प्याटप्प्याने अपीलार्थी यांना पोहोच करण्यात आली हे अपीलार्थी यांनी सुनावणीच्या वेळेस मान्य केले.

अजूनहि पात्र- अपात्र व्यक्तींची यादी अपीलार्थीस मिळालेली नाही असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे.

अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती ही १०० पेजेस पेक्षा जास्त असते त्यावेळेला माहितीच्या व्याप्तीविषयी अपीलार्थीबरोबर चर्चा केल्यास अपीलार्थीसहि पेजेसच्या संख्येबाबत

कल्पना येवू शकते व अर्जदार आपल्या माहितीच्या व्याप्तीत त्यांना वाटले तर सुधारणा सुध्दा करु शकतात. कारण प्रत्येक प्रतीचे शुल्कही आमचे असते. वास्तविक पाहता जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थींचा अर्ज आल्याबरोबर त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली असती व द्यावयाच्या कागदपत्रांची व्याप्ती निश्चित केली असती तर चार ते साडेचारहजार कागदपत्रांच्या प्रती करून देण्याची आवश्यकता भासली नसती.

अपीलार्थी आता म्हणतात की, फार मोठया प्रमाणात माहितीची कल्पनाहि नव्हती आणि तितकी गरजहि नव्हती. मात्र जो महत्वाचा मुद्दा पात्र-अपात्र व्यक्तींची यादी व प्रथम अपात्र ठरविण्यात आले व नंतर पात्र ठरविण्यात आले याची कारणे ही खरी महत्वाची माहिती आहे, व ती जनमाहिती अधिका-यांनी अपीलार्थींना दिलेली नाही. तेव्हा ही माहिती ५ दिवसांचे आत जनमाहिती अधिका-यांनी अपीलार्थींना देण्यांत यावी.

अपीलार्थींच्या अर्जावर अपिलीय अधिका-यांनी निर्णय जेव्हा घेतला त्यावेळेला तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद साळवे, उप जिल्हाधिकारी ,कुर्ला हे होते व त्यांनी अपीलार्थीस माहिती पुरविण्याबाबत कुचराई केली असे अपिलीय अधिका-यांनी सुध्दा त्यांच्या आदेशात नमूद केलेले आहे. अपिलीय अधिका-यांनी आदेश दिल्यानंतर सुध्दा योग्य ती माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी कार्यवाही केलेली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद साळवे जे आता विशेष भू संपादन अधिकारी रायगड या पदावर आहेत असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यांच्याकडून अपीलार्थी यांना माहिती पुरविण्याबाबत झालेल्या दिरंगाईबाबत त्यांना अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती कां लादण्यात येवू नये याची कारणे त्यांनी दि. ३० डिसेंबर, २००८ पर्यंत आयोगास कळवावीत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील मान्य करण्यात येत आहे.

वर निर्देशिल्याप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उर्वरित माहिती ५ दिवसांचे आत देण्यांत यावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद साळवे , विशेष भू-संपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग, जिल्हा - रायगड यांना या आदेशाची प्रत पाठविण्यांत यावी व त्याचा खुलासा श्री.प्रमोद साळवे यांनी दि. ३० डिसेंबर, २००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१५६८/अपील क्र. ३४१५/०१

श्री. अजय मधुसुदन मराठे -- अपीलार्थी
५०४, न्यू सर्वोदय को.हौ.सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट २९ ब, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

विरुध्द

१. सह सचिव (विशेष ) -- उत्तरवादी
पोल-९, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पोल-९, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२

***---विवेचन---***

श्रीयुत अजय मधुसुदन मराठे यांनी आयोगाकडे दि. १४/४/२००८ रोजी, सन १९९३ मध्ये मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोट व खटल्यासंदर्भातील माहितीबाबत अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. ३ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व गृह विभागाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींचा माहिती मिळण्यासंदर्भातला अर्ज हा विधी व न्याय विभाग तसेच पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयाकडे अधिनियमाच्या कलम ६ (३) च्या तरतुदीनुसार परस्पर माहिती देण्यासाठी पाठविण्यात आला. त्यानुसार अपीलार्थीस विधी व न्याय विभागाकडून वकीलांच्या खर्चासंबंधी माहिती मिळाली.

अपीलार्थींना समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी गृह विभागाकडेच अपील दाखल केले होते. पण अपीलार्थींना संबंधित अपिलीय अधिका-यांकडे अपील करण्यास दि. ७ मार्च, २००८ रोजीच्या पत्राने सांगण्यांत आले होते. अपीलार्थींनी तसे केलेले दिसत नाही व आयोगाकडे त्यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

अपीलार्थीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलार्थींच्या माहितीसंबंधी गृह विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, तसेच विधी व न्याय विभाग अशा तिन्ही प्राधिकरणांनी माहिती द्यायला पाहिजे होती. याविषयी विधी व न्याय विभागाकडील माहिती मिळालेली आहे.

अपीलार्थींचा पहिला प्रश्न की इतकी प्रचंड जिवीत व वित्त हानी , कित्येक वर्षे चाललेला खटला यापासून महाराष्ट्र सरकारने काय बोध घेतला, कोणत्या प्रकारचे धोरणात्मक बदल केले व यासंबंधीचा एखादा रिपोर्ट बनविला असल्यास त्याची सर्टिफाईड प्रत ही माहिती गृह विभागानेच द्यायला पाहिजे होती.

इतर जी माहिती आहे ती जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांनी याअगोदरच द्यायला पाहिजे होती. पण ती दिलेली दिसत नाही.

तेव्हा उपरनिर्दिष्ट नमूद केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी गृह विभाग यांनी आवश्यक असल्यास त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांचे मार्गदर्शन घेवून ८ दिवसांचे आंत अपीलार्थीस द्यावी.

तसेच उर्वरित माहिती ही जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त बृहन्मुंबई कार्यालय यांनी एक आठवडयाच्या आंत द्यावी.

वेळेत माहिती न दिल्याबद्दल तसेच अपीलार्थींचा माहितीचा अर्ज अत्यंत सहजपणे (Casually) हाताळल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी ,गृह विभाग व तत्कालीन जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

यास्तव पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे संबंधितांनी कार्यवाही करावी.

वरील आदेशाची प्रत ही जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांनाहि देण्यात यावी. तसेच सहसचिव, गृहविभाग यांनी स्वत: दुरध्वनीद्वारा ही बाब संबंधित पोलीस आयुक्त कार्यालयाच्या संबंधित जन माहिती अधिका-यांच्या निदर्शनास आणावी. म्हणजे ते वेळेत माहिती देण्याची कार्यवाही सत्वर करु शकतील.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ८ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१५६७/अपील क्र. ३४१४/०१

श्री. अजय मधुसुदन मराठे -- अपीलार्थी
५०४, न्यू सर्वोदय को.हौ.सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट २९ ब, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

विरुध्द

१. उप सचिव -- उत्तरवादी
पोल-९, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पोल-९, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२

*- --विवेचन---*

श्रीयुत अजय मधुसुदन मराठे यांनी "घाटकोपर येथे झालेल्या बॉम्बस्फोटाच्या तपासासंबंधी " माहिती मिळण्याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दि. ५/१/२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती देण्याची विनंती केली होती.

श्री. मराठे यांनी केलेल्या अर्जातील बाबी हया विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी, पोल-९, गृह विभाग यांनी दि. ११/१/२००८ रोजीच्या पत्रान्वये श्री.मराठे यांचा अर्ज संबंधित विभाग/ यंत्रणांकडे पाठवून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले व याबाबत अपीलार्थीसही अवगत करण्यात आले आहे.

वरील अनुषंगाने सहायक पोलीस आयुक्त, तथा माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४/२/२००८ च्या पत्रान्वये माहिती श्री. मराठे यांना दिली असून त्यांचे माहितीने समाधान न झाल्यास, त्यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी, पोलीस उपायुक्त (प्रतिबंधक) यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे असे कळविले आहे.

वरीलप्रमाणे कळविण्यात येवून देखिल श्री. मराठे यांनी त्यांच्या दि. २ मार्च, २००८ च्या अर्जान्वये दि. २७/२/२००८ च्या सहायक पोलीस आयुक्त, तथा माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या संदर्भात गृह विभागाकडे अपील केले होते. अपीलार्थींनी अपील गृह विभागाकडे केले असल्यामुळे व अपीलार्थींचा मुळ अर्ज विधी व न्याय विभाग तसेच पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई यांच्याकडे पाठविला असल्यामुळे त्यांचा अपील अर्ज दिनांक ७ मार्च, २००८ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी, विधी व न्याय विभाग व अपिलीय प्राधिकारी, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला व अपीलार्थीस संबंधित अपिलीय प्राधिका-यांशी संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले होते.

असे जरी असले तरी अपीलार्थींनी आयोगाकडे दि. १४/४/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ३ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी गृह विभाग हे उपस्थित होते.

अपीलार्थीस घाटकोपर बॉम्बस्फोटाच्या अन्वेषणासंबंधी ८ मुद्दयांवर माहिती पाहिजे होती. ज्याप्रमाणे अपीलार्थींच्या दुस-या एका अर्जाच्या संदर्भात विधी व न्याय विभागाने श्रीयुत उज्वल निकम यांच्यावर त्या विभागाने जो खर्च केला त्याची माहिती दिलेली आहे. तशीच माहिती जर या केसमध्ये सरकारी वकीला विषयी माहिती उपलब्ध असेल तर ती विधी व न्याय विभागाने अपीलार्थीस त्वरित द्यावी.

जर हा खर्च पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई करीत असेल तर आतापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती ही जन माहिती अधिकारी बृहन्मुंबई पोलीस आयुक्त यांनी अपीलार्थीस द्यावी.

जरी अपीलार्थीचा अर्ज गृह विभागाने इतर प्राधिकरणांना पाठविला असला तरी मुद्दा क्र. ४, ६, ७ व ८ याबाबतीत गृह विभाग पातळीवर असलेली माहिती ही जन माहिती अधिकारी, गृह

विभाग यांनीच अपीलार्थींना द्यायला पाहिजे होती. त्यांना यासंदर्भात कांही अडचण वाटत असल्यास त्यांनी त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक होते, पण तसे झालेले दिसत नाही. तेव्हा जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांना असे निर्देश देण्यांत आले की, आवश्यक वाटल्यास त्यांच्या वरिष्ठांचे मार्गदर्शन घेवून गृह विभागाशी संबंधित असलेली माहिती ही अपीलार्थीस ८ दिवसांच्या आत द्यावी.

विधी व न्याय विभागाने सुध्दा त्यांच्याकडे खर्चाच्या बाबतीत माहिती असल्यास तीहि माहिती अपीलार्थीस परस्पर कळवावी.

अपीलार्थींचा माहितीचा अर्ज अत्यंत सहजपणे (Casually) हाताळल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी ,गृह विभाग व जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*--आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सदरील आदेशाची प्रत ही विधी व न्याय विभागाचे जन माहिती अधिकारी, तसेच जन माहिती अधिकारी बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय यांनाहि देण्यात यावी, व त्यांनी त्यांच्याशी संबंधित माहिती अपीलार्थीस परस्वर ८ दिवसांच्या आंत द्यावी.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ८ डिसेंबर, २००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१५७६/अपील क्र. ३४१६/०१

श्री. अजय मधुसुदन मराठे -- अपीलार्थी
५०४, न्यू सर्वोदय को.हौ.सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट २९ ब, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

विरुध्द

१. अपर पोलीस आयुक्त -- उत्तरवादी
ॲन्टी करप्शन ब्यूरो, बृहन्मुंबई विभाग,
पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - १३
२. जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस उपआयुक्त
ॲन्टी करप्शन ब्यूरो, बृहन्मुंबई विभाग,
पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - १३

*- --विवेचन---*

श्रीयुत अजय मधुसुदन मराठे यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात दि. ५/९/२००७ रोजी जो अर्ज केला होता त्या अर्जानुसार त्यानी सहकारमंत्री यांचे स्वीय सहायक यांच्यावर दाखल केलेल्या गुन्हयाबाबत कांही माहिती विचारली होती.

हा अर्ज जन माहिती अधिकारी ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडे पाठविण्यात आला व त्यास माहिती अधिकारी यांनी २३ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या पत्राने माहिती दिली.

या माहितीने समाधान न झाल्यामुळे जे प्रथम अपील केले होते त्या अपीलाचा दि. ५/।२/२००७ रोजी निर्णय देताना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी श्रीयुत मराठे यांचे मुद्दे अमान्य केले. फक्त श्री. दातकर यांना अटक केली होती का १ अटक केली असल्यास

न्यायालयात हजर केले होते ही माहिती पुरवावी असे आदेश दिले व इतर सर्व माहिती अग्राहय ठरविली. त्यामुळे अपीलार्थी श्रीयुत मराठे यांनी आयोगाकडे दि. १०/४/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि. ३/१२/२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी ॲन्टी करप्शन ब्युरो उपस्थित होते.

अपीलार्थीस गुन्हयाच्या बाबतीतले सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती पाहिजे होत्या. पण अजूनहि सदरील गुन्हयाचा तपास पूर्ण झाला नसल्यामुळे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८ (१) (एच) अन्वये माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे अपिलीय अधिका-यांनी सुध्दा मान्य केलेले आहे.

गुन्हयाचा तपास चालू असतांना जर गुन्हयासंबंधी माहिती, माहितीच्या अधिकारात संबंधितांना किंवा ज्यांचा संबंध नाही अशा नागरिकांना दिली तर त्याचा तपासावर विपरीत परिणाम होवू शकतो हे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे श्रीयुत दातकर यांच्यावर एकूण किती गुन्हे दाखल झाले याची माहिती एकत्रित स्वरुपात नाही. त्यामुळे खरोखरच अशा माहितीची गरज भासल्यास ती प्रत्येक पोलीस स्टेशनकडून विचारावी लागेल व अशा रितीने माहिती गोळा करुन देणे ही माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नाही. ज्या कोणत्या बाबीची माहिती ही एकत्रित स्वरुपाची ठेवावी हे तो तो विभागच ठरवेल व तशी माहिती एकत्रित गोळा करण्याची पध्दत असल्यास ती निश्चितपणे ती एकत्रित माहिती अपीलार्थीस मागण्याचा अधिकार आहे. मात्र सर्व पोलीस स्टेशनकडून ही माहिती गोळा करुन द्या असा आग्रह धरता येणार नाही.

श्री.दातकर यांच्यावरील कारवाईच्या बाबतीत कोणाकडूनहि कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप झालेला नाही असे स्पष्ट उत्तरही ॲन्टी करप्शन ब्युरो यांनी दिलेले आहे.

वरील विवेचनावरुन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयात कुठचाहि बदल करण्याची आयोगास गरज वाटत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ८ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३२५७६/अपील क्र.३४६१/०१

श्री. हरिनाथ रामप्यारे तिवारी -- अपीलार्थी
१०७६/१४, न्यू चाळ, वरळी कोळीवाडा,
मुंबई - ४०० ०३०.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -- उत्तरवादी
झोन -३ यांचे कार्यालय, मुंबई.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष, भायखळा,
मुंबई - ३३.

*- --विवेचन---*

श्री. हरिनाथ रामप्यारे तिवारी, मुंबई यांनी आयोगाकडे दि. ३०/५/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपीलार्थीस बृहन्मुंबई महानगरपालिका जी-दक्षिण विभाग दादर यांच्या पत्रानुसार स्काउट ॲन्ड गाईड संघ मैदान, वरळी कोळीवाडा या ठिकाणी असलेल्या अनधिकृत बांधकामावर पोलीस स्टेशन मार्फत काय कारवाई चालू आहे याची माहिती दि. १६/२/२००८ रोजीच्या अर्जानुसार पाहिजे होती. अपूर्ण उत्तर मिळाल्याचे कारण दाखवून अपीलार्थी यांनी दि. २९/३/२००८ रोजी प्रथम अपील केले होते. त्या अपीलाचा निर्णय दि. ११/४/२००८ रोजी देताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा पोलीस ठाणे यांच्याकडून काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादर यांच्याकडून प्राप्त करुन सदर माहिती ७ दिवसांत अपीलार्थी यांना देण्याचे आदेश प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिले होते. पण ही माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि. ३०/५/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि. ६/१२/२००८ रोजी घेण्यांत आली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादर पोलीस ठाणे यांनी शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांच्या दि. १५/४/२००८ रोजी या संबंधात विशेष पोलीस ठाणे खटला क्र.३/२००७, कलम ५२,४३ अन्वये दाखल करणेत आलेला आहे असे कळविलेले आहे. मात्र अपीलार्थीस ही प्रत मिळालेली नाही. ती प्रत आज सुनावणीच्या वेळेला देण्यांत आली. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ८ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०९५६/अपील क्र. ३४२७/०१

श्री. विजय के. मंथेना -- अपीलार्थी
हरियानवाला लेन, अब्दुल्ला मेंशन,
इमारत क्र.७, रुम नं. ३४, स्टेशन रोड,
कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७०

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -- उत्तरवादी
प्रमुख वैद्यकीय अधीक्षक (उपनगरीय रुग्णालये)
बृहन्मुंबई महानगरपालिका, के.बी. भाभा रुग्णालय इमारत,
७वा मजला, आर.के. पाटकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

२. जन माहिती अधिकारी
प्रमुख वैद्यकीय अधीक्षक (उपनगरीय रुग्णालये)
बृहन्मुंबई महानगरपालिका, के.बी. भाभा रुग्णालय इमारत,
७वा मजला, आर.के. पाटकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

*---विवेचन---*

श्रीयुत विजय के.मंथेना यांनी आयोगाकडे दि. ११/३/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. ३/१२/२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींच्या माहितीच्या मागणीच्या संदर्भात विभागातर्फे पुढील निवेदन केले.

" दिनांक १२/११/२००७ च्या अर्जान्वये श्री. मंथेना यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यांत आली आहे व त्याबाबतच्या दि. ८/१/२००८ च्या अर्जान्वये अपीलाची सुनावणी दि. २९/१/०८ रोजी घेण्यांत आली.

अपील सुनावणीतील आदेशान्वये श्री. मंथेना यांना बी.एस.ई.एस. बरोबर झालेल्या प्रथम कराराची प्रत व ब्रम्हकुमारीज ग्लोबल हॉस्पीटल अॅंड रिसर्च सेंटर यांच्या बरोबर झालेल्या सर्व बैठकांच्या छायांकित प्रती श्री. मंथेना यांना देण्यात आल्या आहेत."

अपीलार्थीस कोणती माहिती मिळाली नाही असे विचारले असता त्यांनी मुळ अर्जातील नं. २ असे सांगितले. पण तीहि माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे असेच दिसून आले. अपीलार्थीस सर्वच माहिती दिलेली असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ८ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३३३४०/अपील क्र.३४६९/०१

ॲड् आर. एन. कच्छवे -- अपीलार्थी
९८, २ रा मजला, एस्प्लेनेड मेंशन,
काळाघोडा, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -- उत्तरवादी
परिमंडळ १२, शैलेंद्र नगर, दहिसर (पूर्व)
मुंबई - ६८
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व) मुंबई - ६८

*- --विवेचन---*

ॲड्. आर.एन. कच्छवे यांनी आयोगाकडे दि. १० जुलै, २००८ रोजी प्राप्त झालेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ८ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळैला अपीलकर्त्यांचे वतीने श्रीयुत सुधीर यशवंत सुर्वे व जन माहिती अधिकारी अधिकारी उपस्थित होते.

सदरील अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचा अहवाल पुढीलप्रमाणे-

"अपीलार्थी श्री. आर.एन. कच्छवे यांनी माहिती मिळण्याकरिता केलेला अर्ज जन माहिती अधिका-यांचे कार्यालयात दि. २५/४/०८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जामध्ये श्री. कृपाल मणियार यांनी श्री.सुधीर यशवंत सुर्वे यांच्या विरोधात फ्लॅट विक्री संदर्भात मे २००७ साली समतानगर पोलीस ठाणे येथे केलेल्या तक्रारी अर्जाबाबतची कारवाईची माहिती मागितली होती.

सदरची महिती ही समतानगर पोलीस ठाणेशी संबंधित असल्याने समतानगर पोलीस ठाणेकडून माहिती मागविण्यात आली व ती माहिती दि. ७/५/२००८ रोजी जन माहिती अधिका-यांचे कार्यालयास प्राप्त झाली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्याने चौकशी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री. गौड यांनी सदरचे कागदपत्र दप्तरी दाखल केले व मागणी

केलेले दस्ताऐवज पोलीस ठाणे अभिलेख तपासले असता मिळून येत नाही असे कळविले. प्राप्त माहिती अपीलार्थी यांचे वतीने श्री.सुधीर सुर्वे यांनी दि. ९/५/०८ रोजी स्वीकारली.

दिलेल्या माहितीने अपीलार्थी यांचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १२ मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. दि. २८/५/२००८ रोजी सुनावणी होवून समतानगर पोलीस ठाणे येथील सर्व अभिलेख पुन्हा पडताळून माहिती अपीलार्थीस पुरवावी असे आदेश पारित करण्यात आले. त्या अनुषंगाने समतानगर पोलीस ठाणेकडून पुन्हा माहिती मागविण्यात आली असता प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्रांचा शोध घेतला असता मिळून न आल्याबाबत पो.उ.नि. गौड, समतानगर पोलीस ठाणे यांनी लेखी पत्राद्वारे कळविले व ती माहिती देखिल अपीलार्थीस पुरविण्यात आली आहे.

समतानगर पोलीस ठाणेकडून प्राप्त अहवालामध्ये भविष्यात कागदपत्र मिळून आल्यास अपीलार्थी यांना पुरविण्यात येतील याची तजविज ठेवण्याबाबत नमुद केले आहे. अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामार्फत उत्तर विहित वेळेत देण्यात आले आहे. "

अपीलार्थीस हवे असलेले कागदपत्र उपलब्ध नाहीत व सदरचे प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्यामुळे सदरचे कागदपत्र दप्तरदाखल करण्यात आले व ते प्रयत्न करुनहि सापडत नाहीत. पुन्हा अभिलेख पडताळणी करुन सुध्दा कागदपत्रे साडपत नाहीत. तसेच सदरील प्रकरण फौजदारी स्वरुपाचे नसल्यामुळे नोटीस कागढण्याव्यतिरिक्त दुसरी कार्यवाही सुध्दा करण्यात आलेली नाही असे सुनावणीच्या वेळेस सांगण्यांत आले.

अपीलार्थी मात्र कागदपत्रे हवीत याबाबत आग्रही आहेत. पण नमूद केलेल्या परिस्थितीत आजघटकेला कागदपत्रे उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती नाईलाजाने मान्य करावी लागेल.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ८ डिसेंबर, २००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३०९२२/अपील क्र.३४४४/०१

श्री. कलीम खान ताज मोहमद खान -- अपीलार्थी
जमनादास वासनजी चाळ नं.९१/९३,
शॉप नं. २०/२१, ७ वी क्रॉस गल्ली,
एस.पी. मार्ग, कामाठीपुरा, मुंबई - ४०० ००८.

विरुध्द

१. सहायक आयुक्त -- उत्तरवादी
ई विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
१० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा, (पश्चिम)
मुंबई - ४०० ००८.
२. जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
सहायक आयुक्त ई विभाग यांचे कार्यालय,
१० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा, (पश्चिम)
मुंबई - ४०० ००८.

*- --विवेचन---*

श्रीयुत कलीम खान ताज मोहमद खान ,कामाठीपुरा यांनी आयोगाकडे दि. २९/३/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये दाखल केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ५ व ६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होती.

अपीलार्थींच्या दि. ४/१/२००८ रोजी अर्जानुसार त्यांच्या मुलाचे झोपडे असताना ते झोपडे तोडण्याची नोटीस श्री. पप्पू खान नांवाच्या व्यक्तीस दिली याचे कायदेशीरत्व याबाबत माहिती मागितली.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर न पाठविल्यामुळे अपीलार्थींनी जे अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये जे प्रथम अपील सादर केले त्या अपीलावर दि. ५/२/२००८ रोजी निर्णय देवून अपीलार्थींचा अर्ज निकाली काढतांना पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

" सार्वजनिक माहिती अधिकारी यांनी आता असे कळविले आहे की, झोपडी तोडण्याबाबतची दि. २९/१/२००५ रोजीची नोटीस ही श्री. कलीम खान यांचे नावानेच दिलेली असून नोटीस देते वेळी घरात श्री. कलीम खान प्रत्यक्ष हजर नसल्याने त्यांचे घरात उपस्थित असलेले श्री. पप्पुखान यांचेकडे नोटीस देण्यांत आली. याबाबत सार्वजनिक माहिती अधिकारी यांनी असेही स्पष्ट केले आहे की, सदर नोटीस श्री. कलीम खान यांना मिळालेली असून श्री. कलीम खान यांनी दिनांक ९ जून २००५ रोजी मा. उपमहापौर श्री. दिलीप पटेल तसेच दिनांक ५/८/२००५रोजी मा. आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनासोबत दि. २९/१/२००५ च्या नोटीशीची प्रत जोडलेली आहे. त्यामुळे आपण उपस्थित केलेला दुस-याच व्यक्तीस प्रत देवून ती दरवाज्यावर न चिपकवता व चिपकवण्याचा फोटो न घेता झोपडे तोडले हा मुद्दा गैरलागू ठरतो. त्यामुळे आपणा विरुध्द केलेली कारवाई नियमानुसार असून चाचणी लेखा परीक्षा व दक्षता अधिकारी यांनी केलेल्या तपासणीतही ते सिध्द झालेले आहे. सदर प्रकरणात आपणास कोणत्याही कागदपत्राच्या प्रती आपण माहिती अधिका-याकडून मागितलेल्या नाहीत. "

यावरुन अपीलार्थींनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत वस्तुस्थिती स्पष्ट होते

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असेहि सांगितले की, अपीलार्थींनी झोपडे तोडण्याच्या बाबतीत मानवी हक्क आयोगाकडे धाव घेतली होती. पण सदरचा विषय त्यांच्याशी संबंधित नसल्यामुळे मानवी हक्क आयोगाने त्याची दखल घेतली नाही. जन माहिती
अधिकारी यांनी दिलेली माहिती अपीलार्थींच्या अर्जाच्या अनुषंगाने समर्पक वाटत असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>*---आदेश---*</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ८ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/रामाआ/अपील/सीआर १७/०२

श्री. राजेश माधवलाल खंडेलवाल -- अपीलार्थी
खंडेलवाल बंगला, लोया रोड, इगतपुरी,
ता.इगतपुरी,जि.नासिक- ४२२ ४०३.

विरुध्द

१. उप आयुक्त (सा.प्र.) -- उत्तरवादी
नासिक विभाग, नासिक.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी
इगतपुरी नगरपालिका, इगतपुरी.

*- --विवेचन---*

श्री. राजेश माधवलाल खंडेलवाल, रा. इगतपूरी यांनी त्यांचे दि. १२/२/२००७ चे अर्जान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ अन्वये मुख्याधिकारी, नगरपरिषद इगतपुरी यांचेकडे इगतपुरी नगरपरिषद क्षेत्रातील सिटी सर्वे नं. ७७४ क मधील अतिक्रमित बांधकामाबाबत पोलीस स्टेशनकडे इगतपुरी यांना दि. ४/७/२००६ रोजी दिलेल्या रिपोर्टची नक्कल वइतर कागदपत्रांची मागणी केलेली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद इगतपुरी यांनी त्यांचे दि. १२/३/२००७ चे पत्रान्वये सदर माहिती संकलित करण्यास त्यांना १५ दिवसाचा कालावधी लागणार आहे असे कळविले होते. त्यावर अपीलार्थी यांना माहिती मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांचे दि. १२/४/२००७ चे अर्जान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१)अन्वये उपायुक्त (सा.प्र.वि) नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलमेमोसोबतही त्यांनी जोडपत्र

जोडलेले आहे.  त्यावर अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.वि.)नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे दि. २५/६/२००७ चे आदेशान्वये अपील अंशतः मान्य करून माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना त्यांचे मागणीनुसार अद्याप न दिलेली माहिती अपिलीय आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिले.  अपिलीय अधिका-यांच्या आदेशामध्ये असेहि नमूद करण्यात आले आहे की, मुख्याधिकारी, नगरपरिषद इगतपुरी यांनी अपीलार्थीसाठी संकलीत केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी टाळाटाळ केलेली आहे. त्यामुळे दि. ३१/५/२००७ रोजी सदरहू माहिती अपीलार्थी यांना नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आली होती.  त्याच आदेशात असेहि नमूद करण्यात आले आहे की, नगरपरिषद इगतपुरी यांचेकडून दि. ६/३/२००७ चे पत्रान्वये पाठविलेली १ ते ५ मुद्दयांवरील माहिती विलंबाने  प्राप्त झाल्याचे अपीलार्थीनी मान्यहि केले होते.  त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. १०/७/२००७ चे पत्राद्वारे ७ मुद्दयावर अपीलार्थी यांना माहिती पाठविलेली आहे व त्यासोबत कागदपत्रांच्या प्रतीही पुरविलेल्या आहेत.  परंतु  याने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी त्यांचे दि. ६/८/२००७ चे पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये  राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलाची सुनावणी दि. २९/७/२००८ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती.  त्यावेळेस अपीलार्थी स्वतः हजर होते.  तसेच जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद इगतपुरी व अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, नाशिक विभाग, नाशिक  हे उपस्थित होते. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले.  सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद सादर केला.  त्यात त्यांनी अपिलीय अधिकारी यांचा निर्णय चुकीचा असून कायद्याच्या तरतुदीचे पालन केलेले दिसून येत नाही, असे नमूद केले आहे.  त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अपूर्ण माहिती दिल्याचेहि त्यांनी पुढे नमूद केले आहे.  यासंदर्भाने जन माहिती अधिकारी  यांनी असे सांगितले की,  अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती व्यक्तिशः  मागितली होती. परंत त्यांनी  न स्वीकारल्यामुळे ती  दि. १३/३/२००७ रोजी नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशील काळजीपूर्वक पाहिला असता असे निदर्शनास येते की, श्री. वसंत भुतडा नावाच्या व्यक्तीचा सांडपाण्याचा पि.व्ही.सी. पाईप

बसविल्यासंबंधीच्या जागेबाबत वाद आहे. यासंदर्भाने अपीलार्थी यांनी अनेक प्राधिकरणाकडे तक्रारी अर्जहि केलेले आहेत. त्यासंदर्भाने नगरपालिकेच्या स्तरावर श्री.भुतडा यांनी बसविलेल्या सांडपाण्याच्या व शौचालयाचा पाईप काढण्याची कार्यवाही नगरपालिकेकडून चालू असल्याचे दिसते. ज्या जागेत अनधिकृत पाईप टाकण्यात आलेले आहेत त्या जागेची मोजणी करुन घ्यावी अशाहि सूचना नगरपालिकेकडून श्री. भुतडा यांना देण्यांत आल्याचे दिसते. सारांशाने या प्रकरणामध्ये श्री.भुतडा व अपीलार्थी यांचेमध्ये बांधकामाबाबतचा वाद चालू आहे त्या अनुषंगाने नगरपालिकेकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगरपालिका अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ चे तरतुदीनुसार कायदेशीर कार्यवाहीही चालू असल्याचे दिसते. ती कार्यवाही करण्याचा नगरपालिकेकडून प्रयास चालू आहे. आणि तशा प्रकारची माहिती नगरपालिकेने त्यांच्या दि. ६/३/२००७ च्या पत्रान्वये सविस्तर रुपाने अपीलार्थी यांना कळविले असल्याचेहि उपलब्ध कागदपत्रावरुन दिसते. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी , नगरपरिषद इगतपुरी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थी यांना पुरविण्याचा प्रयास केलेला आहे. परंतु या माहितीने अपीलार्थी यांचे समाधान होणे शक्य नाही अशी माझी धारणा आहे. कारण मुळातच अपीलार्थी व श्री.भुतडा यांच्यामधील वादातील जमिनीमध्ये टाकण्यात आलेल्या पाईपलाईनच्या प्रश्नाच्या बाबतीत अपीलार्थी यांना रिलीफ हवा आहे. तो रिलीफ माहितीच्या अधिकाराच्या तरतुदीच्या माध्यमातुन मिळणे अपेक्षित नाही. त्यासाठी अपीलार्थी यांनी सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे गरजेचे आहे. असे जरी असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा परामर्श घेणेहि आवश्यक आहे.

अपीलार्थीनी त्यांचा अर्ज दि. १२/२/२००७ रोजी नगरपालिकेकडे दिला. म्हणजेच माहिती दि. १४/३/२००७ पर्यंत देणे आवश्यक होते. माहिती संकलित करणेस आणखी १५ दिवस लागतील असे अपीलार्थीस कळविण्यात आले होते. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम यामध्ये असे कळविण्याची जरी तरतुदी नसली तरी क्लिष्ट प्रकरणात वेळ लागू शकतो व तसे अपीलार्थीस कळविण्यात आले ही कृति योग्य आहे. मात्र असे करत असतांना एका महिन्याचे आत माहिती न मिळाल्यास माहिती विनामूल्य मिळविण्याचा हक्क मिळतो तो त्याचेकडून हिरावून घेता येणार नाही. अपीलार्थीस अशी कल्पना दिली असल्यास त्या कालावधिपुरता शास्ती लावण्या न लावण्याबाबत मात्र योग्य परिस्थितीत विचार होऊ

शकतो. तेव्हा अपीलार्थीनी रु १२/- भरले नाही म्हणून माहिती देण्यास विलंब झाला आहे असा पवित्रा घेता येणार नाही. दि. १४/३/२००७ नंतर दिलेली माहिती ही विनामूल्यच द्यावयास पाहिजे.

अपिलीय अधिका-यांच्या निर्णयावरुन सुध्दा त्या सुनावणीच्या दिवसापर्यंत कांही माहिती अपीलार्थीस देण्यात आली नव्हती हे स्पष्ट होते. अपीलार्थीस कळवून सुध्दा त्यांनी माहिती नेली नाही असे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे आहे. पण तसे केल्याचा स्पष्ट पुरावा नाही. अपिलीय अधिका-यांनी त्यांना शास्ती लावण्याचे अधिकार नसल्याने त्याबाबत आदेश दिलेले नाहीत व ते योग्यच आहे.

अपीलार्थीस माहिती देण्यात झालेला विलंब दि. २९/३/२००७ पासून आहे. पण अपिलीय अधिका-यांच्या सुनावणीस झालेल्याा दिड महिन्याच्या (४५ दिवस) विलंबास अपीलार्थी यांनी केलेली तशी विनंतीहि कारणीभूत आहे.

अपीलार्थीनीहि याआधीच्या अर्जाची माहिती न्यावयास टाळाटाळ केली व शेवटी दि. १/६/२००७ रोजी माहिती पोष्टाने पाठविण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. पण माहिती नेण्यास टाळाटाळ केली असे दर्शविणारा ठोस पुरावा नाही. मात्र अपीलकर्त्यांसहि आपण माहिती घेण्यास गेलो होतो हेहि सिध्द करणे कठीण आहे. कारण प्रत्येक कार्यालयात असतेच असे नाही. या गोष्टीचा विचार करुनहि झालेला विलंब हा दि. ३०/३/२००७ ते प्रथम अपील दाखल केल्यापर्यंत दिवसाचा ( दि. १२/४/२००७ ) एवढाच धरण्यात येत आहे. अपिलीय अधिका-यांनी आदेशात नमूद केल्याप्रमाणे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलार्थीस माहिती देण्यात आली आहे. विलंबाचा कालावधि १४ दिवस निश्चित करण्यात येवून त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर २५० X १४ = ३५०० रु ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती माहे जानेवारी, २००९ महिन्यात मिळणा-या पगारातून वसूल करुन शासनाच्या निर्देशाप्रमाणे कोषागारामध्ये भरण्यात यावी.

---*आदेश*---

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

शास्तीबाबतचे आदेश अंमलात आणण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचेवर टाकण्यात येत आहे. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, यांनी वर दिलेल्या निर्देशाप्रमाणे शास्तीसंबंधी कार्यवाही पूर्ण करुन १५ जानेवारी पर्यंत पूर्तता अहवाल पाठवावा.

( डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १० डिसेंबर, २००८

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३२८६४/अपील क्र.३४६४/०१

श्री. जितेंद्र आर. सुतार -- अपीलार्थी
के.एल. मिस्त्री चाळ, रुम नं. १३,
खोत कुआ रोड, मालाड (पूर्व)
मुंबई - ४०० ०९७.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -- उत्तरवादी
परिमंडळ १२, शैलेंद्र नगर, दहिसर (पूर्व)
मुंबई - ४०० ०९७.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व) मुंबई - ४०० १०१.

*- --विवेचन---*

श्रीयुत जितेंद्र आर. सुतार, मालाड (पूर्व) मुंबई ९७ , (पोलीसांच्या म्हणण्यानुसार सध्या हद्दपार) यांनी आयोगाकडे दि. १८/६/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ६ व ८ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस बोरीवली पोलीस लॉकअपमध्ये आरोपींना खाण्या पिण्याचे पदार्थ, इतर सुविधा, जेवण, याबाबतीत माहिती पाहिजे होती. मात्र या माहितीचा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंध असल्याचा सकृतदर्शनी आढळून येत नसल्यामुळे व जर माहिती व्यापक

लोकहिताच्या दृष्टीने उघड करणे समर्थनीय आहे असे वाटत नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम ८ (ञ) नुसार अपीलार्थीस माहिती न देण्याचा निर्णय जन माहिती अधिकारी यांनी घेतला. अपिलीय अधिका-यांनी सुध्दा अपीलार्थींचा हा अर्ज दि. २३/५/२००८ रोजी च्या आदेशाने मान्य केला. त्याविरुध्दचे सदरचे अपील आहे.

पोलीस लॉकअपमध्ये असतांना ट्रायल्सना कोणती व्यवस्था उदा. जेवण वगैरे मिळू शकते याबाबत जे नियम असतील त्यासंबंधीचे परिपत्रक किंवा डॉक्युमेंटस्च्या प्रती अपीलार्थीस देण्यात याव्यात. बोरीवली लॉकअप मध्ये सुविधांबाबत जी माहिती रेकॉर्डला उपलब्ध असेल ती माहितीहि अपीलार्थीस देण्यात यावी.

*---आदेश---*

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
वर निर्देशिल्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी कार्यवाही करावी.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ११ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/२९८२१/अपील क्र.३२६१/०१

श्री. चेतन कोठारी --अपीलार्थी
५२, ओसीयानिक अपार्टमेंट,
डॉ. राजबली पटेल लेन, बी.देसाई रोड, मुंबई २६

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (मुख्यालय १) --उत्तरवादी.
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
तळमजला, क्रॉफर्ड मार्केट पोलीस स्टेशन मुंबई - १
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
(मुख्यालय १) पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट पोलीस स्टेशन,मुंबई १

*---विवेचन---*

श्री. चेतन कोठारी यांनी आयोगाकडे दि. २०/२/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. २४/११/२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळैला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस त्यांच्या दि. ४/१/२००८ रोजीच्या अर्जानुसार ११ मुद्दयांवर शस्त्र परवान्यासंबंधी माहिती पाहिजे होती, व १० मुद्दयांबाबतीत अपीलार्थीस माहिती देण्यांत आलेली आहे. ज्या मुद्दयाबाबत माहिती देण्यात आलेली नाही तो मुद्दा म्हणजे ज्या १८ व्यक्तींचा शस्त्रपरवाना रद्द करण्यात आला आहे त्यांची नांवे मिळण्याबाबतचा आहे. जन माहिती अधिका-यांनी असे नमूद केलेले आहे की, अशा व्यक्तींना स्व:संरक्षणार्थ परवाने दिले जातात व जर आता

त्यांच्याकडे शस्त्र नाही असे कळले तर त्यांचे जिवीत धोक्यात असण्याची शक्यता असू शकते. या कारणास्तव ही माहिती नाकारण्यात आलेली आहे.

ज्यांचे जिवीत धोक्यात असते म्हणून त्यांना शस्त्रपरवाना हवा असतो, त्यांनी शस्त्रपरवान्यासंबंधीच्या अटी व शर्तींचे पालन करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. जन माहिती अधिका-यांनी कोणत्या परिस्थितीत परवाना रद्द केला जावू शकतो याची माहिती देण्यास सांगितले असता पुढील कारणे दिलेली आहेत.

१. शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम १७ (३) (अ)अन्वये शस्त्र धारण करणारा शस्त्रधारण करण्यास अपात्र ठरला (शारिरिकदृष्टया)

२. कलम १७(३) (ब) अन्वये शस्त्र परवाना धारकाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखली नाही

३. कलम १७(३)(क) शस्त्र परवाना धारकाने परवाना मंजूर करतांना चुकीची माहिती दिली अथवा खरी माहिती लपविली असेल असे निदर्शनास आलेनंतर

४. कलम १७(३)(ड) शस्त्र परवाना धारकाने परवाना मंजूर करतांना लादण्यात आलेल्या शर्तीचा भंग केल्यास .

१. विहित वेळेत नुतनीकरण केले नाही.

२. शस्त्राची निगा व देखभाल योग्य प्रकारे केली नाही.

३. शस्त्राचा दुरुपयोग/गैरवापर करणे, धमकावणे.

४. गंभीर गुन्हा त्याचेविरुध्द दाखल झाल्यास.

५. इतर प्राधिकरणाकडून शस्त्र परवाना दिला गेल्यास त्याची नोंदणी स्थानिक पोलीस ठाणे व स्थानिक नोंदणी प्राधिकारी यांचेकडे वास्तव्यास आल्यापासून ३० दिवसाचे आत नोंदणी न करणे.

६. शस्त्र दुस-या ईसमाच्या ताब्यात बाळगण्यास देणे.

७. परवान्यात नमुद केल्यापेक्षा जास्त प्रमाणात काडतुसे ठेवणे.

८. शस्त्राचा निष्काळजीपणाने वापर केल्यास.

जर एखादया कायद्याचे पालन केले नसल्यास त्याचे परिणाम भोगण्याची सिध्दता सुध्दा त्या परवानाधारकाची तयारी असावयास पाहिजे. त्यामुळे परवान्याच्या अटी व शर्ती न पाळल्याबद्दल जर कोणाचा परवाना रद्द करण्यात आला तर त्यांच्या नांवाची माहितीही सर्वसाधारणपणे जनहितार्थ उपलब्ध करुन द्यायला पाहिजे असेच आयोगाचे मत आहे. मात्र ही माहिती तृतिय पक्षासंबंधीची असल्यामुळे त्यांचेहि म्हणणे ऐकून घेणे हेहि तेवढेच क्रमप्राप्त आहे. तेव्हा ज्या १८ व्यक्तींचे परवाने रद्द करण्यात आले आहेत त्यांची नांवे माहितीच्या अधिकारांतर्गत देण्यास त्यांची कांही हरकत आहे का असे त्यांना विचारण्यात यावे. व त्यांचे निवेदनाचा विचार करुन प्रत्येक केसच्या बाबतीत यथायोग्य निर्णय जन माहिती अधिकारी यांनी घ्यावा व अपीलार्थीस तृतिय पक्षास संधी देवून १८ व्यक्तींची नांवे उपलब्ध करुन देण्याबाबतीतला निर्णय घ्यावा. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये तृतिय पक्षाची माहिती यासंदर्भात ज्या तरतुदी आहेत त्यांचे पालन करुन वरील माहितीच्या बाबतीत जन माहिती अधिका-यांनी अंतीम निर्णय घ्यावा व अपीलार्थीस तसे कळवावे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ११ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/२९५११/अपील क्र.३२८१/०१

ॲड् परविंदरसिंग सेठी --अपीलार्थी
श्री. गंगाधर दुबे यांच्या वतीने
ॲड्. पी.डब्ल्यू डी. कार्यालय,
शिवडी फास्ट ट्रॅक कोर्टच्या बाजूला, झकेरीया बंदर रोड,
शिवडी, मुंबई - ४०० ०१५.

विरुध्द

१. आयुक्त --उत्तरवादी.
महिला व बाल विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे, ३ चर्च रोड, पुणे- ४११ ००१.
२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा महिला वबाल विकास अधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा, नवीन प्रशासकीय इमारत,
टप्पा क्र.२, पहिला मजला, आर.सी. चेंबूरकर मार्ग,
चेंबूर, मुंबई - ७१.

<u>*---विवेचन---*</u>

अपीलार्थी श्री. परविंदरसिंग सेठी यांचा दि. २६/९/२००७ रोजी विहित नमुन्यात नसलेला, विहित मुद्रांक शुल्क नसलेला माहितीचा अधिकारांतर्गत माहिती मिळणेबाबतचा अर्ज बाल कल्याण समिती यांचेकडे दि. २८/९/२००७ रोजी प्राप्त झाला. श्री. गंगाराम दुबे यांची मुलगी रेखा बाल न्याय अधिनियमांतर्गत बाल कल्याण समिती यांचे आदेशान्वये शासकीय मुलीचे विशेष पुनर्वसन केंद्र येथे दाखल करण्यात आली आहे. तिच्या custody . पुनर्वसन वगैरे बाबत चौकशी अहवाल व एकंदरीत पूर्ण प्रकरणाचे कागदपत्र अपीलार्थी यांना हवे आहेत. बाल कल्याण समिती, मुंबई उपनगर यांनी दोन्ही अर्ज तपासून दि. १/१०/२००७ रोजी अहवाल सादर करणेबाबत शासकीय मुलींचे विशेष बाहगृह तथा पुनर्वसन केंद्र, देवनार, मुंबई उपनगर या संस्थेच्या परिविक्षा अधिकारी यांना आदेश दिले.

अधीक्षीका, शासकीय मुलींचे विशेष बालगृह, देवनार यांचे प.क्र. ७१८ दि. २९/९/२००७ व प.क्र. ७१९ दि. २९/९/२००७ अन्वये अधीक्षीका या माहिती अधिकारी म्हणून घोषित नसल्याने सदरचा अर्ज माहिती अधिकारी म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविला. तसेच बाल कल्याण समिती, मुंबई उपनगर यांनी दि. १/१०/२००७ रोजी सदर अर्जावर ठेवलेल्या सुनावणीची माहिती अधीक्षीका यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांना दिली.

बाल कल्याण समिती यांचेसमोर गोपनीय सुनावणीची तारीख ठेवल्यामुळे व ते महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील नियम २ नुसार सक्षम प्राधिकरण असल्याने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी , मुंबई उपनगर यांना दि. १/१०/२००७ पर्यंत सदर अर्जावर कार्यवाही करता आलेली नाही. दि. १/१०/२००७ रोजी बाल कल्याण समिती, मुंबई उपनगर यांचेसमोर अपीलार्थींच्या अर्जासह मुलगी रेखा हिची व तीने बाल कल्याण समिती यांना दिलेल्या निवेदनाची सुनावणी झाली. त्यानुसार समितीच्या दि. ३/१०/२००७ च्या पत्रान्वये खालील आदेश अधीक्षीका, शासकीय मुलींचे विशेष बालगृह, देवनार यांना कळविण्यात आले.

**The information provided by G/C Rekha being very confidential, it can not be disclosed. It will be very harmful to disclose the statement submitted by her to CWC"**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी, मुंबई उपनगर यांचे प.क्र. १६२४ दि. ३/१०/२००७ अन्वये अपीलार्थींचे वकील श्री. परविंदरसिंग सेठी यांना बाल

कल्याण समितीने दिलेल्या निर्णयाच्या प्रतीसह व महितीचा अधिकार २००५ कलम ८(१) (ख) नुसार माहिती देता येत नसल्याचे कारणासह कळविले. त्यानंतर अपीलार्थीनी दि. १२/१०/२००७ रोजी कोर्ट फी स्टॅम्प नसलेला अर्ज प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर केला. सदरचा अर्ज आयुक्त यांचे कार्यालयास दि. १७/१०/२००७ रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प.क्र. १७९७२ दि. ३/११/२००७ च्या नोटीसीद्वारे दि.

१६/११/२००७ रोजी सकाळी ११-३०वाजता प्रथम अपिलीय अधिकारी यांचेसमोर सुनावणी झाली. सदर सुनावणीस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ८ (१) (ख) व (छ) तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील कलम ५१ व सुधारित अधिनियम २००६ मधील कलम २१(१) अन्वये कारणामुळे देता येत नसल्याचे सांगितले. अधिनियमाच्या तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

1. **The Juvenile Justice (Care & Protection of Children) Amendment Act, 2006**

**" Section – 21. (I) No report in any newspaper, magazine, news sheet or visual media of any inquiry regarding a juvenile in conflict with law or a child in need of care and protection this act shall disclose the name, address or school or any other particulars calculated to lead to the idenfification of the juvenile or child nor shall any picture of any such juvenile or child be published;**

2. **The Juvenile Justice (Care & Protection of Children) Act, 2000**

   **Section 51 – The report of the probation officer or social worker considered by the competent authority shall be treated as confidential :**

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद.

कलम ८(ख) कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्ट मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होवू शकेल अशी माहिती.

कलम ८(छ) जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारिरीक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल अशी माहिती.

अपीलार्थी व माहिती अधिकारी यांची वरील प्रमाणे बाजू ऐकून घेतली याबाबत कायद्यातील तरतुदी पाहता व संबंधित कागदपत्रे पहाता मुलीची तिच्या आई वडिलांकडे जाण्याची इच्छा नसल्याचे दिसून

आले.  वरील सर्व बाबी विचारात घेता व कलम ८ (छ) च्या तरतुदीचा विचार करता अपीलार्थीनी अपीलामध्ये मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदी व मुलींची सुरक्षितता तसेच व्यक्तीगत हित पाहता माहिती देता येणार नाही.  त्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात येत असल्याचे आदेश दिले.

वरील आदेशाविरुध्द अपीलार्थींनी आयोगाकडे दि. २२ जानेवारी २००८ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. २४/११/२००८ रोजी घेण्यांत आली.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेतर्फे पुढील निवेदन देण्यात आले.

"  बाल कल्याण समिती, मुंबई उपनगर यांची नियुक्ती शासन अधिसूचना दि. ८/४/२००४ नुसार करण्यात आलेली आहे.  सदर बाल कल्याण समितीस बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील कलम २९(५) (परिशिष्ट ई ) नुसार समिती दंडाधिका-यांचे

न्यायपीठ म्हणून कार्य करील आणि तिला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३(१९७४ चा २) अन्वये एखाद्या महानगर दंडाधिका-याला किंवा यथास्थिती एखाद्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिका-याला प्रदान करण्यात आलेले अधिकार असतील अशी तरतूद आहे.

सदर प्रकरणी बाल कल्याण समिती, मुंबई उपनगर यांनी दि. ३/१०/२००७ रोजी **"The information provided by G/C Rekha being very harmful to disclose the statements submitted by her to C.W.C."** असे आदेश दिले आहेत.  बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० कलम ५२ मध्ये सक्षम प्राधिकरणाने याअधिनियमान्वये दिलेल्या एखादया आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत सत्र न्यायालयात अपील दाखल करता येईल अशी तरतुद आहे.

बाल कल्याण समितीस शासनाने माहिती अधिकारी म्हणून घोषित केलेले नाही.  तसेच बाल कल्याण समितीही काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी वरील अधिनियमातील कलम २९(१) नुसार गठीत करण्यात आलेली आहे.  व महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील नियम २ नुसार सक्षम प्राधिकरण आहे.

अपीलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेले (विहित नमुन्यात असलेले/नसलेले, विहित कोर्ट फी स्टॅम्प न चिकटवलेले, विहित मुदतीत अपील सादर न केलेले अर्ज ) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित वेळेत निकाली काढण्यात आलेले आहेत. बाल कल्याण समिती यांचे आदेश व बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम २००६ कलम २१(१) मधील तरतुदीनुसार अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. यामध्ये जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा अपीलार्थी यांना माहिती न देण्याचा ,टाळण्याचा, नाकारण्याचा कोणताही हेतू नाही. "

अपीलार्थींचे म्हणणे असे की, माहितीच्या अधिकारामध्ये रेकॉर्डला असलेली माहिती सहजतेने मिळायला पाहिजे व माहितीच्या अधिकाराच्या तरतुदी या इतर कोणत्याही कायद्यापेक्षा श्रेष्ठ ठरतील असेहि त्या कायद्यात नमूद केलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा उद्देश जनतेला सुलभतेने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे जरी असले तरी त्यातील कलम ८ अन्वये कोणत्या परिस्थितीत माहिती न देण्याचा निर्णय घेता येवू शकतो याचीहि तरतुद केलेली आहे. ज्या कायद्याखाली बालिका रेखा ची केस चालू आहे तो The Juvenile Justice (Care & Protection of Children) ॲक्ट २००० हा कायदा बालक/बालिकांचे हित हा उद्देश डोळासमोर ठेवून तयार केलेला कायदा आहे. या कायद्याअंतर्गत चौकशी चालू असतांना सोशल वर्कर आणि प्रोनेशन ऑफिसर यांनी सक्षम प्राधिकरणाला दिलेला अहवाल हा गोपनीय असेल असे नमूद केलेले आहे. तसेच अशा विषयासबंधीची एखादी घटना प्रसिध्द करताना बालक/ बालकांची नांवे, फोटो देवू नयेत अशीही तरतुद केलेली आहे. या सर्व तरतुदींचा उद्देश हाच की, पुनर्वसन पूर्ण होवून बालिका योग्य मार्गाला लागेपर्यंत तिच्या बालमनावर परिणाम होईल किंवा तिचे भले करण्याच्या उद्दिष्टाला कोणत्याही प्रकारचा अडथळा किंवा बाधा येवू नये हाच असतो. अशा परिस्थितीत अपीलार्थीस सध्याच्या स्टेजला माहिती उपलब्ध करुन न देण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचा निर्णय योग्यच वाटतो. मात्र सदरील कायद्याखाली सक्षम प्राधिकरणाने जो अंतिम आदेश पारित करायचा आहे तो अजूनहि केलेला नाही. त्यामुळे अजूनहि प्रकरण हे चौकशीधीन आहे व अशा

स्टेजला सर्वच माहिती उघड करणे हेहि Juvenile कायद्याची तरतुद लक्षात घेता योग्य होणार नाही. असे जरी असले तरी सक्षम प्राधिकरण (कॉम्पीटंट ॲथॉरिटी ) यांनी आपले आदेश त्वरित देणे हे तेवढेच गरजेचे आहे. कारण Juvenile कायद्याच्या कलम ५२ नुसार असे आदेश मान्य नसणारी व्यक्ती ही कोर्ट ऑफ सेशन मध्ये अपील करु शकते. सदरील केसमधील परिस्थिती ही अंतीम आदेशहि नाहीत त्यामुळे कुठचेहि कागदपत्र संबंधित व्यक्तीला उपलब्ध करुन देता येत नाहीत व अंतीम आदेश नसल्यास कोर्टातहि जाता येत नाही , अशा परिस्थितीत बालिकेचे हित लक्षात घेता कुठचेहि कागदपत्र संबंधित व्यक्तीला उपलब्ध करुन देणे योग्य नाही असे आयोगास वाटते.

सुनावणीच्या वेळेला वरील प्रकरणातील अंतिम आदेश शक्य तितक्या लवकर पारित केल्या जातील असे समितीने सांगितले. त्यानंतर अपीलार्थीस तसे आदेश मान्य न झाल्यास ते कोर्ट ऑफ सेशनपुढे जावू शकतील व कोर्ट ऑफ सेशन मध्ये कागदपत्रांची छाननी करुन त्याचा निर्णय देवू शकतील. आता सध्याच्या स्टेजला अपीलार्थी मागत असलेले कागदपत्र त्यांना देणे हे बालिकेच्या हिताचे नाही हे जे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेले आहे त्याच्याशी आयोग सहमत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ११ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/२९८४३/अपील क्र.३३३३/०२

श्री. संदिप गणेश आडागळे --अपीलार्थी
सी.ई.एन. ८८२/३९९, गणेश मुर्तीनगर,
भाग-२, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

विरुध्द

१. महाव्यवस्थापक --उत्तरवादी.
बृहन्मुंबई दुध योजना, वरळी, मुंबई १८
२. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक
वरळी दुग्धशाळा, वरळी, मुंबई १८

---*विवेचन*---

श्रीयुत संदिप गणेश आडागळे यांनी दि. ३/९/२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक, वरळी दुग्धशाळा यांना अर्ज करुन दुध विक्रीसाठी दिलेल्या क्रमांक झेड-४६७७ या केंद्राचा लाकडी भोंगी उपलब्ध का नाही, कोणी नष्ट केली वगैरे बाबत माहिती विचारली होती. यावर सदर भोंगी महापालिका अे विभाग यांनी उचलून नेली त्यामुळे उपलब्ध नाही वगैरे माहिती अपीलार्थीस दिलेली आहे, व अपिलीय अधिका-यांनी जेव्हा दि. ६ फेब्रूवारी, २००८ रोजी सुनावणी झाली त्या आदेशात श्री. आडागळे यांनी भोंगीच्या बाबतीत महापालिकेकडून प्राप्त झालेली माहिती व वरील प्रमाणे वरळी दुग्ध शाळेकडून प्राप्त झालेली माहिती यांचेमध्ये विसंगती असल्याचे सांगितले.

अपिलीय अधिका-यांच्या आदेशात प्रभारी व्यवस्थापक वरळी कार्यालयाने दिलेली माहिती त्यांच्या दप्तरी नोंदीनुसार बरोबर असल्याचे श्रीयुत आडागळे यांच्या निदर्शनाला आणण्यात आले. तसेच त्या आदेशात असेहि लिहिलेले आहे की, Z-४६७७ या केंद्राची लाकडी भोंगी महानगरपालिकेच्या अे विभागाकडून उचलून आणण्यात आली असून भोंगी मुळ जागी प्रस्थापित करण्यासाठी तसेच भोंगीची मोडतोड झाल्या प्रकरणी प्रभारी व्यवस्थापक, वरळी दुग्धशाळा कार्यालयाचा महानगरपालिकेशी पत्रव्यवहार चालू असल्याचे अपीलार्थींच्या निदर्शनास आणण्यात आले. तरीही अपीलार्थींचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी दि. १६/२/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी

दि. २६/११/२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे उपस्थित होते.

अपीलार्थीस दिलेली माहिती ही कागदपत्रांप्रमाणे बरोबर आहे. मात्र अपीलार्थीस त्यांची भोंगी उचलून नेण्याबाबत त्यांच्यावर अन्याय झालेला आहे असे वाटते व त्यांनी मा. राज्यपाल यांचेकडे सुध्दा एक अर्ज केला होता व त्यानुसार शासनाच्या दुग्ध व्यवसाय विभागाने सुध्दा कांही निर्देश आयुक्त, दुग्ध व्यवसाय विभाग यांना दिलेले आहेत. त्यात अपीलार्थींच्या अर्जातील मुद्दयांबाबत सखोल चौकशी करण्यात यावी व अपीलार्थीस न्याय मिळवून देण्यात यावा असे नमूद केले आहे.

वरील अर्जावर अंतीम निर्णय झालेला नाही असे सुनावणीच्या वेळेला सांगण्यांत आले. त्यामुळे अपीलार्थींच्या माहितीबाबत जी सद्य:स्थिती आहे त्या सद्य:स्थितीची माहिती अपीलार्थीस करुन देण्यांत आलेली आहेच. मात्र अपीलार्थींचे समाधान त्यांना त्यांची मुळ भोंगी मिळाल्यानेच होणार आहे. त्याप्रमाणे वरळी दुग्ध व्यवसाय विभाग याबाबत लवकरच याबाबत निर्णय घेईल असे सुनावणीच्या वेळेस सांगण्यांत आले.

सद्य:स्थितीची माहिती अपीलार्थीस दिलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३४९७८/अपील क्र.३४६६/०२

श्री. रज्जाक अब्दुल मुलाणी --अपीलार्थी
पोलीस सहआयुक्त यांचे कार्यालय, ठाणे.

विरूध्द

१. पोलीस उपमहानिरीक्षक(प्रशासन) --उत्तरवादी.
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१
२.जन माहिती अधिकारी तथा उपसहायक पोलीस महानिरीक्षक
(र.व.का) पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१

***---विवेचन---***

श्रीयुत रज्जाक अब्दुल मुलाणी , स्वीय सहायक ,पोलीस सहआयुक्त कार्यालय, ठाणे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपसहायक पोलीस महानिरीक्षक ,प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दि. १७/१०/२००७ रोजीच्या अर्जाने श्रीयुत पंजाबी, स्वीय सहायक, सह पोलीस आयुक्त ठाणे यांना देण्यांत आलेल्या चुकीची बढती व पोस्टींग याबाबत कांही माहिती विचारली होती.

अपीलार्थींनी याबाबत तक्रार करणारा अर्ज हा ९ ऑक्टोबर, २००६ रोजी केलेला होता व त्याअनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाचे अभिप्राय हे शासनास सादर केलेले आहेत व त्यावर शासनाचे आदेश अद्याप प्रलंबित आहेत असे कळविण्यांत आले. वरील माहितीने समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलावर दि. १८/१२/२००७ रोजीच्या आदेशाने निर्णय देतांना अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक यांनी अपील फेटाळून लावले. त्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि. १९/३/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदरच्या अपीलातील मागणी मात्र माहितीची दिसून येत नाही. अपीलार्थी असे म्हणतात की, श्रीयुत. बी.आर. पंजाबी यांना दिलेली पदोन्नती व नेमणूकीबाबत पुन:श्च योग्यतो निर्णय घेण्यांत यावा व चुकीचे आदेश काढणा-यांना योग्य ते शासन व्हावे.

अपीलार्थींच्या तक्रारीच्या चौकशीबाबत अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन आयोगास दिलेले आहे.

"    अपीलार्थींनी त्यांच्या दि. १०/१०/२००६ च्या अर्जावर वर्षभर चौकशी न झाल्याचे नमूद केले आहे. सदरची बाब वस्तुस्थितीवर आधारित नाही. अपीलार्थीनी दि. १०/१०/०६ रोजी पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयास केलेल्या अर्जापूर्वी दि. ९/१०/०६ रोजी परस्पर अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे अर्ज सादर केलेला होता. सदरचा अर्ज शासनाने दि. ११/१०/२००६ रोजी पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयास पाठवून सदर अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने अभिप्राय मागविले होते.

दि. ९/१०/२००६ रोजीचा अर्ज परस्पर शासनास सादर केल्याची श्री. मुलाणी यांची कृती ही शासकीय कामकाजाच्या शिस्तीस धरुन नाही. तरी सुध्दा दि.९/१०/०६ रोजीचा परस्वर शासनास दिलेला व १०/१०/०६ च्या अर्जामधील मुद्दे सारखेच असल्याने, शासनाने मागविलेल्या मुद्दयांवर दि. २३/११/०६ रोजी मुद्देसुद अहवाल शासना पाठवून, श्री. मुलाणी यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयातच त्यांचे सहकारी असलेले श्री. बी.आर. पंजाबी ,स्वीय सहायक यांना दिलेल्या पदोन्नतीबाबत झालेली अनियमिततेबाबतची त्यांची विनंती अमान्य करण्याबाबत पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने शासनास कळविले होते. सदरची विनंती शासनाने अमान्य करुन, तसे पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयास कळविल्यानंतर श्री.मुलाणी यांना त्याप्रमाणे कळविण्यात येईल असेही अभिप्राय त्या पत्रात शासनास लिहिले होते. त्याबाबत शासनाने दि. २०/१३/२००७ रोजी पोलीस महासंचालक कार्यालयास कळविल्यानुसार श्री. मुलाणी यांना दि. २/१/२००८ अन्वये कळविले असतांनाही श्री. मुलाणी यांनी वर्षभर चौकशी न केल्याचे नमूद करणे विपर्यस्त आहे. त्यांचे वर्तन हे बेशिस्त आहे. तसेच श्री. मुलाणी यांना पोलीस महासंचालक हे सक्षम प्राधिकारी असल्याने पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयास संपर्क साधण्याबाबत त्या पत्राद्वारे शासनाने परस्वर अपीलार्थीस कळविले होते. तसेच, शासनाने पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयास दि. २०/१२/२००७ च्या दुस-या पत्राद्वारे असेहि कळविले होते की, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने शासनास सादर केलेल्या परिच्छेदनिहाय अभिप्रायांनुसार अपीलार्थीस कळवावे. त्याप्रमाणे दि. २/१/२००८ च्या ज्ञापनाद्वारे अपीलार्थीस कळविले होते. "

त्यामुळे कागदोपत्री असलेली  सर्व माहिती अपीलार्थीस दिलेली आहे असेच म्हणावे लागेल. अपीलार्थीस शासनाचा किंवा पोलीस महानिरीक्षकांचा निणर्य मान्य नसल्यास त्यांनी सक्षम प्राधिकरण/ मॅट कडे अर्ज करणे उचित राहिल.   माहितीचा अधिकार अधिनियमाखाली असे आदेश बदलून मिळतील ही अपेक्षा करणे गैर आहे.   तेव्हा त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडेच अपील करणे हे योग्य राहिल.   त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---आदेश---

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३१७९८/अपील क्र.३४५३/०२

श्री. राजेंद्र सदाशिव परदेशी --अपीलार्थी
पूर्व नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबई - ७१

विरुध्द

१. पोलीस उपआयुक्त परि- ६ --उत्तरवादी.
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,
चेबूर (पूर्व) मुंबई - ७१

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,
चेबूर (पूर्व) मुंबई - ७१

*---विवेचन---*

अप्पर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग यांचे कार्यालय यांना प्रशासकीय अधिकारी, पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई यांना दि. २२/८/२००७ रोजी लिहिलेल्या पत्रात श्रीयुत परदेशी यांची अभिवृध्दी ही कोणत्या पोलीस निरीक्षकाबरोबर करावी हे समजून येत नसल्यामुळे व त्यांचे वेतन अभिवृध्दीच्या बाबतीतले आदेश प्रादेशिक कार्यालयातून केल्यास ते प्रमाणित होणार नाही त्यामुळे श्रीयुत परदेशी यांना वेतन अभिवृध्दीमधील फरकाची रक्कम देण्याबाबत अडचणी निर्माण होतील म्हणून त्यांचे वतेन अभिवृध्दीचे आदेश वरिष्ठ कार्यालयातून निर्गमित होणे उचित ठरेल अशा आशयाचे पत्र लिहिले होते. यावर काय कारवाई करण्यात आली ही माहिती श्रीयुत परदेशी यांच्या दि. २३/१/२००८ रोजीच्या अर्जाने पाहिजे होती.

मिळालेली माहिती व अपिलीय निर्णयाने समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दि. २४/४/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि. ५/१२/२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींच्या अर्जाबाबत पुढील माहिती जन माहिती अधिकारी यांनी सादर केली.

" अपीलार्थी यांनी शासकीय माहिती अधिकारी व सहायक पोलीस आयुक्त, पूर्व नियंत्रण कक्ष, चेंबूर मुंबई यांना दि. २३/१/२००७ रोजी अर्ज करुन माहितीची मागणी केली. प्रस्तुत अर्ज प्रशासकीय अधिकारी, कक्ष-३ (वआ)पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांचेशी संबंधित असल्याने अपीलार्थींचा यांचा अर्ज त्यांना पाठवून अहवाल मागविण्यात आला. त्यांच्याकडून अहवाल जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त न झाल्याने त्यांनी त्यांचे जा.क्र. ४८५/०८ दि. १४/२/०८ , ५२३/०८ दि. २०/२/०८, ६८१/०८ दिनांक १/३/२००८ अन्वये स्मरणपत्रे पाठविण्यात आलेली आहेत. तसेच अपीलार्थी यांना त्यांचे अर्जाचे अनुषंगाने दि. २६/३/२००८ च्या पत्रान्वये माहिती देण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

अपीलार्थी यांनी दि. १३/३/२००८ रोजी अपील अर्ज अपिलीय अधिकारी वपोलीस उप आयुक्त , परि ६ मुंबई यांना केल्याने अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कागदपत्रे त्यांना सादर करण्यात आलेली आहेत. त्या अनुषंगाने अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयीन जा.क्र. १२०७/पोउआ/परि ६/०८ दि. ३१/३/२००८ अन्वये दिलेल्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाचे जा.क्र.११०२/०८ दि. ९/४/२००८ अन्वये पत्र प्रशासकीय अधिकारी, कक्ष-३ (वआ) पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांना पाठविण्यात आले असता त्यांनी अपीलार्थी यांचेबाबतची माहिती प्रशासकीय अधिकारी, पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर मुंबई यांना सादर केली बाबत नमूद केल्याने जनमाहिती अधिकारीयांचे कार्यालयाचे जा.क्र. १३२८/०८ दि. २५/४/२००८ अन्वये पत्र प्रशासकीय अधिकारी, पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर मुंबई यांना पाठवून अहवालाची मागणी करण्यात आली असता प्रशासकीय अधिकारी, पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई यांचेकडून जा.क्र. अपोआ/पुप्रावि/कक्ष १ (५)/४४/०८ दि ७/५/२००८ अन्वये माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त झाल्याने ती अपीलार्थी यांना दि. २८/५/२००८ च्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे व अपीलार्थी यांनी स्वीकारलेली आहे. "

अपीलार्थींच्या प्रकरणाबाबत अशा रितीने सद्य:स्थिती दर्शविणारी माहिती अपीलार्थी यांना दि. ७/५/२००८ रोजीच्या पत्राने देण्यात आलेली आहे. अर्थात त्यांचे समाधान हे प्रकरणाचा अंतिम निर्णय लागण्यानेच होणार आहे. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये जशी माहिती असेल तशी माहिती द्यावयाची असते व ती तशी अपीलार्थीस दिली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १२ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक २९३२३/अपील क्रमांक-३२४०/०२

श्री. रविंद्रकुमार एम. मानकर --अपीलार्थी
फ्लॅट नं. २०२, अश्विन को.ऑप.हौ.सोसा.लि.(सं.बि.)
सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई ४१० २१०.

विरुध्द

१. उप सचिव --उत्तरवादी.
नगर विकास विभाग (नवि - १२)
मंत्रालय, मुंबई - ३२
२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग (नवि - १२)
मंत्रालय, मुंबई - ३२

*--विवेचन---*

श्रीयुत रविंद्रकुमार एम. मानकर, खारघर, नवी मुंबई यांनी आयोगाकडे दि. २२ जानेवारी, २००७ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. २३ ऑक्टोबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलकर्ते अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी, नगर विकास विभाग हे उपस्थित होते.

अपीलकर्ते श्री. रविंद्रकुमार एम. मानकर यांनी दि. ३/९/२००७ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकारी, नवि १२ यांचेकडून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील कलम ४५ व ४७ च्या अनुषंगाने (१) अनेक इमारत असलेल्या बांधकाम मंजूरी नकाशातील केवळ एका इमारतीचे जोत्यापर्यंतचे बांधकाम झाल्यास व अन्य इमारतीच्या बांधकामाची सुरुवात न झाल्यास अशा परिस्थितीत दिलेली बांधकाम परवानगी अमर्याद कालावधीसाठी वैध राहते का असल्यास सबंधित शासन निर्णयाची अथवा नियमाची प्रत द्यावी व (२) अशा प्रकरणी विकास शुल्काचे दर सुधारित झाल्यास नवीन विकासशुल्काचे दर ज्या इमारतीचे बांधकाम सुरु झाले नाही त्यांना लागू होतील काय जर लागू होत नसल्यास संबंधित निर्णयाची अथवा नियमाची प्रत द्यावी अशी माहिती अपेक्षिली होती.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी त्यांचे निर्णयात असे नमूद केले आहे , अपीलार्थीनी मागितलेली माहिती ही स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची आहे व माहितीचा अधिकार अधिनियम कलम २(च) मध्ये जी माहितीची व्याख्या दिलेली आहे त्यानुसार त्यांनी मागितलेली माहिती बसत नाही. अपीलकर्त्यांनी अपेक्षिलेली माहिती स्पष्टीकरण मागणारी असल्याने अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे माहितीच्या अधिकारात बंधनकारक नाही. बांधकाम परवानगी व विकास शुल्काबद्दल प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये स्वयंस्पष्ट तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये देखिल याबाबत तरतुदी असतात असे विवेचन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपीलार्थींचे अपील फेटाळून लावले होते. हे विवेचन तर्कशुध्द वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील नामंजूर करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १५ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक २८५१९/अपील क्रमांक-३२०७/०२

श्री. राजेश काशिनाथ खोपकर --अपीलार्थी
पोलीस शिपाई/ ३३०९९, ई -२-१४,
मरोळ पोलीस वसाहत, अंधेरी (पूर्व)
मुंबई - ५९

विरुध्द

१. अप्पर पोलीस महासंचालक --उत्तरवादी.
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.
२.जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

*--विवेचन---*

अपीलार्थी श्री. राजेश काशिनाथ खोपकर यांनी , प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती पुरविली असे नमूद करुन दि. १९/।२/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि. २१/१०/२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अपीलार्थी अनुपस्थित होते. अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी.एम.शिंदे उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी विविध १२ मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली होती. सदर अर्जात अपीलार्थीनी मुद्दा क्र. १ व २ अन्वये त्यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई व प्राचार्य, पोलीस विद्यालय, मरोळ, मुंबई यांच्या दि. १०/११/२००५ च्या आदेशान्वये अपीलार्थींची बदली कोणत्या कारणास्तव व गुन्हयामुळे त्यांची प्राथमिक चौकशी का करण्यात आली नाही, त्यांच्यावर अन्याय कोणत्या हेतूने करण्यात आला, याची माहिती त्यांच्या दि. ८/७/२००६ च्या पत्राने मागविली असताही ती का देण्यात आली नाही, मुद्दा क्र. ३,४, व ५ अन्वये पोलीस हवालदार,

वाहनचालक श्री. ठाकरे यांना ते बेशिस्त, बेजबाबदार आणि गैरवर्तनावरुन नाशिक गुन्हे अन्वेषण विभाग प्रशिक्षणालय संस्थेतून कमी केले त्यांच्या पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ येथे नेमणूकीची प्रशासकीय माहिती मागविली होती. तर मुद्दा क्र. ६ व ७ अन्वये पोलीस हवालदार ठाकरे यांस पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ येथून स्थित कार्यमुक्त करणै, परत कर्तव्यावर नियुक्तीचे आदेश होणे याबाबतची प्रशासकीय माहिती मागविली होती. मुद्दा क्र. ८ अन्वये पोलीस अमलदार प्रदिप मोहिते व पोलीस हवालदार ठाकरे या दोघांच्या बदली बाबतची माहिती मागविली आहे. मुद्दा क्र. ९ व १० अन्वये पोलीस हवालदार नलावडे व पोलीस हवालदार दाणे व पोलीस प्रशिक्षण विद्यालयातील इतर पोलीस हवालदार यांच्या नियुक्ती/बदली बाबतची माहिती मागविली आहे. मुद्दा क्र. ११ अन्वये पोलीस प्रशिक्षण विद्यालयातील कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतरही त्यांना चालू ठेवण्यात येते याची माहिती व पोलीस मार्गदर्शिका नियम याला धरुन आहे किंवा कसे याची माहिती मागविली आहे. मुद्दा क्र. १२ अन्वये कवायत शिक्षकांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्याची माहिती मागविली आहे.

वरील १२ मुद्दयांच्या अनुषंगाने शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. २२/११/२००६ अन्वये असे कळविले आहे की, अपीलार्थीनी मागविलेली माहिती व कागदपत्रे इ. कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंधित असल्याचे दिसून येत नसून ती त्रयस्थ व्यक्तीच्या संबंधातील वैयक्तिक स्वरुपाची माहिती असल्याने सदरची माहिती उघड करणे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१)(ञ) अन्वये समर्थनीय ठरत नाही. तथापि असेही अपीलार्थींना कळविले आहे की, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सर्व पोलीस प्रशिक्षण विद्यालयाकरीता माहिती अधिकारी म्हणून संबंधित प्रशिक्षण विद्यालयाचे उपप्राचार्य व अपिलीय अधिकारी म्हणून प्राचार्यांना घोषित केले असल्याने अपीलार्थींना कांही माहिती हवी असल्यास संबंधितांशी संपर्क साधण्याचे कळविले आहे.

जन माहिती अधिका-यांनी असमाधानकारक , दिशाभूल करणारी तसेच अपूर्ण माहिती दिल्याचे नमूद करुन दि. २६/११/२००७ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ७/१२/२००७ च्या आदेशान्वये जन माहिती अधिका-यांच्या उत्तरास अनुसरुन अपीलार्थींना कळविले आहे.

अपिलीय अधिका-यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद करुन मागणी केलेल्या १२ ही मुद्दयांमध्ये कोणत्याही व्यक्तीबद्दल कोणतीही वैयक्तिक व खाजगी स्वरुपाची माहिती नसून पूर्णपणे

प्रशासकीय स्वरुपाची माहिती आहे. त्यामुळे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ञ) चा भंग होत नाही. तेव्हा माहिती पुरविण्याबाबत आदेश देण्याची विनंती केली आहे.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळी अपिलीय अधिका-यांकडून लेखी निवेदन सादर केले. तसेच त्यांची बाजूहि ऐकून घेण्यांत आली. परंतु अपीलार्थी सुनावणीच्या वेळी उपस्थित नसल्याने त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तसेच संबंधित प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यावरुन प्रथम अपिलीय अधिका-यांच्या दि. ७/१२/२००७ च्या निर्णयाशी आयोग सहमत असल्याने पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील फेटाळण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १५ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक ३३११०/अपील क्रमांक-३४९१/०२

क्रमांक ३३११०अे/अपील क्रमांक-३४९२/०२

श्री. मोहम्मद साजिद मरघुब अन्सारी --अपीलार्थी
यु.टी.नं. ४९८/०८, सर्कल ६/४,
द्वारा- अधीक्षक, आर्थर रोड कारागृह,
मुंबई - ४०० ०११.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त --उत्तरवादी.
दहशतवादी विरोधी पथक, सर जे.जे. मार्ग,
मुंबई - ४०० ००८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दहशतवादी विरोधी पथक, सर जे.जे. मार्ग,
मुंबई-४०००००८.

*--विवेचन---*

श्रीयुत. मोहम्मद साजिद मरघुब अन्सारी यांनी आयोगाकडे जी दोन अपीले सादर केलेली आहेत त्या अपीलात त्यांनी दहशतवाद विरोधी पथकाकडे असलेली चंदन युनिट ,अे.टी.एस. मुंबई यांच्या पोलीस स्टेशन डायरीत अटेंडन्स रेकॉर्ड, ट्रेन ब्लास्ट प्रकरणासंबंधीची चौकशी यासंदर्भात माहिती मागितली होती. ही सर्व माहिती दहशतवाद विरोधी पथक यांच्या विभागाशी संबंधित आहे व ते पथक राज्य गुप्तवार्ता विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियमान्वये तयार केलेल्या आदेशानुसार गुप्तवार्ता व संरक्षण संघटनाना माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ च्या

तरतुदी लागू होणार नाहीत अशी अधिसूचना अधिनियमाच्या कलम २४ चे उपकलम ४ अनुसार प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे अपीलार्थींनी मागितलेली माहिती ही त्यांना देण्यात येणार नाही या जन माहिती अधिका-यांच्या भूमिकेशी आयोग सहमत आहे.

अपीलार्थींच्या दुस-या एका अर्जामध्ये त्यांनी ट्रेन ब्लास्टसंबंधित मुंबई पोलीस एटीएसआणि डी.जी.पी. यांनी दिलेली प्रेस नोट, प्रेस रिलीज संबंधी माहिती विचारली आहे, व त्यास दहशतवाद विरोधी पथकाकडून कोणतीही प्रेस नोट किंवा प्रेस रिलीज दिलेली नाही असे अपीलार्थीस कळविण्यात आलेले आहे.

अपीलार्थींच्या दोन्ही अपीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कळविलेले आहे.

"१. उपरोक्त आरोपी हा मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट दहशतवाद विरोधी पोलीस ठाणे गु.नो.क्र. ०५/०६ मधील अटक आरोपी असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

२. सदरचा गुन्हा हा विशेष मोक्का न्यायालयात चालविला जात असून त्याचा केस क्रमांक विशेष मोक्का केस क्रमांक २१/०६ असा आहे.

३. सदर गुन्हयात एकूण १३ आरोपी अटक व १५ पाहिजे आरोपी आहेत.

४. सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र विशेष मोक्का न्यायालयात दि. ३०/११/२००६ रोजी दाखल करण्यात आले असून त्याचा विशेष मोक्का कोर्ट केस क्रमांक २१/०६ असा आहे. दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर ताबडतोब सर्व आरोपीतांना दोषारोपपत्राच्या प्रती तसेच गुन्हयाच्या संदर्भात पुरावा म्हणून दाखल केलेल्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रती मा. न्यायालयाच्या समक्ष आरोपीतांना देण्यात आलेल्या आहेत.

५. या गुन्हयातील आरोपी नामे जमीर मोहमद लतिफ उर रहेमान शेख याने सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका क्रमांक ११५९६२/२००७ दाखल केली असता मा. सर्वोच्चयायालयाने उपरोक्त केस चालविण्यास स्थगिती आदेश दिले आहेत."

वरील परिस्थितीत दहशतवाद व विरोधी पथक यांना अधिनियमाच्या कक्षेतून वगळण्यात आलेले असून प्रेस नोट संबंधी त्यांच्या विभागाकडून कुठचीही प्रेसनोट दिली नसल्याचे स्पष्ट केले असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

दोन्ही अपीले अमान्य करण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १५ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक ३३३११/अपील क्रमांक-३४७२/०२

श्री. विलास जगन्नाथ हिंदळेकर --अपीलार्थी
८८/२६२५ , पंतनगर, घाटकोपर (पूर्व)
मुंबई - ४०० ०७५.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त --उत्तरवादी.
परिमंडळ ६, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,
चेंबूर, मुंबई - ७१ .

*--विवेचन---*

अपीलार्थी श्री. विलास जगन्नाथ हिंदळेकर यांना माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, माही माहिती खोटी, असमाधानकारक, दिशाभूल व फसवणूक करणारी माहिती दिल्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील फेटाळले असल्याने व्यथित झाले असल्याचे नमूद करुन आयोगाकडे दि. ३०/६/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ८/१२/२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी दि. २४/१/२००८ च्या अर्जान्वये केस क्र. १६०/पीडब्ल्यू/०४ मधील अटक आरोपी नं. १व २ ते न्यायालयीन तारखांना हजर/गैरहजर असल्याबाबत न्यायालयातील पोलीस केसेस हजेरी नोंद बुकातील नोंदीची मूळ प्रतीची पृष्ठांकांसह नोंदीची प्रत तसेच सदर प्रकरणात तपास अधिकारी यांच्या संबंधात वैयक्तिक माहिती व अन्य मुद्दयासहीत एकूण दहा मुद्दयांवर माहिती मागविली होती. त्या मुद्दयांच्या अनुषंगाने अपीलार्थींना दि. १२/२/२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि. २५/२/२००८ रोजी माहिती पुरविली. शिवाय अपीलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी स्वतंत्र अर्जाद्वारे मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,३,४,६,८ व ९ बाबत प्रथम अपिलीय अधिका-यांच्या प्रतिनिधींनी सुनावणीच्या वेळी

खोटी माहिती दिल्याचे नमूद करुन सदर मुद्दयांची माहिती सार्वजनिक जनतेशी संबंधित असल्याने ती कायद्याने मिळणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने माहिती मिळविण्यासाठी सौ. शिल्पा विलास हिंदळेकर यांनी अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी तिसरे न्यायालय तथा अपिलीय अधिकारी यांनी आर.टी.आय अपील क्र. ०५/२००८ च्या अनुषंगाने दि. ३१/५/२००८ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर अपीलाच्या सुनावणीच्या वेळी सौ. शिल्पा हिंदळेकर यांच्या वतीने या प्रकरणातील अपीलार्थी श्री. विलास जगन्नाथ हिंदळेकर उपस्थित असल्याचे त्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्या आदेशात असेहि नमूद करण्यात आले आहे की, आरोपी कोर्टात हजर झाल्यास त्याची नोंद केसच्या रोजनाम्यात घेण्यात येते व रोजनाम्याच्या प्रती त्या प्रकरणातील अपीलकर्त्या सौ.शिल्पा हिंदळेकर यांना वेळोवेळी मिळाल्या आहेत. म्हणजेच अपीलार्थींनी मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती अपीलार्थींना वरील प्रकरणात प्राप्त झाली आहे. त्यामुळे त्यासाठी अपीलार्थींनी पुन्हा आग्रह धरण्याची आवश्यकता नाही.

मुद्दा क्र. ३,४,६,८,९ च्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

*---आदेश---*

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १५ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक मु.मा.आ.- २८८१८/अपील क्रमांक-३२३७/०२

श्री. पी. आर. पिल्ले (वकील) --अपीलार्थी
एलफिन्स्टन बिल्डींग, १ ला मजला,
हार्नीमन सर्कल जवळ, १०, व्ही.एन.रोड,
फोर्ट, मुंबई - १

विरुध्द

१. रजिस्ट्रार जनरल --उत्तरवादी.
मुंबई उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई ३२
२.जन माहिती अधिकारी तथा मास्टर ॲन्ड असिस्टंट प्रोथोनोटरी
(अेडीएम) मुंबई उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई ३२

*--विवेचन---*

श्रीयुत पी. आर. पिल्ले, फोर्ट मुंबई यांनी आयोगाकडे दि. ३१ डिसेंबर, २००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. २३ ऑक्टोबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी , उच्च न्यायालय उपस्थित होते.

अपीलार्थीस श्रीयुत एस.के. शिंदे, सभापती, मोटर ॲक्सीडेंट क्लेम ट्रिब्युनल यांना डिस्ट्रीक्ट जजेसच्या ग्रेडेशन लिस्टमध्ये श्री. शिंदे यांचे असलेले स्थान व त्यांना सिलेक्शन ग्रेड नाकारण्यात आल्याची कारणे व इतर माहिती पाहिजे होती. ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. २ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या पत्राने दिलेली आहे. या माहितीने समाधान न झाल्याने केलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयात अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थींच्या या मुद्दयांचा परामर्श घेतलेला आहे. जसे श्रीयुत शिंदे यांनी जे रिप्रेझेंटेशन दाखल केले होते त्याची स्थिती काय या पृच्छेसाठी यासंदर्भात असलेल्या कमिटीपुढे सदरील रिप्रेझेंटेशन प्रलंबित आहे अशी माहिती आहे. तसेच सिलेक्शन ग्रेड न देण्याची कारणे सादर करण्यात आलेली आहे. अपीलकर्त्यांचा ३ रा मुद्दा की, अपीलार्थीस त्यांचे रिप्रेझेंटेशन कोणत्या मुद्दयावर

नाकारण्यात आले ते दिलेले नाही. पण अपिलीय अधिका-यांनी असे प्रतिपादन केले की, दिलेली माहिती पाहता या मुद्दयावर सुध्दा अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. अपीलकर्ते स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. पण कागदपत्रे पाहिली असता प्रथम अपिलीय अधिका-यांचा निर्णय हा योग्यच वाटतो, व त्यात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३१२८/अपील क्रमांक-३४९५/०२

श्री.उत्तमकुमार वालजी पटेल --अपीलार्थी
पटेल हाउस, पादरी मोठीवाडी,
टी.एच.के.रोड, मुख्य पोस्ट ऑफिसच्या बाजूला,
एफपी.नं. ९६ अे,९७(O.P.No 90)
माटुंगा (पश्चिम) मुंबई ४०० ०१६.

विरूध्द

१. पोलीस उप आयुक्त --उत्तरवादी.
परिमंडळ ३, बावला कंपाउंड,
भायखळा, मुंबई - ४०० ०२७.
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाउंड,
भायखळा, मुंबई - ४०० ०२७.

*--विवेचन---*

श्रीयुत उत्तमकुमार वालजीभाई पटेल, माटुंगा, मुंबई यांनी आयोगाकडे दि. २४ जून, २००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १५ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार त्यांना त्यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला एफ.आय.आर च्या प्रती, त्यांना अटक करण्यासाठी असलेल्या आदेशाच्या प्रती व त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे जे जाबजबाब घेण्यांत आले त्याच्या प्रती मागितल्या होत्या.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेले निवेदन पुढीलप्रमाणे आहे. -

" अपीलार्थी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ३ अन्वये माहिती मिळण्याकरीता दि. ११/२/२००८ रोजीचा अर्ज स.पो.आ. कार्यालयास दि.१२/२/२००८ रोजी प्राप्त झाला होता. तसेच सदर अपीलार्थी यांचा दि ११/२/२००८ रोजीचा अर्ज सहायक पोलीस आयुक्त (समन्वय),

पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई दि. १/३/२००८ रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या दि. १/३/२००८ रोजी अपीलार्थी यांचा अर्ज जो प्राप्त झाला होता तो दि. १२/२/२००८ रोजी स.पो.आ. कार्यालयास प्राप्त झाला होता.

संबंधित अर्जावर प्राप्त झालेली माहिती स.पो.आ. कार्यालयाचे पत्र जा.क्र. ११८१/१२५/सपोआ/माहिती/मानिक/०८ दि. ५/३/०८ अन्वये अपीलार्थी यांचे रहाते निवासस्थानी पोष्टाने (युपीसीद्वारे) पत्र पाठवून संबंधित माहितीचे शुल्क रु२/- इतके होते ते भरुन माहिती घेवून जाण्याबाबतचे विहित मुदतीत कळविले होते. त्या पत्रास अनुसरुन अपीलार्थी यांनी दि. १०/३/०८ रोजी स्वतः स.पो.आ. कार्यालयात येवून पावती क्र. ६९२४५५९ अन्वये शासकीय रु २/- शुल्क भरुन दिनांकित स्वाक्षरी करुन प्राप्त माहिती घेवून गेले होते.

परंतु स.पो.आ. कार्यालयाकडून पुरविण्यास आलेल्या माहितीमधील त्यांच्या दि. ७/१/२००८ रोजी माहिम पोलीस ठाणे येथील त्यांच्या नोंदविलेल्या जबाबाची प्रत व जामीनाची प्रत तसेच माहिम पोलीस ठाणेकडून दि. १६/१/२००८ आणि १७/१/२००८ लॉ फुल अरेस्ट ऑर्डर याबाबतची माहिती दिलेली नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांच्या कार्यालयात केंद्राचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले होते.

दि. ८/४/२००८ रोजी प्रथम अपील सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवलोकन करुन असे अंतिम आदेश दिले की, अपीलार्थी यांचे माहिम पोलीस ठाण्यास घेण्यांत आलेल्या जबाबाची प्रत तसेच बेलबॉन्डची छायांकित प्रत सात दिवसांत अपीलार्थी यांना देण्याचे शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष मुंबई यांना आदेश देवून अपील निकाली काढले होते.

तद्नंतर शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष यांनी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अंतिम आदेशाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माहिम पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती मध्ये बेलबॉन्डच्या व अटक फॉर्मच्या दोन छायांकित प्रती अपीलार्थी हे स्वतः दि. १७/४/२००८ रोजी स.पो.आ. कार्यालयात येवून सदरची माहिती मिळाल्याबाबत दिनांकित स्वाक्षरी करुन माहिती घेवून गेलेले आहेत व त्याचवेळी अपीलार्थी

यांनी त्यांचे माहिम पोलीस ठाणे येथे नोंदविलेल्या जबाबाच्या प्रती मिळाल्या नाही याबाबत उल्लेख केला होता. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माहिम पोलीस ठाणे यांचे कार्यालयीन जा.क्र. ३८५७/०८ दि. २६/४/२००८ अन्वये स.पो.आ. कार्यालयात असे कळविण्यांत आले होते की, अपीलार्थी श्री. उत्तम पटेल यांचेविरुध्द दि. १७/१/२००८ रोजी माहिम पोलीस ठाणे गुरक्र. २३/०८ कलम-३३२,३५३,५०४,५०६,३४,११४ भादवि अन्वये नोंद करण्यांत आलेला असून त्यामध्ये अपीलार्थी व त्यांचे कुटुंबियातील ३ व्यक्तींना अटक करण्यांत आलेले असून नमूद गुन्हयांत त्यांचे जबाब नोंदविण्यात आलेले नाही. तसेच त्यांनी पुढे असे कळविले की, अपीलार्थी यांनी केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात सहायक पोलीस आयुक्त, माहिम विभाग, मुंबई यांनी केलेल्या चौकशीत त्यांचे जबाब नोंद केलेले आहेत. पर्यायी माहिम पोलीस ठाण्यांच्या अभिलेखावर अपीलार्थी यांना हवे असलेले जबाब त्यांचे अभिलेखावर नोंद नाही याबाबत सहायक पोलीस आयुक्त तथा शासकीय माहिती अधिकारी, मध्य नियंत्रण कक्ष यांचे कार्यालयात कर्तव्यावर असलेले पो.शि.क्र.३३५१२ श्री. उमेश चव्हाण हे अपीलार्थी यांचे माहिम येथील रहाते निवासस्थानी दि. २/५/२००८ रोजी जावून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माहिम पोलीस ठाणे यांचे पत्र जा.क्र. ३८५७/०८ दि. २६/०४/०८ रोजीचे एक प्रत अपीलार्थी यांना अदा करुन दुस-या प्रतीवर अपीलार्थी यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यांत आलेली होती. "

द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलार्थींची अटक ही कुठच्याहि कोर्टाच्या आदेशामुळे झालेली नसून पोलीस अधिकारामध्ये गुन्हयाच्या संदर्भात जे अधिकार आहेत त्यानुसार झालेली आहे असे सांगण्यांत आले. तसेच अपीलार्थीस हव्या असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यांत आल्या आहेत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३१५२/अपील क्रमांक-३४९७/०२

श्री. पोलाश कार्तिक मंडल --अपीलार्थी
प्लॉट नं. ५३७, रुम नं. १९, सेक्टर ५,
चारकोप, कांदिवली (पश्चिम) मुंबई ६७

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त --उत्तरवादी.
परिमंडळ २, दक्षिण प्रादेशिक विभाग,
सर जे.जे. मार्ग, नागपाडा, मुंबई - ४०० ००८
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग,सर जे.जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई - ४०० ००८

*--विवेचन---*

श्री. पोलाश कार्तिक मंडल यांनी केंद्राचा माहितीचा अधिकार अध्यादेश २००५ अन्वये माहिती मिळणे करीता अर्ज केलेला असून, सदर अर्जात त्यांनी लो.टि. मार्ग पोलीस ठाणे येथे दिनांक १६.११.२००६ रोजी श्री. अलताफ लकडावाला, श्री. कालीदास, श्री. मन्सुरी यांनी अर्जदार यांच्या घरात गृह-अतिक्रमण केले म्हणून गैरअर्जदारांविरूध्द लेखी तक्रार केलेली होती. सदर दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गैरअर्जदारांच्या घेतलेल्या जबाबाच्या साक्षांकित प्रती, तसेच त्यांनी पोलीस ठाणेस दाखल केलेल्या दस्ताऐवजाच्या साक्षांकित प्रतींची मागणी केलेली आहे.

सदर बाबत आपण अर्जदारास कळविण्यात आले की, स्थायी आदेश क्र. ६५ अन्वये पोलीस ठाणेतील जुने अभिलेख जतन करून ठेवण्याचा एक विशेष कालावधी असतो, त्या स्थायी आदेशाप्रमाणे, तक्रारअर्ज व मार्गस्थ नोंद प्रकरणे एक वर्षे कालावधी पर्यंत अभिलेखावर जतन करून ठेवण्यात येतात. नमूद तक्रार अर्जाची चौकशी तत्कालीन स.पो.नि. गुलाबराव थोरात यांनी केलेली होती. सध्या ते पोलीस निरीक्षक म्हणून अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गु.अ.वि. मुंबई येथे कार्यरत असून, त्यांच्याकडे नमूद तक्रार

अर्जाबाबत चौकशी केली असता, त्यांनी सदरच्या प्रकरणांची चौकशी करून, प्रकरण पोलीस ठाणे पातळीवर दप्तरी दाखल केलेले होते. तसेच स्थायी आदेश क्र. ६५ अन्वये सदरच्या प्रकरणांच्या कागदपत्रांचा नाश केला असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे अर्जदार यांना आवश्यक असलेली माहिती सादर करता आली नाही.

यविरुध्द केलेल्या प्रथम अपीलात अपीलार्थी यांनी उपलब्ध अभिलेखावरुन तयार असलेली माहिती ही सहायक माहिती अधिकारी, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक लो.टि. मार्ग यांचेकडून नवीन अर्जाची माहिती प्राप्त करण्यासाठी अपीलार्थींनी नव्याने माहितीचा अर्ज करण्याबाबत आदेशित करुन सदर अपील निकाली काढण्यात येत आहे असे आदेश देण्यात आलेले आहेत.

याविरुध्द अपीलार्थी यांनी दि. २४/८/२००८ रोजी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. १५ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी यांनी विचारणा केलेल्या अ.द.गु.नों.क्र. २३/०६ ची नोंद ज्या अदखलपात्र गुन्हे रजिस्टरमध्ये आहे ते रजिस्टर अद्यापपर्यंत सापडून येत नाही. त्यामुळे अपीलार्थीस माहिती देता येत नाही ही स्थितीच पुन्हा सांगण्यांत आली.

सदर प्रकरणाची चौकशी करुन प्रकरण पोलीस ठाणे पातळीवर दप्तरीदाखल केले असून तसेच स्थायी आदेश क्र. ६५ अन्वये सदरच्या प्रकरणांच्या कागदपत्रांचा नाश केला असल्याचे जे निवेदन जनमाहिती अधिका-यांनी केलेले आहे ते या केसमध्ये सद्यःस्थितीत नाईलाजाने मान्य करावे लागेल. अपीलार्थीस हवे तर त्यांनी याबाबत पुन्हा पोलीस स्टेशनमध्ये नव्याने अर्ज करावा हेच श्रेयस्कर ठरेल.

*--आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३१४३/अपील क्रमांक-३४९६/०२

श्री. प्रमोदानंद उर्फ प्रमोद शंकर थळी --अपीलार्थी
प्रमोदानंद प्रतिष्ठान शापारिआ इमारत,
१ ला मजला, कामाबाग समोर,
७४, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई - ४०० ००४.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त --उत्तरवादी.
परिमंडळ २, दक्षिण प्रादेशिक विभाग,
सर जे.जे. मार्ग, नागपाडा, मुंबई - ४०० ००८
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग,सर जे.जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई - ४०० ००८

*--विवेचन---*

श्रीयुत प्रमोदानंद उर्फ प्रमोद शंकर थळी, यांनी आयोगाकडे दि. २६/६/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १५ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस त्यांनी राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कार्यालयातून माहितीचा अधिकार कायद्याची पुस्तिका विकत घेतली असता लिपीकानी दिलेल्या रोखपावती क्रमांक नाही म्हणून पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद केली आहे. त्या तक्रारीवर काय कारवाई केली ही माहिती अपीलार्थीस पाहिजे होती.

यावर वरील तक्रार अर्ज मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे यांचेकडे प्रकरण चौकशीधीन आहे असे अपीलार्थीस कळविण्यात आले.

वरील माहितीने समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलामध्ये उपलब्ध अभिलेखावर असलेली माहिती ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त करुन अपीलार्थीस देण्यासंबंधीचे निर्देश प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ यांनी दि. १२/५/२००८ रोजी दिले. त्यानुसार दि. ३०/५/२००८ रोजी अपीलार्थीस पोलीस ठाण्याकडे असलेल्या वरील प्रकरणासंबंधातील सर्व माहिती देण्यांत आलेली आहे. तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी गैरहजर होते. वरील प्रकरणाबाबतचा तक्रार अर्ज हा मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे यांच्याकडे चौकशीधिन आहे असे कळविले असून या तक्रारीच्या संदर्भात जी जी माहिती पोलीस ठाणेकडे आहे त्या सर्व माहितीच्या प्रती अपीलार्थीस देण्यांत आलेल्या आहेत. त्यामुळे माहिती देण्याच्या बाबतीत कारवाई जन माहिती अधिका-यांकडून कुचराई झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२९७२६/अपील क्रमांक-३३४३/०२

श्री. अतुल रमणिकलाल मथुरिया --अपीलार्थी
बी/११, शिवछाङ्गिया, ३३ सर.एम.व्ही.रोड,
अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०० ०६९

विरुध्द

१. सहायक मनपा आयुक्त --उत्तरवादी.
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, के/पूर्व विभाग,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व)
मुंबई - ४०० ०६९.
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता
(इमारती व कारखाने)
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, के/पूर्व विभाग,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व)
मुंबई - ४०० ०६९.

*--विवेचन---*

श्रीयुत अतुल रमणिकलाल मथुरिया, अंधेरी यांनी आयोगाकडे दि. १६ फेब्रूवारी, २००८ रोजीचे जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस त्यांच्या दि. ११ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये दाखल केलेल्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी (इमातर व कारखाने) यांच्याकडून मथुरिया अपार्टमेंट, अंधेरी या प्रिमायसेसमध्ये त्यांनी नमूद केलेल्या वेगवेगळया फ्लॅटस् व शॉप्स् यांचे मर्जर करण्यासाठी दिलेल्या मंजूरीच्या संदर्भात कांही माहिती पाहिजे होती.

जन माहिती अधिका-यांनी सदर मथुरिया अपार्टमेंट इमारतीच्या मंजूर आराखडयाच्या प्रती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव) यांनी सदर इमारतीच्या मंजूर आराखडयाच्या प्रती पाठविण्यासाठी लिहिले. तसेच अपीलार्थीस त्यांच्याकडे यासंदर्भात जर कांही कागदपत्रे असतील तर त्याच्या प्रती देण्याची विनंती करण्यांत आली.

मात्र अपीलार्थीचे या प्रतिसादाने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थींनी जे प्रथम अपील सादर केले होते त्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी उपस्थित न राहिल्यामुळे अपीलार्थींचे अपील फेटाळून लावण्यात आले होते. त्याविरुध्द अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

वास्तविक पाहता अपीलार्थींच्या अर्जास कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) जे जास्त चांगल्या रितीने माहिती देवू शकले असते. मात्र जन माहिती अधिका-यांनी स्वतःच ही माहिती द्यायचे ठरविलेले दिसते व कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव) यांचेकडून सदर इमारतीच्या बाबतीतल्या आराखडयाच्या प्रती त्यांनी मागवून घेतल्या होत्या. मात्र त्याचा पाठपुरावा त्यांनी केलेला दिसून येत नाही. त्यावेळेला श्रीयत एम.ई. शमीम या नांवाचे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने ) के/ई वॉर्ड हे होते. त्यांनी अपीलार्थीस माहिती देण्याच्या बाबतीत जी कुचराई केलेली आहे त्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती कां लावण्यात येवू नये याची कारणे आयोगास दि. १० जानेवारी, २००९ पूर्वी कळवावित.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येत आहे की, त्यांनी इमारत प्रस्ताव विभागाकडे जावून संबंधित नस्ती प्राप्त करुन घ्यावी व अपीलार्थीस त्या नस्तीतील कागदपत्रांच्या आधारे माहिती १० दिवसांचे आंत द्यावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील मान्य करण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा दि. १० जानेवारी, २००९ पूर्वी सादर करावी.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन १० दिवसांच्या आत माहिती द्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १६ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२८८२४/अपील क्रमांक-३२२७/०२

श्री. सुनिल मधुकर वाखारकर --अपीलार्थी
३-५, बी, ००७, हायवे पार्क,
ठाकूर संकूल, कांदिवली (पूर्व)
मुंबई - ४०० १०१

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी --उत्तरवादी.
मुंबई विद्यापीठ, संलग्नता व मान्यता विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

२.जन माहिती अधिकारी
मुंबई विद्यापीठ, संलग्नता व मान्यता विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

*--विवेचन---*

श्रीयुत सुनिल मधुकर वाखारकर, कांदिवली मुंबई यांनी आयोगाकडे दि. ३१/१२/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी गैरहजर होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून सहायक कुल सचिव उपस्थित होते.

अपीलार्थीस एन.एम. कॉलेजच्या व्यवस्थापनाने प्राचार्यांच्या मान्यतेसंबंधीचा जो प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविला होता त्या प्रस्तावासंबंधी कांही माहिती ,व अशाच प्रकारे त्वरेने इतर कांही प्राचार्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले असल्यास त्याची माहिती , वगैरे माहिती विचारली होती.

अपीलार्थीस कांही माहिती देण्यात आली व बाकीची माहिती अभिप्राय स्वरुपाची व प्रश्न स्वरुपाची आहे म्हणून देण्यात आलेली नाही. व अपिलीय निर्णयात दिलेली माहिती ही पर्याप्त आहे असा निर्णय देण्यांत आला. त्याविरुध्द अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

अपीलार्थीस एन.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मान्यतेबाबतची माहिती पाहिजे आहे. ही नेमणूक कोणत्या नियमानुसार केली जाते असे विचारले असता प्राचार्यांचे नेमणूकीची मान्यता १०९ /सी प्रमाणे दिलेली आहे अशी माहिती देण्यात आली व प्रस्ताव व मान्यतेची प्रतही अपीलार्थीस देण्यात आलेली आहे.

अपीलार्थींनी ज्या नेमणूकीविषयी इतरहि कांही प्रश्न विचारलेले आहेत याबाबत जर या नेमणूकीची टिप्पणीच्या प्रती दिल्यास अपीलार्थींच्या माहितीच्या गरजेचे निराकरण होवू शकेल असे आयोगास वाटते. याबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, या टिप्पणीच्या प्रती याअगोदरच अपीलार्थी यांना देण्यांत आलेल्या आहेत.

अपीलार्थींचे दुसरे म्हणणे असे की, या प्राचार्यांच्या मान्यतेचे प्रस्ताव जसे २ दिवसांत मंजूर करण्यात आले तसे आणखी किती प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. अशा पध्दतीची माहितीची शिट ठेवण्यात येत नाही, प्रत्येक प्रकरण स्वतंत्र असते, अपीलार्थीस इतर कुठच्या कॉलेजच्या प्राचार्यांच्या नेमणूकीची माहिती पाहिजे असेल तर त्यानी त्या महाविद्यालयाचे नांव देवून माहिती मागितल्यास त्याची माहिती देता येवू शकेल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलार्थी यांनी त्यांच्या अपीलात असे नमूद केलेले आहे की, प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते व अपीलार्थीही उपस्थित नव्हते म्हणून प्रथम अपीलाची सुनावणी पुन्हा घेण्यात यावी. पण अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी जरी उपस्थित नसले तरी परीक्षा विभागाचे सहायक

माहिती अधिकारी हे उपस्थित होते. कोणाच्या अनुपस्थितीमध्ये उपलब्ध कागदपत्रांनुसार निर्णय द्यावा किंवा सुनावणी पुढे ढकलावी हा त्या त्या अपिलीय अधिका-यांचा निर्णय असतो. अपीलार्थी व खुद्द जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्यामुळे पुन्हा ती सुनावणी घ्यावी ही अपीलार्थींची मागणी अयोग्य वाटते. त्यामुळे ती मान्य करण्यात येत नाही.

वर दर्शविल्याप्रमाणे अपीलार्थींची माहितीची गरज भागवायचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १७ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२८८३०/अपील क्रमांक-३३८०/०२

श्री. सुनिल मधुकर वाखारकर --अपीलार्थी
३-५, बी, ००७, हायवे पार्क,
ठाकूर संकूल, कांदिवली (पूर्व)
मुंबई - ४०० १०१

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी --उत्तरवादी.
मुंबई विद्यापीठ, रजिस्ट्रार सेक्रेटरिएट
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

२.जन माहिती अधिकारी (परीक्षा विभाग )
मुंबई विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

*--विवेचन---*

श्रीयुत सुनिल मधुकर वाखारकर, कांदिवली मुंबई यांनी माहिती अधिकारी, परीक्षा विभाग मुंबई विद्यापीठ यांना दि. २६ जुलै २००७ रोजी अर्ज करुन मिठीबाई महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या ऑक्टोबर २००० ते मार्च २००३ मधील तृतिय वर्षासाठी व प्रथम व द्वितीय वर्षासाठी कला/ वाणिज्य/ विज्ञान परीक्षा आवेदनपत्र व गुणपत्रिकावर महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीबाबतची माहिती विचारली होती.

पण या अर्जावर माहिती न मिळाल्यामुळे केलेल्या दि. २७ ऑगस्ट २००७ रोजीच्या अपीलावर दि. ५ ऑक्टोबर २००७ रोजी निर्णय देतांना अपीलार्थी अनुपस्थित होते. मात्र अपिलीय अधिकारी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस एक आठवडयाच्या आत माहिती देण्यात यावी असे आदेश दिले होते. ही माहिती १ आठवडयाच्या आत न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी दि. १४/११/२००७ रोजी पत्र पाठवून ही बाब अपिलीय अधिका-यांच्या निदर्शनास आणून दिली व आयोगाकडे दि. ३१/१२/२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले. या अपीलाची सुनावणी दि. १६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. परीक्षा विभागाचे सहायक जन माहिती अधिकारी तथा उप कुल सचिव उपस्थित होते.

सहायक जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरील अर्जामध्ये असणा-या कांही मुद्दयांबाबत अपीलार्थीनी दि. ३ सप्टेंबर २००७ रोजी सुध्दा अर्ज दिला होता व त्यास दि. १७ सप्टेंबर, २००७ रोजी जे उत्तर दिलेले आहे त्यात कांही माहिती आलेलीच आहे. त्यांनी असेहि सांगितले की, मिठीबाई महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ऑक्टोबर २००० ते मार्च २००३ यामधील तृतिय वर्षात कला, वाणिज्य, विज्ञान परीक्षांच्या आवेदनपत्राच्या व त्यासोबत असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्रचलित प्रथेनुसार पुढील दोन सत्रात परीक्षा झाल्यानंतर नष्ट केल्या जातात. त्यामुळे अपीलार्थी यांनी नमूद केलेल्या पत्रानुसार माहिती उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही.

सहायक जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न देण्याची कारणे सांगतांना श्रीयुत वाखारकर हे फार मोठया प्रमाणामध्ये अर्ज करतात, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे दरवर्षी साधारणपणे चार लाख ते साडेचार लाख विद्यार्थ्यांकडून हजारापेक्षा जास्त परीक्षांचे आयोजन करण्यात येते व हे काम संवेदनशील वकालमर्यादेचे असल्यामुळे मुदतीत माहिती देता येणे शक्य नाही.

जन माहिती अधिका-यांचे हे म्हणणे यावेळेस मान्य करण्यात येते. पण नेहमीच ही सबब मान्य करण्यात येणार नाही. कुल सचिव यांनी मुदतीत उत्तरे दिल्या जातील यासाठी यंत्रणा सक्षम करावी. तसेच अपीलार्थी यांनी अर्ज करण्याबाबत विवेक बाळगावा.

जन माहिती अधिकारी यांनी असेहि सांगितले की, श्रीयुत वाखारकर हे मिठीबाई वाणिज्य महाविद्यालयात लिपीक म्हणून कार्यरत होते व त्यांनी केलेल्या गैरकारभारामुळे संस्थेने त्यांच्याविरुध्द कारवाई सुध्दा केलेली होती. म्हणून ते या संस्थेविषयी सारखे अर्ज करीत असतात. माहितीच्या अधिकारांत एक नागरिक म्हणून अपीलार्थी हे अर्ज करीत असतात त्यामुळे त्यांच्या गते निहासात जाण्याचे आयोगास कारण नाही.

मुदतीत माहिती का देता येवू शकली नाही याचे विवेचन सहायक जन माहिती अधिकारी यांनी केलेले आहे ते आयोगास योग्य वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*--आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)

दि. १७ डिसेंबर, २००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२८८२३/अपील क्रमांक-३३८१/०२

श्री. सुनिल मधुकर वाखारकर --अपीलार्थी
३-५, बी, ००७, हायवे पार्क,
ठाकूर संकूल, कांदिवली (पूर्व)
मुंबई - ४०० १०१

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी --उत्तरवादी.
रजिस्ट्रार सेक्रेटरिएट , मुंबई विद्यापीठ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

२.जन माहिती अधिकारी , रजिस्ट्रार सेक्रेटरिएट
मुंबई विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

*--विवेचन---*

श्रीयुत सुनिल मधुकर वाखारकर , मुंबई यांनी आयोगाकडे दि. ३१/१२/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा उप कुल सचिव उपस्थित होते.

अपीलार्थीस त्यांच्या दि. २५ जुलै , २००७ रोजीच्या अर्जानुसार महाविद्यालयाकडून जून २००० ते एप्रिल २००३ या कालावधीत शिक्षकांच्या नेमणूकीबाबतचे विद्यापीठाला प्राप्त झालेले प्रस्ताव व त्यास दिलेली मान्यता व किती शिक्षकांच्या नेमणूकीचे प्रस्ताव विद्यापीठाला प्राप्त झाले असल्यास त्यापैकी कोणत्याही एका मान्यता प्रस्तावाच्या प्रती इत्यादी माहिती पाहिजे होती.

यासंदर्भात दि. २३ ऑगस्ट, २००७ रोजी अपीलार्थीस रु२०/- भरण्याचे पत्र पाठविण्यात आले होते व अपीलार्थीनी दिश ३/९/२००७ रोजी पैसे भरलेले असून त्यांना दि. ३/९/२००७ रोजीच आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली आहे असे कागदपत्रावरुन दिसते.

मात्र दि. २५ जुलै २००७ रोजीच्या अर्जास माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. २७ ऑगस्ट २००७ रोजी प्रथम अपील सादर केले होते व त्या अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती देण्यात यावी असे आदेश दिले होते. मात्र याअगोदरच दि. २३ ऑगस्ट, २००७ रोजी अपीलार्थीस पैसे भरण्याचे पत्र पाठविण्यात आले होते असे कागदपत्रावरुन दिसते. व त्यांनी दि. ३/९/२००७ रोजी माहितीही प्राप्त करुन घेतलेली होती. कदाचित यामुळेच अपीलार्थी सुनावणीच्या वेळेला उपस्थित राहिले नसावेत. मात्र अपिलीय अधिका-यांना जन माहिती अधिकारी यांनी अपीलाच्या सुनावणीच्या वेळी आपण माहिती दिलेली आहे हे त्यावेळेस स्पष्ट सांगितले नसावे. त्यामुळे दि. ५ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या आदेशात ही माहिती देण्यात यावी असा उल्लेख करण्यात आलेला दिसतो. संबंधित जन माहिती अधिका-यांनी वेळेतच याबाबत अपिलीय अधिका-यांकडे स्पष्टीकरण न केल्यामुळे त्यांना समज देण्यात येत आहे.

अपीलार्थींना हवी असणारी माहिती ही त्यांनी पैसे भरुन प्राप्त करुन घेतलेली आहे असे दिसते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १७ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२८८२२/अपील क्रमांक-३३८२/०२

श्री. सुनिल मधुकर वाखारकर --अपीलार्थी
३-५, बी, ००७, हायवे पार्क,
ठाकूर संकूल, कांदिवली (पूर्व)
मुंबई - ४०० १०१

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी --उत्तरवादी.
रजिस्ट्रार सेक्रेटरिएट , मुंबई विद्यापीठ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

२.जन माहिती अधिकारी
रजिस्ट्रार सेक्रेटरिएट मुंबई विद्यापीठ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
विद्यानगरी कॅम्पस, कालीना, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ९८

*--विवेचन---*

श्रीयुत सुनिल मधुकर वाखारकर यांनी त्यांच्या दि. १३ ऑगस्ट, २००७ रोजीच्या अर्जानुसार एन.एम.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एन.वेलिंग यांनी प्राचार्य म्हणून नियुक्तीसाठी विद्यापीठ मंडळाच्या मान्यतेसंदर्भात कांही खुलासा मागणे व इतर कांही माहिती विचारलेली होती.

यास मुदतीत उत्तर न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी दि. १३ सप्टेंबर, २००७ रोजी प्रथम अपील सादर केले होते. त्यावर ४ ऑक्टोबर, २००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस द्यावयाची माहिती द्यावी असे निर्देश ५ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या आदेशाने दिले होते. मात्र जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस मागितलेली माहिती ही याआधीच

दिलेली आहे असे जेव्हा जन माहिती अपिलीय अधिका-यांच्या निदर्शनाला आणले तेव्हा २० ऑक्टोबर, २००७ रोजीच्या आदेशाने ५ ऑक्टोबर, २००७ रोजीचे आदेश खारिज करण्यात आले.

अपीलार्थींच्या अपीलावरुन त्यांचे अपील हे २० ऑक्टोबर, २००७ रोजीच्या आदेशाविरुध्द आहे असे दिसते. हे आदेश अपीलार्थीस आधीच माहिती देण्यात आलेली आहे असे निदर्शनास आल्यावरुन काढलेले आदेश आहेत. जर आधीच्या आदेशाचा उद्देश हा अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे हा होता व तद्नंतर ही माहिती आधीच उपलब्ध करुन दिलेली आहे असे निदर्शनाला आणल्यावरुन नंतर तो आदेश रद्दबातल करण्यात आला तर त्यात गैर असे कांही नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेलाच आपण ही माहिती दिलेली आहे हे स्पष्टपणे अपिलीय अधिका-यांच्या निदर्शनाला आणायला पाहिजे होते.

सुनावणीच्या वेळेला उपस्थित असणा-या सहायक माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार कदाचित अपीलार्थींच्या एकाच विषयावरील अनेक अर्ज असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडून असे झाले असावे असे त्यांनी सांगितले.

याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय सुनावणीच्या वेळी अतिशय जागरुकपणे माहिती द्यावयास पाहिजे याबाबत समज देण्यात येत आहे.

मात्र ५ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या आदेशात ही माहिती अपीलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यायची होती व दि. १३ ऑगस्ट २००७ रोजीच्या अर्जानुसार अपीलार्थीस कांही माहिती उपलब्ध करुन देतांना शुल्क वसूल करण्यात आले असेल तर ते परत करण्यात यावेत.

त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिका-यांच्या सुनावणीच्या वेळेला अत्यंत जागरुक राहून वस्तुस्थितीची कल्पना अपिलीय अधिका-यांना द्यावी.

शुल्काच्या बाबतीत वर दिलेल्या निर्देशांचे पालन करावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १७ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२८८३०/अपील क्रमांक-३३४८/०२

श्री. एडविन डिसोझा --अपीलार्थी
सी- -१०८, वर्सोवा, ज्यपिटर को.ऑप.हौ.सो.लि.
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, ४ था क्रॉस रोड,
अंधेरी (पश्चिम) मुंबई - ५३.

विरूध्द

१. विभागीय सहनिबंधक --उत्तरवादी.
सहकारी संस्था, मल्होत्रा हाउस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई १
२.जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक
सहकारी संस्था, मल्होत्रा हाउस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई १

*--विवेचन---*

श्रीयुत एडविन डिसोजा , अंधेरी यांनी आयोगाकडे दि. ११ मार्च २००८ रोजी जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक उपस्थित होते.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे होती ती माहिती दि. २३/१/२००८ रोजीच्या पत्राने शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. तसेच सुनावणीच्या वेळैला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नुकतेच सोसायटीवर प्रशासक नेमण्यासंबंधीचे अंतीम आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

अपीलार्थी  सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १७ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२९३६६/अपील क्रमांक-३३८४/०२

श्री. गणेश केशव पंडित --अपीलार्थी
शांती सदन, १ ला मजला, मनपा शाळेमागे,
वाकोला ब्रीज नेहरुरोड, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई - ५५.

विरुध्द

१. उप सचिव (पदुम-६) --उत्तरवादी.
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय (विस्तार) मुंबई ३२
२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदुम-६)
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय (विस्तार) मुंबई ३२

*--विवेचन---*

श्री. गणेश केशव पंडित यांनी आयोगाकडे दि. २१/१०/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. १७ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींची माहितीची मागणी ही त्यांना १४००-२६०० ही वेतनश्रेणी मिळणे आवश्यक असतांना रु १४००-२३०० या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती का करण्यांत आली वगैरे माहिती पाहिजे होती.

यासंदर्भात कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, यांनी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. पण तो प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. त्यामुळे अपीलार्थीस वित्त विभागाकडे पाठविलेल्या टिप्पणीची प्रत देण्यात यावी.

माहितीच्या अधिकारामध्ये कागदोपत्री जी परिस्थिती असेल त्याच्या प्रती मिळू शकतात. अपीलार्थींच्या तक्रारीच्या माध्यमातून त्यांची वेतनश्रेणी बदलून मिळावी ही एक मागणी असेल तर ते माहिती अधिकारात होवू शकेल असे वाटत नाही. त्यासाठी त्यांनी रितसर प्रशासकीय प्रयत्न करावेत.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १७ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३०१९१/अपील क्रमांक-३३५०/०२

श्री. मिलींद शरद मुळे --अपीलार्थी
२८४/१२, बांदेकर सदन, न.चिं.केळकर रोड,
दादर, मुंबई - ४०० ०२८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी --उत्तरवादी.
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१ .

२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१ .

*--विवेचन---*

श्रीयुत मिलींद शरद मुळे यांनी आयोगाकडे दि. ३ मार्च, २००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. १७ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस त्यांच्या मुळ अर्जानुसार त्यांनी दि. २८/८/२००७ रोजी जे पत्र दिले होते त्या पत्राची पुढील वाटचाल कशी झाली याची माहिती पाहिजे होती. ही माहिती त्यांना देण्यांत आली. मात्र जो मुळ मुद्दा होता की, " कार्यकारी अभियंता श्री. देशमुख यांना समज देण्यात येत आहे " असे जे कळविण्यात आले होते ती समज त्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात त्याची नोंद घेण्यांत आली होती किंवा नाही याची माहिती देण्यात आलेली नाही.

दि. १७ जानेवारी, २००८ रोजीच्या या संदर्भातील प्रथम अपिलीय निर्णयामुळे अपीलार्थी समाधानी नाहीत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे निदर्शनास आले की,

१. कार्यकारी अभियंता श्री.देशमुख यांना समज देण्याचा निर्णय घेण्यांत आला ती समज अल्पकालिक (ephemeral roll warning) या स्वरुपाची होती की डिसिप्लीन व कंडक्ट रूल्समधील विहित पध्दती अमलात आणून "वॉर्निंग " ही सजा देणारी होती याबाबत स्पष्टता नाही. तेव्हा ज्या अधिका-यांनी वॉर्निंग देण्याचे आदेश दिले असतील त्यांनी ही बाब स्पष्ट केली नसल्यास त्यांच्याकडून ते स्पष्ट करुन घ्यावे. जर समज ही ephemeral roll warning स्वरुपाची असेल तर तसे अपीलार्थीस कळवावे. जर ही समज गोपनीय अहवालात बरोबर ठेवावी असे त्या सक्षम प्राधिका-यांचे मत होते तर त्याबाबतची कारवाई करावी व तसे अपीलार्थीला कळविण्यात यावे. जरी हे अधिकारी आता बदलून गेले असतील मात्र सेवेमध्ये असतील तर त्यांच्याशी संपर्क साधून याबाबत त्वरित कारवाई करावी व हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलार्थीस कळविण्यात यावे.

२. अपीलार्थीनी आणखी एक मुद्दा आयोगाच्या निदर्शनास आणला की, त्यांच्या मुळ अर्जाला उत्तर हे अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आहे. याचाच अर्थ ते जर त्या माहितीने समाधानी न झाल्यामुळे अपीलात गेले तर ज्यांनी माहिती दिली आहे त्यांच्याचपुढे अपील जाणार व ते न्यायोचित होणार नाही. अपीलार्थीचा हा मुद्दा योग्य वाटतो.

अपीलार्थीस जे उत्तर द्यावयाचे आहे ते जन माहिती अधिकारी यांच्याच सहीनिशी देण्यात यायला पाहिजे याची संबंधित जन माहिती अधिका-यांनी तसेच अपिलीय अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी वर दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १८ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२९९२९/अपील क्रमांक-३३४१/०२

श्री. प्रविण दत्ताराम कुमठा --अपीलार्थी
एन/७/८, गणपती निवास, बांगुरनगर,
गोरेगांव (पश्चिम) मुंबई ९०

विरुध्द

१. सहायक मनपा आयुक्त --उत्तरवादी.
बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी/दक्षिण विभाग, मिठानगर म्युनिसीपल शाळा इमारत,
मिठानगर, गोरेगांव (पश्चिम) मुंबई ६५
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता
( इमारती व कारखाने)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी/दक्षिण विभाग, मिठानगर म्युनिसीपल शाळा इमारत,
मिठानगर, गोरेगांव (पश्चिम) मुंबई ६५

*--विवेचन---*

अपीलार्थी श्री. कुमठा यांनी दिनांक ५.९.२००७ रोजी सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे संस्थेच्या काही सभासदांनी इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याबाबत तक्रार केली होती. तथापि, महानगरपालिकेने उपरोक्त पत्राच्या संदर्भात काहीही कार्यवाही केली नसल्यामुळे दिनांक १४.९.२००७ च्या माहितीच्या अधिकारानुसार त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. तथापि, सहाय्यक आयुक्त व माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही. जेव्हा त्यांनी उपरोक्त अधिका-याकडे दूरध्वनीवर व प्रत्यक्ष पाठपुरावा केला तेव्हा त्यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी संस्थेला लिहीलेल्या पत्राची प्रत त्यांना सुपूर्द केली. पत्रात त्यांनी संस्थेला आवश्यक ती कागदपत्रे व माहिती सादर न केल्यास अधिनियमानुसार आवश्यक कारवाई करण्यात येईल असे सुचित केले होते. त्यानंतर त्यांनी या संदर्भात

विहीत मुदतीत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी सहाय्यक आयुक्त, पी/दक्षिण यांच्याकडे पहिले अपील केले होते. त्याची सुनावणी दिनांक २१ सप्टेंबर २००७ रोजी झाली. त्यावेळी उपरोक्त अधिका-याने अपीलार्थी यांना "आम्ही संस्थेच्या सचिवावरती योग्य ती कार्यवाही करून त्याचा माहिती अहवाल आपल्याला तात्काळ कळविण्यात येईल." असे आश्वासन दिले होते. तथापि महापालिकेने संस्थेविरूध्द कोणतीही कार्यवाही न करता कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, कांदिवली यांना गणपती निवास या इमारतीच्या संस्थेचे नकाशे उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक २७.११.२००७ च्या आदेशान्वये सुचित केले होते. त्याची प्रत अपीलार्थीस पाठविण्यात आली. वास्तविक "माहितीचा अधि कायदा, २००५" कलम १९(१) अन्वये विहित मुदतीत अपीलार्थीस माहिती देणे आवश्यक होते. असेही प्रतिपादन करून सर्वश्री. भा. पा. कोळेकर, सहाय्यक आयुक्त व म. के. जंगम, माहिती अधिकारी यांनी जाणीवपुर्वक माहिती देणे टाळले. त्यांनी अपीलार्थींना माहितीच्या अधिकारापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. अशा आशयाचे द्वितीय अपील अपीलार्थी यांनी दि. २२/२/२००८ रोजी केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. १६ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व वहायक अभियंता उपस्थित होते.

सोसायटीच्या इतर सदस्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबतची अपीलार्थींची तक्रार आहे त्याबाबत माहिती देण्यांत आलेली आहे. पण अपीलार्थींचे कृतीनेच समाधान होईल असे दिसते. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" श्री. प्रवीण द. कुमठा यांचा दिनांक १४.९.२००७ रोजी प्राप्त झालेला माहितीचा अधिकार व त्यांना माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने), पी/दक्षिण यांनी माहिती दिलेली आहे

गणपती निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेस सहाय्यक आयुक्त, पी/दक्षिण यांनी पत्र लिहीलेले आहे.

श्री. प्रविण कुमठा यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे वरील प्रकरणी सुनावणी मागितली होती व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी देण्यासाठी सर्व माहिती पुरविली होती.

वरील विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, श्री. प्रवीण कुमठा यांना वेळोवेळी सर्व कार्यवाहीची माहिती दिलेली आहे. कोणतीही माहिती देण्यास टाळाटाळ केलेली नाही."

दि. २७/१२/२००७ रोजी सहायक आयुक्त यांनी त्यांचेकडील सुनावणीसाठी प्रशासकीय अधिकारी , बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय यांना त्या कार्यालयाने यासंदर्भात जी जी म्हणून कारवाई केलेली आहे ती कारवाई कळविलेली आहे व त्याची माहिती अपीलार्थींना आहे. त्यामुळे अपीलार्थीस त्यांच्या प्रकरणात माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांकडून कसूर झालेला आढळून येत नाही. म्हणून पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)

दि. १८ डिसेंबर, २००८

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३०१९१/अपील क्रमांक-३५०९/०२

श्री. मोहमद फारुक अब्दुल ग. शेख --अपीलार्थी
फ्लॅट नं. ७०२, ७ वा मजला, अल हतीम इमारत,
क्रमांक १४ ब, मिलाट नगर, अंधेरी (पश्चिम)
मुंबई - ५३.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त --उत्तरवादी.
परिमंडळ ९, मुंबई यांचे कार्यालय,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, पश्चिम प्रादेशिक विभाग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०

*--विवेचन---*

श्रीयुत मोहम फारुक अब्दुल ग. शेख यांनी आयोगाकडे दि. २३ जुलै, २००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १८ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जी तक्रार दाखल केली होती त्यासंदर्भात अपीलार्थींना माहिती पाहिजे आहे. दि. ३०/५/२००८ रोजीच्या पत्राने अपीलार्थीस माहिती देत असतांना अपीलार्थींची तक्रार त्यांची पत्नी व इतरांविरुध्द आहे व पत्नीचेहि अपीलार्थीविरुध्दचे अपील पतीपासून संरक्षण मिळावे अशा पध्दतीची तक्रार आहे. व अपीलार्थींच्या अर्जातील मुद्दा हा दिवाणी स्वरुपाचा असल्यामुळे सिव्हील कोर्टातून याबाबतीत दाद मागावी अशा प्रकारची सुचना अपीलार्थीस करण्यात आलेली आहे.

अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या अपिलीय आदेशात याबाबत जे निर्देश दिलेले होते त्याप्रमाणे अपीलार्थी यांनी केलेल्या मुळ अर्जामध्ये नमूद केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाची प्रतहि अपीलार्थींना देण्यांत आलेली आहे. त्यामुळे अपीलार्थींच्या अर्जासंबंधात पोलीस स्टेशनमध्ये असलेल्या कागदपत्रांची माहिती अपीलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमान्वये करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---आदेश---

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १८ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३८२९/अपील क्रमांक-३५१०/०२

श्री. प्र.पु. पिंपरखेडे --अपीलार्थी
सहायक सरकारी अभियोक्ता
६/२५, शितल डनलॉप, अ.बी. मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०२५.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (प्रतिबंधक) --उत्तरवादी.
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,
छत्रपती शिवाजी मंडई, ३ रा मजला,
एम.आर.ए. मार्ग, मुंबई
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे)
पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई,
मुंबई - ४०० ००१.

*--विवेचन---*

निलंबीत सहायक सरकारी अभियोक्ता श्री. प्र.पु. पिंपरखेडे यांनी आयोगाकडे दि. २६ जुलै, २००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १८ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्रीयुत पिंपरखेडे यांनी दि. १२/४/२००८ रोजी जो जन माहिती अधिकारी यांना अर्ज सादर केला होता त्यात त्यांनी श्री. अनिल महाबुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व जयप्रकाश भोसले, सहायक पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द जी तक्रार केली होती त्या तक्रारीविषयी त्यांना माहिती पाहिजे होती. यासंबंधी जी माहिती देण्यांत आली त्यात यासंबंधी कोणी चौकशी केली एवढीच माहिती दिल्याचे दिसते. मात्र चौकशीमध्ये काय निर्णय घेण्यांत आला याबाबत कुठचीही माहिती दिसून येत नाही.

अपीलार्थींना दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपील दाखल केले होते ते मुदतीत सादर न केल्यामुळे अपिलीय अधिका-यांनी फेटाळून लावले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेला असे सांगितले की, यासंबंधातील अहवाल हा अंतीमतः संचालक सरकारी अभियोक्ता संचालनालय यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. आता अंतीम अहवाल हा संचालक सरकारी अभियोक्ता संचालनालयाकडेच आहे म्हणून त्या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती द्यावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*--आदेश--*

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी , संचालक, सरकारी अभियोक्ता संचालनालय यांना वरील आदेशाची प्रत देण्यात यावी व त्यांनी एका आठवडयाच्या आत अपीलार्थीस माहिती द्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी)

दि. १८ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३८२९/अपील क्रमांक-३५१८/०२

ॲड्. आर.एन. कच्छवे --अपीलार्थी
९८, २ रा मजला, एस्पमेनेड मेंशन,
काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

विरुध्द

१. विशेष कार्य अधिकारी (उर्जा १ ) --उत्तरवादी.
उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.
२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

*--विवेचन---*

ॲड्. आर.एन. कच्छवे यांनी दि. २८/२७/२००८ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १८ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलकर्ते अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस रिलायन्स, बी.एस.ई.एस. कंपनी यांच्यात झालेल्या व्यवहाराची माहिती, शासनास किती रक्कम मिळाली, तसेच विज बिल भाववाढ याबाबत माहिती पाहिजे होती.

जी माहिती कायद्यानुसार शासकीय विभागामध्ये असायला पाहिजे किंवा जी माहिती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे त्यांच्याकडून मागवून घेतली होती ती माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे.

खाजगी कंपन्यांच्या व्यवहाराबाबतची माहिती शासनाकडे असण्याचे कारण नाही, व ती तशी नाही असे विभागाचे म्हणणे आहे.   विभागाकडे असणारी सर्वच माहिती अपीलार्थीस देण्यात आल्याचे दिसून येते.

अपीलार्थी स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे याबाबतीतले म्हणणे समजून घेता आले नाही. म्हणून पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १९ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३८०८/अपील क्रमांक-३५१७/०२

श्री. मच्छिंद्र नवनाथ नागरगोजे --अपीलार्थी
बी.नं. १४, रु.नं.२२, सी विंग,
रेल्वे पोलीस मुख्यालय, पंतनगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई - ४०० ०७५.

.

विरुध्द

१. सचिव --उत्तरवादी.
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला,
म.गांधी मार्ग, मुंबई - १

२.जन माहिती अधिकारी तथा उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला,
म.गांधी मार्ग, मुंबई - १

*--विवेचन---*

श्रीयुत मच्छिंद्र नवनाथ नागरगोजे यांनी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये दि. २८/७/२००८ रोजी सादर केलेल्या अपीलाची सुनावणी दि. १८ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळैला अपीलार्थी, व जन माहिती अधिकारी, लोकसेवा आयोग हे उपस्थित होते.

अपीलार्थींनी सहायक/विक्री कर निरीक्षक/ पोलीस निरीक्षक पूर्व परीक्षा २००६ दिलेली होती व त्यात मिळत असलेली कार्बनलेस उत्तरपत्रिका, की टू अन्सर्स यावरुन त्यांना जेवढे मार्क मिळायला पाहिजे होते याबाबत त्यांचा अंदाज आहे व त्यांना त्याची स्वतःची राखीव कॅटेगरी एन.टी.डी आहे त्यामुळे त्या राखीव वर्गवारीसाठी असलेल्या गुणांपेक्षा जास्त गुण मिळायला पाहिजेत असे वाटून सुध्दा त्यांचे नाव

त्या यादीत नाही म्हणून त्यांनी दिलेली परीक्षा, त्यांना मिळालेले गुण व त्यांना पास म्हणून घोषित कां केल्या गेले नाही वगैरे संबंधी माहिती मागितली होती.

यावर माहिती देतांना अपीलार्थींनी अर्जातील रकाना क्र. १०/२ येथे जातीचा दावा केलेला नाही, यास्तव त्यांचा जातीचा दावा विचारात घेण्यांत आला नाही असे उत्तर देण्यांत आले. थोडक्यात अपीलार्थीचे सिलेक्शन का झाले नाही याची कारणमिमांसा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेली आहे.

अपीलार्थीस त्यांनी भरलेल्या परीक्षा फॉर्ममध्ये त्यांनी खरोखरच जातीचा दावा केलेला नव्हता याची खात्री करुन घ्यायची आहे, व त्याप्रमाणे त्यांच्या फॉर्मची कॉम्प्यूटर प्रिंटआउट महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अधिका-यांनी आणली होती ती सुनावणीच्या वेळेला देण्यांत आली. तसेच अपीलार्थींना स्वतः लोकसेवा आयोगामध्ये जावून यासंबंधीची खात्री करुन घ्यायची असेल तर ती सुध्दा त्यांना करुन घेता येईल असे लोकसेवा आयोगाच्या जन माहिती अधिका-यांनी सांगितले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १९ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३८४०/अपील क्रमांक-३५१६/०२

श्री. वैभव चंद्रकांत कोरगांवकर --अपीलार्थी
४८/३, राधाकृष्ण निवास, डॉ. आंबेडकर रोड,
दादर (पूर्व) मुंबई - ४०० ०१४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी --उत्तरवादी.
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई - ३२
२.जन माहिती अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई - ३२

*--विवेचन---*

श्री. वैभव चंद्रकांत कोरगांवकर यांनी माहिती व जनसंपर्क संचालनालयाने श्रीयुत एस.एस. ठोंबरे यांच्याबाबत दि. ३० सप्टेंबर, १९७२ रोजी जो श्री. ठोंबरे यांचे नांवाचा निवृत्ती दिनांकांचा दाखला दिला होता त्याची प्रत माहिती व जनसंपर्क विभागाकडून पाहिजे होती. यास माहिती व जन संपर्क विभागाने श्रीयुत एस.एस.ठोंबरे हे त्या विभागाचे कायम स्वरुपी कारकून नव्हते तर लेखा व कोषागरे संचालनालयाकडून आस्थापनेवरील बदली कर्मचारी होते. त्यामुळे श्रीयुत ठोंबरे यांच्यासंबंधातील कोणताही अभिलेख त्या कार्यालयाकडे नाही असे कळविले व अपिलीय निर्णयात सुध्दा जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती ही बरोबर आहे असे प्रतिपादन करुन अपील फेटाळण्यात आले म्हणून हे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपीलार्थीस जरी संबंधित प्रमाणपत्राची प्रत माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून मिळालेली नसली तरी त्यांनी ती प्रत इतर विभागाकडून प्राप्त करुन घेतली आहे. सदरील डॉक्यूमेंट हे एवढया दिर्घ

वर्षाच्या कालावधीनंतर त्या विभागात असण्याचे कारण नाही हेहि म्हणणे पटण्यासारखे आहे. तसेच दुस-या विभागाकडून का होईना अपीलार्थीस हवे ते कागदपत्र मिळालेले असल्यामुळे त्यांची माहितीची गरज ही भागलेली आहे असेच म्हणावे लागेल. जास्तीचा पुरावा म्हणून माहिती व जनसंपर्क विभागाकडून सुध्दा प्रत प्राप्त होवू शकते का याची खात्री करून घेण्याचा अपीलार्थी यांचा मानस असल्याचे दिसून येते. माहितीच्या बाबतीत आवश्यक ती माहिती आता अपीलार्थींकडे असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १९ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३७३७/अपील क्रमांक-३५१९/०२

श्री. सैफुल्ला हवालदार खान --अपीलार्थी
११६, न्यू धोबीघाट, रजक सोसायटी,
कॅ. प्रकाश पेठे मार्ग, कफ परेड, कुलाबा,
मुंबई - ४०० ००५.

विरुध्द

१. सहायक आयुक्त --उत्तरवादी.
बृहन्मुंबई महानगरपालिका, अ विभाग कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई १
२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ.व.का.)
बृहन्मुंबई महानगरपालिका, अ विभाग कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई १

*--विवेचन---*

श्रीयुत सैफुल्ला हवालदार खान यांनी त्यांच्या दि. ३१ जानेवारी, २००८ रोजीच्या अर्जानुसार महात्मा फुले नगर व धोबीघाट येथील अतिक्रमणे काढून टाकण्याची कारवाई करताना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी घेण्याची पूर्तता केली किंवा नाही याची माहिती पाहिजे आहे. यावर ही वसाहत शासकीय जमिनीवरील झोपडपट्टी असून आपण अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा असे दि. २०/२/२००८ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले व प्रथम अपिलीय अधिका-यांनी हाच निर्णय कायम केला व सदरचे अपील हे या आदेशाविरुध्दचे आहे.

संबंधित अतिक्रमण काढत असताना कागदपत्रांची जी नस्ती असेल त्यात महापालिका अधिका-यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कांही पत्रव्यवहार केला असेल तर त्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपीलार्थी

यांना देण्यात याव्यात, व पत्रव्यवहार केला गेला नसल्यास तसे स्पष्ट कळविण्यात यावे. तसेच ज्या कायद्याच्या कलमाखाली ही कारवाई करण्यात आली ते कलम अपीलार्थीस कळवावे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिका-यांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १९ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३७५४/अपील क्रमांक-३५२१/०२

श्री. भालचंद्र एम. गायतोंडे --अपीलार्थी
अकाउंट विभाग, एम.एस.पी.जी.सी. लि.
२ रा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१

विरुध्द

१. कर निर्धारण व संकलक (मुंबई) --उत्तरवादी.
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
तळ मजला, मुख्यालय, महापालिका मार्ग,
फोर्ट , मुंबई १
२. जन माहिती अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
तळ मजला, मुख्यालय, महापालिका मार्ग,
फोर्ट , मुंबई १

*--विवेचन---*

श्रीयुत भालचंद्र गायतोंडे यांनी दि. १२ ऑगस्ट, २००८ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. १९ डिसेंबर २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीना जी माहिती पाहिजे होती त्यामध्ये त्यांनी काल्पनिकरित्या एक प्लॉट विचारात घेवून त्यात अस्तित्वात असलेले व अतिरिक्त व बदल (**addition & alteration** ) म्हणून करण्यात आलेले बांधकाम त्यावर कशा पध्दतीने कर निर्धारण होईल याबाबतचा खुलासा जन माहिती अधिका-यांकडून अपेक्षिलेला आहे.

माहितीच्या अधिकारामध्ये माहितीची जी संज्ञा आहे त्यामध्ये एखादया विवक्षित प्रश्नावर जन माहिती अधिका-यांनी आपले मत देणे किंवा कायद्याचा खुलासा करणे या गोष्टी बसत नाहीत.

. सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा दिलेला आहे.

" अपीलार्थी श्री. भा. एम. गायतोंडे यांनी त्यांच्या दि. १२.०८.२००८ च्या मुख्य माहिती आयुक्तांना केलेल्या अपीलामध्ये, करनिर्धारण व संकलन खात्याने, त्यांनी मागितलेली माहिती, ही माहिती अधिकारांतर्गत 'माहिती' या स्वरूपात मोडत नसल्यामुळे, नाकारल्याची तक्रार केली आहे व २००५-०६ च्या प्रचलित निवासी भाडेदराच्या परिपत्रकामधील अनुक्रमांक १० मधील मुद्दयानुसार, नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या करनिर्धारणाबाबतचे नियम व मार्गदर्शक सूचनाबाबत स्पष्टीकरण देण्याची विनंती केली आहे.

याबाबत या खात्याचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

अपीलार्थीनी संदर्भित केलेल्या निवासी भाडेदर २००५-०६ बाबतचे परिपत्रक क्र.एसी/२४६/सा/दि. ०७.०१.२००६ मधील अनुक्रमांक १० मधील मुद्दा खालीलप्रमाणे आहे. **"In case of revision of assessment on account of addition and extension to the old property mean rate of new and old or new rate which ever is less is to be adopted."**

याबाबत असे नमुद करावयाचे आहे की, करनिर्धारणासाठी असलेल्या मार्गदर्शक तत्वांपैकी उपरोक्त नमूद केलेला हा एक मुद्दा आहे.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जासोबत मालमत्तेचा कोणताही तपशील, महानगरपालिकेने मंजूर केलेले इमारतीचे नकाशे/आराखडेची प्रत इत्यादी सादर न करता, स्वतःच एक आराखडा (स्केच) तयार करून त्या स्केचनुसार, मालमत्तेचे करनिर्धारण, उपरोक्त नमूद केलेल्या परिपत्रकातील मुद्दा क्र. १० प्रमाणे योग्य आहे किंवा काय?
याबाबतची माहिती मुख्यालयातील सार्वजनिक माहिती अधिका-याकडून मागितली होती. त्याअनुषंगाने, कोणत्याही तपशीलाअभावी असे अभिप्राय देण्यास नाकारण्यात आले होते.

याबाबत मालमत्ता करनिर्धारीत करण्याबाबतचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

करनिर्धारण व संकलन खात्याच्या विभागीय कार्यालयामधील विभाग निरीक्षकास प्रत्येक आर्थिक वर्षात (दरवर्षी) मालमत्तांचे निरीक्षणाच्यावेळी मालमत्तेमध्ये काही फेरबदल, सुधारणा, वाढीव बांधकाम, नवीन बांधकाम इत्यादी आढळल्यास, त्या मालमत्तेचे, कागदोपत्री पुरावे, प्रचलित पध्दतीनुसार व मार्गदर्शक सूचनानूसार, सक्षम अधिका-याच्या मंजूरीने, मुंबई महानगरपालीका अधिनियम कलम १६७ अनुसार करपात्रमुल्यामध्ये सुधारणा

करण्यात येते. यावेळी म.न.पा. ने मंजूर केलेले मालमत्तेचे आराखडे इत्यादी विचाराधीन घेण्यात येतात. महानगरपालिकेने आराखडे नवीन बांधकामासाठी किंवा वाढीव बांधकामासाठी मंजूर केले असल्यास त्याप्रमाणे मालमत्ता करनिर्धारीत करण्यात येते. सदर वाढीव करपात्रमूल्याची विशेष सूचना करदात्यावर बजाविण्यात येते. सदर विशेष सूचनेच्या अनुषंगाने, करदात्यास वाढीव मूल्याविरोधात तक्रार नोंदविण्याची मुभा, मुं.म.न.पा. अधिनियम कलम १६२ व १६७ अन्वये दिलेली आहे. अशाप्रकारे तक्रारीची अन्वेषण अधिका-यासमक्ष सुनावणी होते त्यावेळी मालमत्तेच्या सर्व गुणावगुणांचा विचार करून, अन्वेषण अधिकारी योग्य व रास्त असे करपात्रमूल्य निश्चित करतात. या सुनावणीच्यावेळी अन्वेषण अधिका-याचे अधिकार हे अर्ध-न्यायीक स्वरूपाचे (Quasi Judicial Authority) असतात. सदर निर्धारीत मुल्यदेखील करदात्यास मान्य नसल्यास, मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम २१७ अन्वये, लघुवाद न्यायालयात दावा नोंदविण्याची मुभा आहे. तथापि, अन्वेषण अधिका-याने एकदा निश्चित केलेले करपात्रमुल्य बदलण्याचे अधिकार लघुवाद न्यायालयाच्या न्यायाधिव्यतिरिक्त इतर कोणत्याही वरिष्ठ अधिका-यांना दिलेले नाहीत. यास्तव उपरोक्त पध्दतीनुसार निर्धारीत मुल्यांबाबत सार्वजनिक माहिती अधिका-याने आपले मत मांडणे, अधिनियमातील तरतुदीनुसार संयुक्तीक नाही.

अपीलार्थीस, प्रथम अपिलाच्या वेळी उपरोक्त बाब स्पष्ट केलेली आहे व तसेच त्यांनी विशिष्ट मालमत्तेचा तपशिल इत्यादी सादर केल्यास, त्याच्या करनिर्धारणाचा तपशील, संबंधित विभागीय सार्वजनिक माहिती अधिका-याकडून उपलब्ध अभिलेखावरून त्यांना देण्यात येईल असे कळविले होते. या प्रकरणात अपीलकर्त्यांस, मालमत्तेचे करनिर्धारण चुकीचे वाटत असल्यास, अभिलेखावरून माहिती एकत्रित करून, अधिनियमातील तरतुदीनुसार न्याय मागणे उचित ठरेल.

सद्यःपरिस्थितीत, माहितीच्या अधिकारांतर्गत, मुख्यालयातील सार्वजनिक माहिती अधिका-याने अभिप्राय देणे संयुक्तिक वाटत नाही. "

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी तथा करनिर्धारण व संकलक यांनी केलेला युक्तीवाद योग्य वाटतो. अपीलार्थीनी यांनी अपेक्षिलेली माहिती प्रत्यक्ष परिस्थितीत असेल असेल तर त्या प्लॉट/ प्रॉपर्टीची माहिती देवून कर संकलक व निर्धारण विभागाला पत्र पाठविले तर त्याचे निश्चितपणे उत्तर दिल्या जाईल अशीहि ग्वाही सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी तथा करसंकलक व निर्धारण यांनी दिली.

त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>*---आदेश---*</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. १९ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३७५१/अपील क्रमांक-३५२८/०२

श्री. मोहंमद शरिफ अब्दुल हमीद बागवान --अपीलार्थी
शबनूर एंटरप्रायजेस, रुम नं. ३९, १ ला मजला,
२९६, नागदेवी स्ट्रीट, मुंबई - ४०० ००३.

विरुध्द

१. पोलीस उपमहानिरीक्षक (प्रशासन) --उत्तरवादी.
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - १

२. जन माहिती अधिकारी
पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - १

*--विवेचन---*

श्रीयुत मोहंमद शरिफ अब्दुल हमिद बागवान, यांनी दि. ३०/४/२००८ रोजीच्या अर्जानुसार श्रीयुत समशेरखान पठाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पायधुनी पोलीस स्टेशन यांच्याबाबत १९८० सालापासून ते आजतागायत त्यांच्याविरुध्द झालेल्या तक्रारीची सद्य:स्थिती, त्यावर करण्यात आलेली कारवाई , दि. ३०/११/२००६ रोजी श्रीयुत समशेरखान पठाण यांना दिलेल्या शो-कॉज नोटीसचे स्वरुप व श्रीयुत समशेरखान यांचेबद्दल असलेली संपूर्ण माहितीची मागणी केली होती.

अपीलार्थीस ही माहिती फार दीर्घ कालावधीची आहे व ती उपलब्ध करुन देण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ लावून माहिती काढून घेण्याची आवश्यकता आहे. अपु-या कर्मचारीवर्गामुळे ते शक्य होत नाही. तरी आपणास नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याबाबत आपण विवक्षितपणे कळविल्यास आपणांस माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे अपीलार्थीस कळविण्यात आले.

प्रथम अपीलात अपिलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही अपीलार्थीस त्यांच्या वैयक्तिक कामकाजासंबंधी (श्रीयुत समशेरसिंग पठाण यांचेविरुध्द केस दाखल करण्याससंबंधी )हवी असून त्यामागे कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८(१)(ड) व (ञ) मधील तरतुदीनुसार माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असा निर्णय घेतला त्याविरुध्दचे सदरचे अपील आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी त्यांचे अॅड्व्होकेट हजर नाही म्हणून सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली व ते स्वतःही सुनावणीस हजर नव्हते. आयोगापुढे असलेल्या प्रचंड प्रमाणातील अपीलांची संख्येमुळे व अत्यंत अपवादात्मक परिस्थिती व्यतिरिक्त सुनावणी पुढे ढकलल्या जात नाहीत. अपीलार्थींची तशी परिस्थिती या अपीलाच्या बाबतीत नसल्यामुळे व दिलेले कारण अत्यंत सर्वसाधारण स्वरुपाचे असल्यामुळे अपीलार्थींचा अर्ज फेटाळण्यात आला. मात्र त्यांचा अपीलमेमो विचारात घेण्यांत आला.

अपीलार्थीना हव्या असणा-या माहितीचे स्वरुप श्रीयुत पठाण यांचेविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारी, विभाग त्यांच्याविरुध्द करत असलेली कारवाई यांच्यासंदर्भातील आहे. अपीलार्थीविरुध्द केलेल्या तक्रारीवर विभागाने दखल घेतली असून त्यांना शो-कॉज नोटीसही देण्यात आलेली आहे व सुनावणीच्या वेळेला असेहि सांगण्यांत आले की, त्यांनी नुकतेच अशा शो-कॉज नोटीसीला उत्तरहि दिलेले आहे. त्यामुळे श्रीयुत पठाण यांच्याविरुध्द करायच्या कारवाईचे स्वरुप नजिकच्या काळातच निश्चित होणार आहे. तेव्हा अपीलार्थींना दिलेल्या शो-कॉजच्या नोटीसीचे उत्तरावरील कारवाई ही त्वरेने पूर्ण करुन कारवाईचे स्वरुप निश्चित झाले की सदरील अपीलार्थी श्री. बागवान यांना हवी असलेली माहिती देण्यात यावी .

त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी वर दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी)

दि. २० डिसेंबर, २००८

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३७३८/अपील क्रमांक-३५२६/०२

श्री. प्रियेश भेडा --अपीलार्थी
४३- टी, पी.ॲन्ड टी क्वार्टर्स,
आर.ए. किडवाई मार्ग, मुंबई - ४०० ०३१.

विरुध्द

१. पोलीस उपआयुक्त --उत्तरवादी.
परिमंडळ ३, भायखळा, मुंबई.
२. जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाउंड,
डॉ. बी.ए. रोड, भायखळा (पूर्व) मुंबई.

*--विवेचन---*

श्रीयुत प्रियेश भेडा यांनी आयोगाकडे दि. १८ ऑगस्ट २००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १९ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी श्री. प्रियेश भेडा यांच्याविरुध्द सायन पोलीस ठाण्यात नोंद असलेला गु.र.क्र. २३/०८ व ४२०, २६५, ४६७ ,४७१ भादवि या गुन्हयासंदर्भात त्यांनी कांही माहिती मागितली होती, व त्यातील एक मुद्दा हा त्या गुन्हयातील फिर्यादी यांचेविरुध्द अपीलार्थी यांनी तक्रार केली होती त्याची माहिती आहे काय १ यास होय असे उत्तर देण्यात आलेले आहे. अपीलार्थींच्या माहितीच्या अधिकारातील अर्जातील पुढील प्रश्न जर आधीच्या प्रश्नांचे उत्तर होय असेल तर फिर्यादीची अपीलार्थी विरुध्दची तक्रार हा दबावतंत्राचा भाग आहे असे वाटत नाही का १ असा आहे. यावर वैयक्तिक मत विचारले असल्यामुळे सदरचा मुद्दा गैरलागू

आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे व अपीलार्थींचा मुख्यत्वेकरुन आक्षेप यावरच आहे. अपिलीय अधिका-यांनी मात्र जन माहिती अधिका-यांनी घेतलेल्या पवित्र्याचे समर्थन केलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये ज्याप्रमाणे रेकॉर्ड उपलब्ध असेल त्याप्रमाणे व त्यातील माहिती द्यायची असते. त्यामुळे अमुक निर्णय घेण्याअगोदर आपण त्यावर सखोल विचार केला होता का १ अमुक एखाद्याच्या कृतिच्या मागे काय विचारधारणा असू शकेल अशा प्रकारच्या मुद्दयांची माहिती देणे हे अपेक्षित नाही. अपिलीय अधिका-यांनी याबाबत घेतलेला निर्णय हा योग्य वाटतो. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. २० डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३७४०/अपील क्रमांक-३५२७/०२

श्री. प्रियेश भेडा --अपीलार्थी
४३- टी, पी.ॲन्ड टी क्वार्टर्स,
आर.ए. किडवाई मार्ग, मुंबई - ४०० ०३१.

विरुध्द

१. पोलीस उपआयुक्त (अभियान) --उत्तरवादी.
पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,
क्रॉफर्ड मार्केटसमोर, डी.एन.रोड,
मुंबई - ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त (समन्वय)
पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,
क्रॉफर्ड मार्केटसमोर, डी.एन.रोड,
मुंबई - ४०० ००१.

*--विवेचन---*

श्रीयुत प्रियेश भेडा यांनी आयोगाकडे दि. १८ ऑगस्ट २००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. १९ डिसेंबर, २००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार एखादया व्यक्तीने पोलीसांत स्वतःची सही बनावट केल्याप्रकरणी तक्रार केल्यावर मुंबई पोलीस सदर तक्रारीवर कशाप्रकारे तपास करतात व आरोप सिध्द करण्यासाठी कोर्टात कशाप्रकारे पुरावा सादर करतात. तसेच खोटया सहया करुन फसवणूक करणा-या गुन्हयासंदर्भात मुंबई पोलीसांची तपासात वापरण्यात येणारी शास्त्रीय पध्दत व फसवणूक, फ्रॉड वगैरे बाबत तक्रार दाखल करणे संबंधित नियम/ अटी बाबतच्या माहितीची मागणी केली होती. परंतु सदर बाबतची माहिती त्यांना मिळालेली नाही.

शासकीय माहिती अधिकारी व सहायक पोलीस आयुक्त (समन्वय) यांनी असा युक्तीवाद केला की, केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत कार्यालयाच्या अभिलेखावरील माहिती देणे अभिप्रेत आहे. कलम २ (फ) मधील तरतुदीप्रमाणे अपीलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत त्यांनी कळविल्यास त्यांना हवी असलेली माहिती पुरवणे सुलभ होईल.

मात्र अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेशात याबाबत पुढीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.

"अपीलार्थीच्या सदर युक्तीवादावर अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, एखादया बनावट सही केलेल्या गुन्हयामध्ये तपासी अधिकारी प्रथम कलम १५४ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये गुन्हा (F.I.R) नोंद करुन, तपासात पुरावे मिळवून संशयीत इसमास अटक करण्यात येते. गुन्हा नोंद केल्यावर अटक करणेबाबतचा निर्णय तपासी अधिकारी उपलब्ध पुराव्याच्या आधारे घेतात. बनावट सहीबाबत संबंधित इसमांच्या सहयाचे नमूने घेवून ते हस्ताक्षर तज्ञांना त्यांच्या अभिप्रायाकरिता पाठविण्यात येतात. "

सुनावणीच्या वेळेला दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की, कुठचाही तपास हा फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार करण्यात येतो व त्या कायद्याची प्रत अपीलार्थीस बाजारातून सहजतेने उपलब्ध करुन घेता येईल व या व्यतिरिक्त अपीलार्थीस अपिलीय अधिका-यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. २० डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक रा.मा.आ./तक्रार क्र.१९४/०८/०१

श्रीमती मोहिनी मुकुंद भट, -- तक्रारकार
बी/३, "सहयाद्री", पांडूरंगवाडी,
१ला रस्ता, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३.

विरुध्द

१) जन माहिती अधिकारी तथा तलाठी, -- उत्तरवादी
तलाठी कार्यालय,
मुर्धा, मोर्वागाव, भाईंदर (प), जि. ठाणे
२) जन माहिती अधिकारी तथा मिरा भाईंदर महानगरपालिका,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.) जि. ठाणे.

*-विवेचन-*

तक्रारदार श्रीमती मोहिनी मुकुंद भट यांनी आयोगाकडे दिनांक २६.९.२००८ रोजी तलाठी, मुर्धा, मोर्वागाव तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करून गोठणे, तनशी, वड, तनशी, कांदुरली यांच्या ७/१२ चे उतारे व इतर कागदपत्रे याची मागणी केली होती. यावर मुदतीत प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीची सुनावणी दिनांक १९.१२.२००८ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला तक्रारदार श्रीमती मोहिनी भट आणि जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तलाठी कार्यालयावर जन माहिती अधिकारी असल्याचा बोर्ड नाही तसेच अपिलीय अधिकारी कोण आहे याचाही उल्लेख नाही असे निदर्शनास आणण्यात आले. त्यावेळचे तलाठी आता बदलून गेले आहेत.

विद्यमान तलाठयांना असा बोर्ड लावण्याचे निर्देश देण्यात आले. व तत्कालीन तलाठयांना लेखी समज देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात येत आहेत.

१. तक्रार्रदारानी ७/१२ चे उतारे व इतरही कागदपत्रे याबाबतच्या मागणीबाबत असे दिसून आले की, तक्रारदारांकडे सर्व्हे नंबर किंवा इतर कुठचीही माहिती नाही. फक्त मुकुंद केशव भट व उदय केशव भट यांच्या नावावर २-२ मिठागरे आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु सकृतदर्शनी तसे दिसून येत नाही असे तलाठी यांचे म्हणणे आहे. एवढया नावाच्या बेसीसवर रेकॉर्ड शोधून काढायचे झाल्यास त्याला वेळ लागेल. तलाठी यांना असे निर्देश देण्यात आले की, त्यांनी १० दिवसामध्ये असलेल्या कागदपत्रांचा शोध घ्यावा. तक्रारदारांनी तलाठी कार्यालयात स्वतः जावून उपलब्ध कागदपत्रे प्राप्त करून घेण्याचा इच्छा प्रदर्शित केली. त्यामुळे सदरील तक्रार ही निकाली काढण्यात येत आहे.

२. श्रीमती मोहीनी भट यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे जन माहिती अधिकारी यांचेकडे सुध्दा सध्याची इंद्रप्रस्थ बिल्डींग (नगरपालिकेसमोर ) त्याच्या अगोदर त्याठिकाणी असलेल्या इमारतीचा उल्लेख करून इंद्रप्रस्थ बिल्डींगचा अधिकृत ताबा कोणाकडे आहे, बिल्डीग कायदेशिर आहे का वगैरे माहिती विचारलेली होती. या अर्जावर जन माहिती अधिकारी , मिरा-भाईंदर महानगर पालिका यांच्या मार्फत काहीही कार्यवाही झाली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

तक्रारददारांचा अर्ज बघता अर्जात CTS नंबर किंवा इतर माहिती दिसत नाही. मात्र अर्जदारांच्या अर्जाला महापालिकेने मुदतीत उत्तर द्यायला पाहीजे होते. तसे उत्तरही दिले गेलेले दिसत नाही. तेव्हा जन माहिती अधिकारी मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी तक्रारदारांस,

त्यांच्या कार्यालयात त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांसह बोलावून घ्यावे. व तक्रारदाराना  जास्तीत जास्त माहिती पुरविण्याची कार्यवाही करावी.  त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

-----*आदेश*------

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २२/१२/२००८

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

अपिल क्रमांक २००८/२८६७/०२

श्री. जहांगीर बी. गई, -- अपिलकार
वाडीया बिल्डींग, ५९८ अे, गिरगांव रोड,
मुंबई - ४०० ००२.

विरुध्द

१ अपिलीय अधिकारी तथा -- उत्तरवादी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धर्मदाय आयुक्त भवन, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई -४०० ०१८.

२. जन माहिती अधिकारी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धर्मदाय आयुक्त भवन, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई -४०० ०१८.

*-विवेचन-*

श्री. जहांगीर बी. गई, मुंबई यांनी आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे दिनांक २९ ऑगस्ट २००७ रोजी जे द्वितीय अपिल सादर केले होते त्या अपीलाची सुनावणी दि. १५ सप्टेंबर व १७ सप्टेंबर २००८ रोजी घेण्यात आली होती.

अपिल क्रमांक २८६७ ची सुनावणी देतांना जन माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय व अपिलार्थी हे सुनावणीच्या वेळेला एकाच वेळी उपस्थित नव्हते. अपिलार्थी यांची सुनावणी १५ तारखेला झाली व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे १७ तारखेला ज्या वेळेला ऐकून घेतले त्यावेळेला अपिलार्थी उपस्थित नव्हते. त्यामुळे त्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थी आता जी माहिती मागतात त्या माहितीची मागणी त्यांच्या मुळ अर्जात केलेली नव्हती. परंतु अपीलार्थी यांनी भेटून असे सांगितले की, अशी परिस्थिती नाही. त्यांनी एकुण दोन अर्ज केलेले होते. व

त्यांचे दिनांक १ जुन २००७ रोजीच्या अर्जामध्ये त्यांनी विवक्षीतपणे न्यु ईरा ऐज्युकेशन ट्रस्टच्या ऑडीटेड अकाऊंटची मागणी केलेली होती. अपीलार्थींचे दोन मुळ अर्ज होते ही बाब त्यावेळेला आयोगाच्या निदर्शनाला न आणल्यामुळे अपिलीय स्टेजला माहितीची व्याप्ती वाढविता येत नाही. अपिलार्थीने नविन अर्ज करावा असे आदेश पारित केले होते. आता अपिलार्थीना त्यांनी या आधीच असा अर्ज दिनांक १ जुन २००७ रोजी केलेला असल्यामुळे असे निर्देश देण्यात येत आहेत की, अपीलार्थींना जी न्यु ईरा एज्युकेशन ट्रस्ट P.I.R. No E-१०४७० न्यु ईरा स्कुल बिल्डींग, १७, न्यायमुर्ती सिताराम पाटकर मार्ग, मुंबई ०७ या संस्थेचे नवीनतम (Latest)ऑडीटेड अकाऊंट हे ७ दिवसाच्या आत उपलब्ध करून देण्यात यावे.

-----*आदेश*------

अपिल मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थीस हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग यांनी कुठलेही शुल्क न आकारता ७ दिवसाचे आत द्यावी.

मुंबई
दिनांक २२/१२/२००८

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील /सी आर क्रमांक-२४८/२००८

श्री. राहुल ज्ञानेश्वर देशमुख --अपीलार्थी
मु. सुळे पिंपळगांव, पो.ठा. पिंपळगांव,
ता. शेवगांव, जि. अहमदनगर.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता --उत्तरवादी.
रोजगार हमी योजना (कार्य) विभाग,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर.
२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम उप विभाग शेवगांव,
ता. शेवगांव, जि. अहमदनगर.

*--विवेचन---*

श्री. राहुल ज्ञानेश्वर देशमुख यांनी आयोगाकडे दि. ७/९/२००७ रोजी जे द्वितीय अपील सादर केले त्याची सुनावणी दि. २३/९/२००८ रोजी अहमदनगर मुक्कामी घेण्यांत आली.

श्री. देशमुख यांनी जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप विभाग शेवगांव यांचेकडे दि. २९/५/२००७ च्या माहितीच्या अर्जान्वये रस्त्याची देखभाल, डांबर खरेदी इत्यादी बाबतची माहिती मागितली होती. ही माहिती विहित मुदतीत प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी याविरुध्द दि १२/७/२००७ च्या प्रथम अपीलाद्वारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडे संपर्क साधला. श्री. देशमुख, अपीलार्थी यांनी जे प्रथम अपील

दाखल केले होते त्यावर सुध्दा विहित कालावधीत निर्णय झाला नाही असे नमूद करुन त्यांनी हे द्वितीय अपील दाखल केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल झालेल्या अर्जावर व प्रथम अपीलावर योग्य पध्दतीने कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचा याबाबतचा खुलासा हे आदेश प्राप्त झाल्यानंतर आयोगाकडे १५ दिवसांच्या आत पुराव्यानिशी पाठवावा. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० च्या तरतुदीनुसार त्यांचेवर रु २५,०००/- एवढी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण हे आदेश प्राप्त झाल्यानंतर आयोगास १५ दिवसांचे आत सादर करावे. विहित मुदतीत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्यास संबंधितांना काही खुलासा करावयाचा नाही असे गृहित धरुन पुढील कार्यवाहीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता यांनी कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती अपीलार्थी श्री.देशमुख यांना तांतडीने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

---आदेश---

अपील मान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २२/१२/२००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./३३७९७/अपील क्रमांक-३५०३/०२

श्री. हरिबा महादेव चोपडे --अपीलार्थी
रुम नं. ३, सावित्रीबाई माळीण चाळ,
परीघ खाडी वसाहत, एल.बी.एस.मार्ग,
सुधाकर स्टोअर्स मागे, कुर्ला (प) मुंबई ७०.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त --उत्तरवादी.
परिमंडळ ३, मुंबई यांचे कार्यालय, मुंबई .
२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,
बावला कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड, भायखळा, (पूर्व) मुंबई

*--विवेचन---*

श्री. हरिबा महादेव चोपडे, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांनी कुर्ला पोलीस ठाणे येथे दि. १२/१/२००८ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने काही माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान न झाल्याने अपीलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. ज्याची दि. १७/१२/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला अपीलकार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला लेखी खुलासा व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अर्जदाराने केलेल्या माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिका-यांनी अर्जदाराला माहिती पुरविली. त्यापैकी फुलसुंदर यांच्या जागेचा कागदोपत्री पुरावा त्यावेळी जन माहिती अधिका-यांकडे उपलब्ध

नसल्यामुळे अर्जदाराला पुरविण्यात आला नाही. अपीलकाराने दाखल केलेल्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकाराला जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत माहिती दिली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे, असे आदेश दिले. दि. १२/१/२००८ च्या तक्रारीची प्रत वगळता इतर माहिती मिळाली नाही आणि फुलसुंदर यांनी कागदपत्रे व पुरावा चौकशी अधिकारी यांना सादर केला नाही. अशी दिशाभुल करणारी माहिती दिली याकारणास्तव अपीलकाराने द्वितीय अपील दाखल केले आहे.

"अर्जदार यांना नमूद माहितीमध्ये त्यांनी दि. १२/१/२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जाचे चौकशी अहवालाबाबतचे मागणी केल्याप्रमाणे चौकशी अहवाल देण्यांत आला व त्यामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचा वाद दिवाणी स्वरुपाचे असून सनदशिर मार्गाने सोडविण्याच्या सूचना दिल्या असून सदर ठिकाणी शांतता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत अर्जदार व गैरअर्जदार या दोघांनाही समज देण्यांत आली होती. तसेच अर्जदार यांनी त्यांचे अर्जात त्यांचेविरुध्द दि. १४/३/२००८ रोजी श्रीमती. निर्मला सहदेव फुलसुंदर यांनी केलेल्या तक्रार अर्जाची छायांकित प्रत मिळण्याबाबत विनंती केल्यावरुन ती सुध्दा अर्जदार यांना छायांकित प्रतीमध्ये उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. तसेच अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेल्याप्रमाणे दि. १२/१/२००८ रोजी अर्जदार यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. २२/१/२००८ रोजीचा अर्जदार यांचा लेखी जबाबाची छायांकित प्रत सुध्दा अर्जदार यांना देण्यांत आलेली आहे. सदरची माहिती ही अर्जदार यांना अर्ज केल्यापासून सात दिवसांत देण्यांत आलेली आहे. "

उपलब्ध कागदपत्रावरुन जन माहिती अधिका-यांनी फुलसुंदर यांच्या जागेचा पुरावा या माहिती खेरीज इतर माहिती अपीलकाराला दिलेली आहे असे दिसून येते. अर्जदार यांनी मागणी केलेले प्रॉपर्टी कार्ड (सात बाजारा उतारा), जागेची विक्री केल्याचा पुरावा दुरुस्त करीत असलेल्या खोल्याचा पुरावा यापैकी कोणतेहि कागदपत्र चौकशी करता सादर न केल्याने अर्जदारास देण्यात येत नाही. अर्जदार यांना असलेल्या त्रासाबद्दल त्यांनी तक्रारी अर्ज सादर केला आहे. त्याबाबत चौकशी करुन त्याचा अहवालहि पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ५ यांचेकडे दि. ११/१२/२००८ रोजी सादर करण्यात आला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. म्हणजेच जन माहिती अधिका-यांनी त्यांच्याकडे उपलब्ध

असलेली सर्व संबंधित माहिती अपीलकाराला दिलेली आहे.  अपीलकारानी द्वितीय अपीलात उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबतची वस्तुस्थिती वरील प्रमाणे आहे हे लक्षात घेता सदर प्रकरणी मी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २३/१२/२००८

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

रामाआ २००८/अपील क्रमांक ३२४४/०२

श्री. रुद्रपालप्रताप के. अग्रवाल, ------- अपीलकार
१०७/c, सोहनी मॅन्शन,ऑगस्ट क्रांती मार्ग,
मुंबई- ३६

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, ------ उत्तरवादी
झोन नं.२, सर जे. जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई- ००८

जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे. जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई- ००८

-विवेचन-

श्री. रुद्रपालप्रताप के. अग्रवाल, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक २४/१०/२००८ रोजी सुनावणी आयेजित करण्यात आली होती.सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकारांनी त्यांचा गांवदेवी पोलीस स्टेशनला दिनांक १८/४/२००६ रोजी नोंदवलेल्या जबाबाच्या अनुषंगाने एकूण १३ मुद्दयांवर माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.एकूण १३ मुद्दयापैकी दोन मुद्दयांची माहिती जनमाहिती अधिका-यांनी अधिनियमाच्या कलम ११(१) अन्वये नाकारली व इतर माहिती अपीलकाराला दिली. सदर माहितीने समाधान न झाल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अधिनियमाच्या कलम ११(१) नुसार काही माहिती नाकारली आहे व या प्रकरणासंदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई यांना सदरचा अहवाल सादर करण्यात आल्यामुळे अपीलकारांनी माहितीसाठी मा. उच्च न्यायालयाला विनंती करावी असे सांगितले असता अपीलकार त्यांची बाजू मांडण्यास
असमर्थ ठरले, त्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे. अशा स्वरूपाचे आदेश प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केले आहेत.

अपीलकाराच्या म्हणण्यानुसार त्यांना श्री. अहिरे , कोर्ट रिसीव्हर यांचे प्रतिनिधी यांच्या जबाबाची प्रत दिलेली नाही.तसेच कोणत्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालयाला सदर प्रकरणी अहवाल सादर केला त्याचा संदर्भ क्रमांक दिला नाही. उपलब्ध कागदपत्रावरून असे दिसून येते की, माहिती अर्जामध्ये नमूद प्रकरणामध्ये मा. न्यायालयाला अहवाल सादर झालेला आहे. एखादया प्रकरणामध्ये मा. न्यायालयाला अहवाल सादर झाल्यानंतर संबंधित माहिती उघड करण्यामध्ये काही अडचण नसावी. सदर प्रकरणामध्ये मा. न्यायालयाला अहवाल सादर केल्यानंतर त्याची एक प्रत संबंधित पोलीस ठाण्याकडे उपलब्ध असणे सहज स्वाभाविक आहे. या ठिकाणी मा.न्यायालयाला प्रकरण सादर झालेले असल्यामुळे आता अधिनियमातील कलम ११(१) ची तरतूद लागू करणे अप्रस्तुत आहे. अपीलकाराने विचारलेली माहिती उघड केल्याने मा.न्यायालयाचा अवमान होत नसल्यास तसेच त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेमध्ये बाधा येत नसल्यास वर नमूद केल्याप्रमाणे मा. न्यायालयाला सादर केलेल्या अहवालाच्या संबंधित पोलीस कार्यालयाकडे असलेल्या प्रतीमधून अपीलकाराने विचारलेल्या माहितीचा अंतर्भाव असलेली कागदपत्रांची प्रत जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला उपलब्ध करून दयावी. कागदपत्रे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यास अपीलकाराला ज्या पत्रान्वये मा. न्यायालयाला अहवाल सादर केला त्या पत्राचा संदर्भ क्रमांक व दिनांक अपीलकाराला उपलब्ध करून दयावा. ही कार्यवाही जनमाहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आंत पूर्ण करावी , असे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश जोशी )
मुख्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग,
महाराष्ट्र राज्य

मुंबई, दिनांक २३/१२/२००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २८७४/०२

श्री.रणजीत आर. चंदी, ------- अपीलकार
९,अवंती, सेंट थेरेसा कान्व्हेंटच्या समोर,
एस.व्ही. रोड, सांताक्रुझ (प) मुंबई- ५४

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा रजिस्ट्रार , मुंबई विदयापीठ ------ उत्तरवादी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विदयानगरी कॅम्पस्,
कलीना, सांताक्रूझ (पूर्व) मुंबई- ४०० ०९८

जनमाहिती अधिकारी ,
मुंबई विदयापीठ, लोकमान्य टिळक भवन,विदयानगरी,
सांताक्रूझ (पूर्व) मुंबई - ९८

-विवेचन-

श्री. रणजीत आर. चंदी, मुंबई यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक ११/९/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व उत्तरवादी उपस्थित होते.

अपीलकाराने दाखल केलेले व्दितीय अपील हे त्यांच्या दिनांक ५/६/२००८ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आहे. उपरोक्त दिनांक ५/६/२००८ च्या माहिती अर्जान्वये अपीलकारांनी त्यांना एम.ए.भूगोल ऐवजी एम.एस्सी. भूगोल ही पदवी बदलून मिळण्याच्या विषयाच्या अनुषंगाने एकूण ६ मुद्दयावर माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता.जनमाहिती अधिका-यांनी मुद्दा क्रमांक २ ,५,६ वगळून इतर मुद्दयांची अपीलकाराला माहिती दिली.मुद्दा क्रमांक २,५,६ हे भूगोल विभागाशी संबंधित असल्याने त्यांच्याकडून सदर माहिती उपलब्ध होउ शकेल असे अपीलकाराला कळविण्यात आले.अपीलकाराने माहिती मिळाली नाही विशेषतः मुद्दा क्रमांक २ व ४ ची माहिती तसेच भूगोल विभागाने मुद्दा क्रमांक २,५ व ६ ची माहिती देणे आवश्यक आहे या कारणास्तव प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर

अपीलकाराला जनमाहिती अधिका-यांनी पुन्हा माहिती दिली. तसेच रजिस्ट्रार यांनी त्यांच्या दिनांक ८ ऑगस्ट २००७ च्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक २,५ व ६ ची माहिती अपीलकाराला दिली.

मुद्दा क्रमांक २ बाबत माहिती मिळाली नाही व प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी भूगोल विभागाचे प्रमुख उपस्थित नव्हते या कारणास्तव अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केलेले आहे. तथापि उपलब्ध कागदपत्रावरून जनमाहिती अधिकारी व रजिस्ट्रार यांनी सर्व मुद्दयांची माहिती दिली असल्याचे दिसून येते.

अपीलकारांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार त्यांना एम.ए.भूगोल ऐवजी एम.एस्सी. भूगोल ही पदवी बदलून मिळणेबाबत आयोगाने लक्ष घालावे अशी त्यांची अपेक्षा आहे. तथापि ही बाब माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. त्यामुळे याबाबत आयोगाला भाष्य करता येणार नाही.

माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अपीलकाराला पुरवण्यात आलेली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश जोशी )
मुख्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग,
महाराष्ट्र राज्य

मुंबई
दिनांक २६/१२/२००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. ८२२८ २००८/अपील क्रमांक २७२२/०२

श्री. राजेंद्र दगडू पवार ------- अपीलार्थी
द्वारा- प्रमेश्वर संपतराव कोळी
हिवाळे चाळ, महेंद्र कंपाउंड, दामुनगर,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) मुंबई -४०० १०१.

विरूद्ध

१. शिक्षण निरीक्षक (पश्चिम विभाग,) ------ उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, जोगेश्वरी (पूर्व)
मुंबई - ६०
२. जनमाहिती अधिकारी
ज्ञानसाधना एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय,
मनोरी, मालाड (पश्चिम) मुंबई - ९५

-विवेचन-

अपीलार्थी श्री. राजेंद्र दगडू पवार, यांनी मागविलेली माहिती योग्यरित्या न मिळाल्याने त्यांनी दि. २/९/२००६ रोजी आयोगाकडे द्वितमीय अपील केले आहे. सदर अपीलाची सुनावणी आयोगाच्या कार्यालयात दि. २०/८/२००८ रोजी आयोजित करण्यात आली असता सुनावणीच्या वेळी अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी दि. २२/२/२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञ ाानसाधना विद्यालय, मनोरी, मालाड (पश्चिम) मुंबई यांच्याकडून एकूण १८ मुद्दयांची माहिती मागविली होती. सदर मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी टपालाने पाठविली होती. परंतु सदर माहिती टपाल खात्याकडून परत आली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य ती माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी दि. २९/३/२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असताही अपीलार्थीनी मागितलेली माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन दि. २/९/२००६ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकून घेण्यांत आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी केली. अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती आता देण्यात आली असल्याने सदर प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक २६/१२/२००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. २००८/१५२१४/अपील क्रमांक २४२२/०२

श्री. भरत नामदेव निगडे ------- अपीलार्थी
अे/२, ८०१, आनंद सावली, काजूवाडी,
संत निरंकारी चौक, एक्सप्रेस हायवेजवळ,
लुईसवाडी, ठाणे- ४०० ६०४.

विरूद्ध

१. सह सचिव (म-१) ------ उत्तरवादी
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (म-१)
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

*-विवेचन-*

अपीलार्थी श्री. भरत नामदेव निगडे यांनी दि. १३/२/२००७ रोजी आयोगाकडे खालील मुद्दयावर द्वितीय अपील केले आहे.

१. बँकानी फ्रँकींग करुन दिलेल्या रक्कमेवर बँका १ % कमिशन व प्रती दस्त रु १०/- प्रमाणे सेवाशुल्क जनतेच्या खिशातून सक्तीने वसूल करण्यास शासनाने बॅकांना परवानगी देवून शासनाने स्वतः व जनतेची फसवणूक केली आहे.

२. बैंकानी स्वतःच्या व्यवसायासाठी लागणा-या कर्ज प्रकरणावर व फॉर्मवर ज्या रकमेचे फ्रँकिंग करुन घेतले आहे त्या रकमेवरही बँकानी शासनाकडून १ % कमिशन स्माने घेवून शासनाची फसवणूक केली आहे.

सदर अपीलाची सुनावणी दि. १५/७/२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित केली होती. त्यावेळी अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी दि. २५/४/२००६ च्या अर्जान्वये राज्याच्या कोषागारात अब्जावधी रुपयांचे स्पेशल ॲडेसिव्ह स्टॅम्प शिल्लक असताना त्यांची विक्री दि. १/७/२००७ पासून बंद केल्याची पुराव्यासहीत माहिती उपलब्ध करणे इत्यादी १४ मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८/८/२००६ च्या पत्रान्वये अपीलार्थीना १४ मुद्दयांवरील त्यांचे उत्तर कळविले.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अपीलार्थीनी कांही मुद्दयांवर दि. २८/८/२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलावरील मुद्दयावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून अपील फेटाळताना असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती कायद्याच्या मर्यादेत अपीलार्थींना उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते.

अपीलार्थींना पुरविलेल्या माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या दोन मुद्दयांवर अपीलार्थीनी दि. १३/२/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. द्वितीय अपीलाच्या दि. १५ जुलै, २००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षकारांच्या बाजू ऐकून घेण्यांत आल्या. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सखोल तपासणी केली. त्यावरुन असे दिसून येते की, बँका, पोस्ट ऑफिसेस व तत्सम वित्तीय संस्था की ज्यावर शासन/रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच नियंत्रण आहे अशा संस्थांना मुद्रांक विक्रेते म्हणून त्यांचे मार्फत मुद्रांकाचे वितरण करण्याचा दि. २६मार्च २००४ रोजी शासन निर्णय प्रसिध्द केला त्यांत अशा निर्णयामागची कारणमिमांसा दिलेली आहे. माहितीच्या अधिकारामध्ये जशी माहिती लिखित स्वरुपात असेल तशी ती दिल्या जाते.

तसेच आयोगाकडे अपीलार्थीनी मांडलेले दोन्ही मुद्दे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये विहीत केलेल्या " माहिती " व "अभिलेख " या व्याख्येत बसणारे नाहीत. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक २६/१२/२००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. २००८/१२८७४/अपील क्रमांक-२४७० /०२

श्री. जयप्रकाश एल मिश्रा ------- अपीलार्थी
३, कुलकर्णी चाळ, गणेश मंदिर रोड,
मंडा टिटवाळा, जि. ठाणे - ४२१ ६०५.

विरूद्ध

१. अपिलीय अधिकारी ------ उत्तरवादी
शालेय शिक्षण विभाग, माशि/१,
मंत्रालय, मुंबई -
२. जनमाहिती अधिकारी
शालेय शिक्षण विभाग, माशि/१,
मंत्रालय, मुंबई -

*-विवेचन-*

अपीलार्थी डॉ. जयप्रकाश मिश्रा यांना त्यांच्या दि. १३/९/२००६ च्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाही असे नमूद करुन आयोगाकडे दि. ७/।२/२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. द्वितीय अपीलाची सुनावणी दि. २२/७/२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थी यांनी दि. ३१/७/२००६ च्या अर्जान्वये खालील स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली होती.

१. अपीलार्थीच्या दि. २९/६/२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने परिच्छेदनिहाय अभिप्राय द्यावेत.

२. शिक्षण उपसंचालकाच्या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्या आदेशाचे पालन का केले नाही तसेच श्री. एल.आर. उपाध्याय यांना सेवेतून कमी का केले नाही १

३. बनावट कागदपत्रे पुरविल्याबद्दल सहायक संचालक, शिक्षण श्री. व्ही.के. वानखेडे यांच्याविरुध्द काय कारवाई केली

४. या नियुक्तीबाबत शिक्षण उपसंचालकांच्या चौकशी अहवालाची प्रत.

जन माहिती अधिकारी यांनी वरील मुद्दयांच्या अनुषंगाने ३० दिवसात माहिती न दिल्याने दि. १३/९/२००६ रोजी प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपीलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२/९/२००६ च्या पत्रान्वये अपीलार्थींना माहिती पाठविण्यासाठी रु. ३०/- एवढे शुल्क अदा करण्याचे कळविले होते. तथापि त्याच पत्रात पुढे असेहि कळविले आहे की, अपीलार्थींनी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) च्या व्याख्येत येत नाही. त्यामुळे माहिती देता येत नाही. शिवाय सदर बाब शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या कार्यकक्षेतील असल्याने त्यांच्याकडे विहित पध्दतीने संपर्क साधण्याचे कळविले आहे.

मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थींनी दि. ७/१२/२००६ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्याची बाजू समजून घेण्यांत आली. परंतु अपीलार्थी उपस्थित न राहिल्याने त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अपीलार्थीचा अर्ज शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांचेकडे पाठविण्यात आला आहे. पण कागदपत्रावरुन असे दिसून येते की, याआधीच अपीलार्थींनी त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिका-यांकडून कांही माहिती प्राप्त करुन घेतली आहे. पण त्यांचे समाधान झाले नाही. अशा परिस्थितीत त्यांनी संबंधित नस्त्ीचे अवलोकन करुन त्यांनी कागदपत्रांची निवड करावी व त्यांना त्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात.

एखादया कर्मचा-याविरुध्द केलेल्या किंवा न केलेल्या कारवाईबद्दल अपीलार्थी समाधानी नसतील तर त्यांनी प्रशासकीय रितीने या मागणीचा पाठपुरावा करावा. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार नस्ती बरहुकूम माहिती मिळू शकते.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना विहित कालावधीत माहिती पाठविली नाही याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. यापुढे अधिनियमातील तरतुदीना आधीन राहून अर्जदारास विहित कालावधीत

योग्य ते उत्तर दिले जाईल याची काळजी घेण्याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक २६/१२/२००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. २००८/५६१२/अपील क्रमांक-१९१९ /०२

श्री. भगवान दत्तात्रय चंदे ------- अपीलार्थी
पाटील बिल्डींग, मु.पो. वासिंद ,
ता. शहापूर, जि.ठाणे.

विरूध्द

१. अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ------ उत्तरवादी
पंचायत समिती जव्हार, जि. ठाणे.
२. जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता
पाटबंधारे विभाग, पंचायत समिती जव्हार,
जि. ठाणे.

*-विवेचन-*

मी अपील क्र. २००७/१९१९/०२ मध्ये दि. ३/३/२००८ रोजी पारित केलेल्या आदेशात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, पाटबंधारे विभाग, पंचायत समिती जव्हार यांनी माहिती देण्यास विलंब केल्यामुळे अधिनियमाचे कलम २० अन्वये प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे शास्ती का लादण्यात येवू नये याबाबत त्यांचे स्पष्टीकरण १० दिवसांचे आत आयोगास सादर करण्याबाबत निदेश दिले होते. वरील आदेश विचारात घेवून उप अभियंता (वर्ग -१), जिल्हा परिषद पाटबंधारे उपविभाग, जव्हार पंचायत समिती कार्यालय, जव्हार यांनी श्री. के.एम. इल्हे, शाखा अभियंता तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी, पाटबंधारे पंचायत समिती जव्हार, जि.ठाणे यांचा खुलासा व अपिलार्थीस पाठविलेली माहिती दि. ११/४/२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास पाठविलेली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेला खुलासा मान्य करण्यात येत असून यापुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अनुषंगाने प्राप्त होणा-या अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
दि. २९ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. २००८/२२४२३/अपील क्रमांक-२५५८ /०२

श्री. रविकिरण श्री. हळदीपूर ------- अपीलार्थी
११९ ए, १ ला मजला, शहीद भगतसिंग को.ऑप.हौ.सो.
जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व) मुंबई - ५९.

विरूद्ध

१. पोलीस उप आयुक्त (परि ९) ------ उत्तरवादी
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०
२. जनमाहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त (परि ९)
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०

*-विवेचन-*

अपीलार्थी श्री. रविकिरण श्रीपाद हळदीपूर यांना चुकीची माहिती प्राप्त झाल्याचे नमूद करुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. सदर अपील दि. ३०/४/२००७ रोजी आयोगाच्या कार्यालयात प्राप्त झाले आहे. सदर अपीलाची सुनावणी दि. ११/८/२००८ रोजी आयोगाच्या कार्यालात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी केवळ जन माहिती अधिकारी व एक पोलीस निरीक्षक हजर होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी दि. १५/२/२००७ च्या अर्जान्वये अंधेरी पोलीस स्टेशनशी संबंधित एफ.आय.आर क्र. एमईसीआर ०९/०४, दि. २१/।२/२००४ दोषोरोपपत्र आणि इतर संबंधित कागदपत्रे इ. च्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३/२/२००७ च्या पत्रान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंधेरी पोलीस स्टेशन यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपीलार्थीकडे पाठविली असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते.

जन माहिती अधिका-यांनी पाठविलेल्या माहितीने अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २९/३/२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलाची सुनावणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.

२१/४/२००७ रोजी आयोजित केली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. सदर सुनावणीच्या अनुषंगाने दि. ३०/४/२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थींनी मागणी केलेली कागदपत्रे देण्याचे आदेश पारित केले. अशा प्रकारे अपीलार्थींचे अपील मान्य केले. त्याप्रमाणे दि. १९/५/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थींनी मागणी केलेली कागदपत्रे देण्यात आली.

प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३०/४/२००७ च्या आदेशानुसार माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपीलार्थींनी दि. ३०/४/२००७ रोजीच आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. सदर अपीलाच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यात आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेली या प्रकरणातील कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंधेरी पोलीस ठाणे यांनी सादर केलेल्या दि. ९/८/२००७ च्या पत्रावरुन असे दिसते की, नमूद गुन्हयाची कागदपत्रे महानगर न्यायदंडाधिकारी न्यायालयात सादर करण्यात आली असून ती कागदपत्रे मिळविण्यासाठी शोध घेण्यात येत आहे. तेव्हा हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आत कागदपत्रांचा शोध घेवून अपीलार्थींनी मागणी केलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना उपलब्ध करुन द्यावीत व तसे आयोगाला त्वरित अवगत करावे.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
वर उल्लेखिल्याप्रमाणे संबंधितांनी कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. २९ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. २००८/२९५२२/अपील क्रमांक-३२४६ /०२

श्री. मिलन बाळकृष्ण कोयल ------- अपीलार्थी
रुम नं. २१, ११ ए, पोलीस अधिकारी वसाहत,
ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.

विरूद्ध

१. पोलीस उप महानिरीक्षक (प्रशासन) ------ उत्तरवादी
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंक मार्ग, कुलाबा, मुंबई ३९
२. जनमाहिती अधिकारी तथा सहा.पोलीस उपमहानिरीक्षक
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंक मार्ग, कुलाबा, मुंबई ३९

*-विवेचन-*

अपीलार्थी श्री. मिलन बाळकृष्ण कोयल यांनी मागितलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देण्याचे नाकारल्याने अपीलार्थीनी दि. २९/१/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

द्वितीय अपीलाची सुनावणी दि. २४/१०/२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि. ३०/११/२००७ च्या आदेशान्वये भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३११ (२) (बी) अन्वये अपीलार्थींना सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून सदर आदेशातील परिच्छे क्र. ३ मध्ये पोलीस महासंचालकांनी स्वतंत्ररित्या नमूद केलेली कारणे लेखी स्वरुपात मिळण्यासाठी दि. ११/१२/२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनंती केली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी दि. १३/१२/२००७ च्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ङ) व (ञ) नुसार अपीलार्थीनी मागितलेली माहिती देण्याचे नाकारले आहे.

अपीलार्थींना जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्याचे नाकरल्याने अपीलार्थींनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २६/१२/२००७ रोजी प्राप्त झाले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३/१/२००८ रोजी अपीलाच्या अनुषागाने सुनावणी घेतली व अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती देण्याचे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ङ) व (ञ) अन्वये नाकारले व तसे अपीलार्थीना दि. ९/१/२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ङ ) व (ञ) अन्वये नाकारल्याचे अपीलार्थींना कळविल्याने ते व्यथित होवून त्यांनी दि. २९/१/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. सदर अपीलात त्यांनी असे नमूद केले आहे की, बडतर्फीच्या आदेशाविरुध्द त्यांना अपील करावयाचे असून त्यानी मागणी केलेली माहिती मर्यादित आणि त्यांच्या वैयक्तिक कारवाई संबंधीची असून ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिल्यामुळे लोकहिताला बाधा येईल असे कोणतेही कारण नाही किंवा तसे होईल असे मानण्यास कोणताही आधार नाही.

अपीलार्थीना पोलीस महासंचालकांनी भारताचे संबंधित कलम ३११ (२) (बी) खाली सेवेतून बडतर्फ कले असल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) (ङ) व (ञ) असे नमूद करुन अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती नाकारली आहे.

सदर प्रकरणात दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेण्यांत आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली.

याबाबतीत राज्यघटनेतील तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

(१) जी व्यक्ती संघराज्याच्या नागरी सेवेची किंवा अखिल भारतीय सेवेची किंवा राज्याच्या नागरी सेवेची सदस्य असेल अथसा संघराज्य किंवा राज्य यांच्या नियंत्रणाखाली असलेले नागरी पद धारण करीत असेल अशा कोणत्याही व्यकतीला, ज्या प्राधिका-याने तिची नियुक्ती केली होती त्याहून दुय्यम असलेल्या प्राधिका-याकडून बडतर्फ केले किंवा पदावरुन दूर केले जाणार नाही.

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्या चौकशीमध्ये तिच्यावरील दोषारोपांची माहिति करुन दिलेली आहे आणि त्या दोषारोपांबाबत तिला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिलेली आहे. अशी चौकशी झाल्याखेरीज तिला बडतर्फ केले जाणार नाही किंवा पदावरुन दूर केले जाणार नाही किंवा पदावनत केले जाणार नाही.

( परंतु, अशा चौकशीअंती, तिला अशी कोणतीही शास्ती देण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल त्याबाबतीत, अशा चौकशीमध्ये सादर केलेल्या पुराव्याच्या आधारावर अशी शास्ती देता येईल आणि अशा व्यक्तीला प्रस्तावित शास्तीविरुध्द अभिवेदन करण्यासाठी कोणतीही संधी देण्याची आवश्यकता असणार नाही :

परतु आणखी असे की, हा खंड पुढील बाबतीत लागू होणार नाही ) ---

(क) एखादी व्यक्ती ज्यामुळे फौजदारी दोषारोपावरुन दोषी ठरलेली आहे अशा वर्तनाच्या कारणावरुन तिला बडतर्फ किंवा पदावरुन दूर करण्यात आले असेल किंवा पदावनत करण्यात आले असेल त्याबाबतीत : किंवा

(ख) एखादया व्यक्तीस बडतर्फ किंवा पदावरुन दूर करण्याचा किंवा तिला पदावनत करण्याचा अधिकार असलेल्या प्राधिका-याला काही कारणास्तव - ते कारण त्या प्राधिका-याला नमूद करावे लागेल- अशी चौकशी करणे वाजवीपणे व्यवहार्य नाही. असे खात्रीपूर्वक वाटेल त्याबाबतीत.

वरील तरतुदीनुसार चौकशी केल्याशिवाय कोणत्याही व्यक्तिला बडतर्फ केले जाणार नाही व अशी चौकशी करणे वाजवीपणे व्यवहार्य नाही असे वाटत असेल तर ती कारणे त्या प्राधिका-याला नमूद करावी लागतात. सदरील केसमध्ये वरील कारणे ही वेगळयाने नमूद करण्यात आलेली आहेत. पण ती अपीलार्थीस देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे वरील केसमध्ये चौकशीविना बडतर्फीची सजा मिळणे व चौकशी का होवू शकली नाही याची कारणेहि कळू शकत नाहीत अशी परिस्थिती उद्‌भवते.

नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार कमीत कमी ही कारणे अपीलार्थीस कळणे हे आवश्यक आहे. कारण त्यामुळे अपीलार्थीस योग्य त्या प्राधिका-याकडे आपली केस मांडता येईल. यामध्ये एखादयाची

बडतर्फी हा जनहिताचा मुद्दा निश्चितपणे असू शकतो. त्यामुळेच सदरील माहिती ही अपीलार्थीस देण्यात यावी असे आयोग ठरवित आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांत देण्यांत यावी.

(डॉ. सुरेश वि. जोशी )

दि. २९ डिसेंबर, २००८

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

मुमाआ-क्र. २००८/२४४२८/तक्रार क्रमांक- ५०५/०२

श्री. बी. के. देशमुख ------- तक्रारदार
उपाध्यक्ष, राष्ट्रीय एस.टी. कामगार काँग्रेस,
ससून डेव्हीड मार्ग, २७,भरूचा मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

विरूद्ध

१. व्यवस्थापकीय संचालक ------ उत्तरवादी
महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन लि.
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. ए.बी. नायर रोड,
मुंबई - ४०० ००८.

२. जनमाहिती अधिकारी
व्यवस्थापकीय संचालक
स्टेट ट्रान्सपोर्ट को ऑप. बँक. लि.
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. ए.बी.नायर रोड,
मुंबई - ४०० ००८.

-विवेचन-

तक्रारदार श्री. बलभीमराव किसनराव देशमुख यांनी त्यांच्या दि. १२/६/२००७ च्या अर्जान्वये मुख्य व्यवस्थापक, स्टेट ट्रान्सपोर्ट को.ऑप. बँक.लि. यांच्याकडून राज्यात बँकेने विविध पदांवर भरती केलेल्या प्रक्रियेची सविस्तर माहिती मागविली होती. त्या अनुषंगाने बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकानी त्यांच्या दि. १५/६/२००७ च्या पत्रान्वये सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या दि. ८/२/२००६ च्या आदेशान्वये सहकारी पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकाना शासनाकडून कोणतेही वित्त सहाय्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने देण्यात येत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने तक्रारदारांनी मागणी केलेली माहिती देण्याचे नाकारल्याने तक्रारदारांनी दि. २८/६/२००७ रोजी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदर तक्रारीची सुनावणी दि. ८/७/२००८ रोजी आयोजित करण्यात

आली होती. त्यावेळी सदर बँकेचे व्यवस्थापकीय संचालक उपस्थित होते. तक्रारदार सुनावणीच्या वेळी उपस्थित नव्हते.

सुनावणीच्या वेळी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकांची बाजू ऐकून घेण्यात आली. तसेच सदर प्रकरणातील आयोगाकडे उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदार सुनावणीच्या वेळी उपस्थित नसल्याने त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तेव्हा वर उल्लेख केलेल्या सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांच्या दि. ८/२/२००६ च्या आदेशातील तरतुद लक्षात घेता तसेच राज्य शासन व रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे मत लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ सदर नागरी सहकारी बँकेला लागू होत नाही असे म्हणणे ही argument ची एक बाजू झाली. मात्र सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ ( कलम २ (ज) (घ) नुसार ) (घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटीत करण्यात आलेले कोणतेहि प्राधिकरण किंवा निकाय स्वराज्य संस्था असा आहे व त्यामध्ये एक समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला --- निकाय यांचा समावेश होतो.

स्टेट ट्रान्सपोर्ट को.ऑप. बँकेचे Bye Laws चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळ (राज्य शासनाचा अंगीकृत व्यवसाय) सह व्यवस्थापकीय संचालक व वित्तीय सल्लागार तथा मुख्य लेखा अधिकारी हे बँक अनुक्रमे पदसिध्द सभापती व उपसभापती आहत. जर सह व्यवस्थापकीय संचालक हे I.A.S. ऑफिसर नसले किंवा त्यांची जागा रिक्त असली तर MSRTC चे उपाध्यक्ष हे पदसिध्द सभापती असतील अशी तरतूद आहे. तसेच बँकेचे सभापती यांचे अधिकार व कर्तव्ये यामध्ये बँकेच्या सर्वसाधारण कामकाजाचे सुपरव्हिजन करावे असे नमूद केले आहे. याचाच अर्थ राज्यशासन/ MSRTC (शासनाचा अंगिकृत व्यवसाय) हे या दोन अधिका-यांच्या मार्फत बँकेवर निर्णायक अंकुश (Control) ठेवू शकते. त्यामुळे सदरील बँक हे सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्यामुळे या बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम लागू आहे असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

तक्रारदारास अधिनियमाच्या तरतुदीनुसार माहिती १५ दिवसाचे आत देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. २९ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. २००८/२३८०७/तक्रार क्रमांक-५३९/०२

श्री. एस.एम. पुजारी ------- तक्रारदार
बी-७०४/७०५, कॉसमॉस रेसिडन्सी,
जी.बी. रोड, ठाणे (पश्चिम) मुंबई - ४०० ६०७.

विरूद्ध

जनमाहिती अधिकारी तथा सचिव ------ उत्तरवादी
हिंदी विद्या प्रचार समिती, घाटकोपर,
मुंबई - ४०० ०८६.

*-विवेचन-*

श्री.एस.एम.पुजारी, ठाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीवर दि. ३०/९/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला तक्रारदार व उत्तरवादी उपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे तपासल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

श्री. पुजारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्या दि. २०/४/२००७ च्या माहिती अर्जान्वये सचिव, हिंदी विद्या प्रचार समिती यांच्याकडे काही माहिती मागितली होती. सदर अर्जाच्या अनुषंगाने संस्थेने त्यांची संस्था ही रजिस्टर्ड ट्रस्ट असून ती अधिनियमाच्या कलम २ मध्ये दिलेल्या व्याख्येप्रमाणे "सार्वजनिक प्राधिकरण " ठरत नाही अशा आशयाचे पत्र पाठवून माहिती नाकारली.

यासंदर्भात तक्रारदारानी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीचा आशय खालीलप्रमाणे ---

संस्थेच्या अनेक शैक्षणिक संस्था (शाळा कॉलेजेस) आहेत. या सर्व शाळा कॉलेजेसना राज्य शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका व युनिव्हर्सिटी ग्रँटस कमिशन यांच्याकडून नियमित अर्थसहाय्य मिळते. त्यामुळे हिंदी विद्या प्रचार समिती हे सार्वजनिक प्राधिकरण आहे. तक्रारदारानी त्यांच्या म्हणण्याच्या

पृष्टयर्थ संस्थेच्या शाळा कॉलेजेस च्या बॅलन्सशीट (ताळेबंद) च्या प्रती सादर केल्या आहेत. सदर संस्थेला "सार्वजनिक प्राधिकरण " म्हणून घेषित करावे अशी तक्रादारांनी मागणी केली आहे.

संस्थेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या कायद्यानुसार शासनाकडून दिले जाणारे अनुदान हे संस्थेला मिळत नसून ते संस्थेद्वारे संचलित शाळा कॉलेजेसना मिळते. संस्थेला अनुदान मिळत नाही. त्यामुळे संस्था अधिनियमांतर्गत "सार्वजनिक प्राधिकरण " ठरत नाही. संस्थेने त्यांच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ राज्यसरकार, युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन यांच्याकडून संस्थेद्वारे संचालित रामनिरंजन झुनझुनवाला डिग्री व ज्युनियर कॉलेज, हिंदी हायस्कूल, घाटकोपर यांना देण्यांत आलेल्या अनुदानाची/ अर्थसहाय्याची कागदपत्रे सादर केली आहेत. त्यावरुन अर्थसहाय्य ट्रस्टला/संस्थेला मिळत नसून संस्थेद्वारे संचलित शाळा/कॉलेजेसना मिळते यास पुष्टी मिळते.

सबब सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

मात्र तक्रादारांस संस्थेच्या अनुदानित शाळा/कॉलेजेसमधून माहिती पाहिजे असेल तर ती त्यांना त्या त्या शाळा कॉलेजच्या जन माहिती अधिका-यांनी द्यावी.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. ३० डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील

रामुआ-क्र. २००८/३६५६८/तक्रार क्रमांक-१९८/०१

श्री. चेतन कोठारी (पत्रकार) --- तक्रारदार
५२, ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबाली पटेल लेन, बी.देसाई रोड,
मुंबई - ४०० ०२६.

विरूद्ध

जनमाहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या १) -- उत्तरवादी
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
मुंबई.

*-विवेचन-*

श्रीयुत चेतन कोठारी यांनी आयोगाकडे दि. ६/१२/२००८ रोजी अशी तक्रार केली की, आयोगाने दि. २१ ऑक्टोबर, २००८ रोजी अपील क्र. ३१६१/०२ मध्ये जे आदेश दिले होते त्याची अंमलबजावणी अजून झालेली नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिका-यांनी अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्यांच्यावर शास्ती का लावू नये याचा खुलासा करण्यासाठी दि. ३० डिसेंबर, २००८ रोजी संबंधित जन माहिती अधिका-यांना आयोगाच्या कार्यालयात बोलाविले होते. त्यावेळेला तक्रारदार श्रीयुत चेतन कोठारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे विस्तृत निवेदन सादर केले आहे. त्यानुसार सदरील आदेश पोलीस आयुक्त कार्यालयात दि. २/११/२००८ रोजी व जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. ११/११/२००८ रोजी प्राप्त झाले.

वरील विस्तृत निवेदनावरुन दरम्यानच्या कालावधीत जन माहिती अधिका-यांची व्यस्तता व माहिती गोळा करण्यास लागलेला कालावधी लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. तक्रारदारांस ही माहिती दि. ४/१२/२००८ रोजी पाठविण्यांत आलेली आहे.

तक्रारदारांनी सुनावणीच्या वेळेला असे सांगितले की, त्यांना मिळालेली माहिती व त्यांना याआधी मागील वर्षाची माहिती यात तफावत आहे. ही तफावत कोणत्या परिस्थितीत होती उदा. पंतप्रधान, राष्ट्रपती वगैरे सारख्या व्यक्ती आल्या असता थोडया कालावधीत जास्त पोलीस फोर्स ठेवावा लागतो वगैरे वगैरे व ती आकडेवारी आता दिलेल्या माहितीत हे सम्मीलीत नाही पण मागील वर्षाच्या माहिती संमिल्लीत होती हे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी दिले.

अपीलार्थीस माहिती देण्यात परिस्थितीजन्य दिरंगाई झाली व त्यामागे टाळाटाळ किंवा मुद्दामहून दिरंगाई करण्याचा जन माहिती अधिका-यांचा मानस नव्हता असे आयोगास दिसून आल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*--आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. ३० डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपिल.

क्रमांक-२००८/रा.मा.आ./सीआर-२२६

श्री. सागर चंद्रकांत पवार, -- अपिलार्थी
मु.पो.वडाळा महादेव,
ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

विरुध्द

१ अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,
अहमदनगर.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, -- उत्तरवादी
दि. मुळा प्रवरा इले.को.ऑप,
श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

*-विवेचन-*

अपिलार्थी श्री. सागर चंद्रकांत पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०९.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, दि. मुळा प्रवरा इले.को.ऑप, श्रीरामपूर, जि. अहमदनगर यांच्याकडे दि. १७.०३.२००७ रोजी अर्ज करून दि. मुळा प्रवरा इले.को.ऑप. सोसायटी लि. श्रीरामपूर या संस्थेच्या आस्थापने वरील कर्मचा-यांची आस्थापना विषयाशी संबंधित एकूण १३ मुद्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितलेली होती. अपिलार्थीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक दि.मुळा प्रवरा इले.को.ऑप. सोसायटी लि. श्रीरामपूर यांनी दि.२४.०५.२००७ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. असे आमचे मत आहे त्यामुळे माहिती देता येत नाही. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे दि. २९.०५.२००७ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.०९.०८.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. त्यांनी खालीलप्रमाणे दि.३१.०८.२००७ रोजी आदेश पारित केले.

"जन माहीती अधिकारी यांनी अपीलार्थींना त्यांच्या दि.१७.०३.२००७ रोजीच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अतंर्गत नियमानुसार या आदेशाच्या दिनांकापासून दोन अठवडयात माहिती देण्याची कार्यवाही करावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशाचे पालन केले नाही म्हणून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. सदर अपिलावर दि. २३/९/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. मुळा प्रवरा इले.को.ऑप. सोसायटी लि. श्रीरामपूर या संस्थेच्या आस्थापने वरील कर्मचा-यांची आस्थापना विषयाशी संबंधित एकूण १३ मुद्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही असे कारण देउन माहिती नाकारली. अपिलार्थीने मागणी केलेली माहीती उपलब्ध करून द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ३१/८/२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाचेही पालन अद्याप झालेले नाही. मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑपरेटिव्ह सोसायटी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये हया सोसायटीने माहिती देण्यास भाग पाडणा-या आदेशावर रिट पीटीशन ५३८२/२००७ मध्ये मा. हायकोर्टाच्या औरंगाबाद बेंचकडून स्थगनादेश मिळविला आहे (दि. २१.८.२००७ चे आदेश). तसेच दुस-या एका आदेशात को-ऑपरेटीव्ह सोसायटींना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे किंवा कसे? या संदर्भात सर्व पीटीशन्स एकत्रीत करून निर्णयासाठी ठेवण्याचे निर्देशही दिले आहेत (Petition १८७/२००८). त्यामुळे सदरील केसमध्ये पुढील आदेश देण्यात येत आहेत.

-----*आदेश*------

मा. हायकोर्टाचे पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मुंबई
दिनांक ३०.१२.२००८

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२९९१४/अपील क्रमांक-३२६४/०२

श्री. रमाकांत वि. शिर्सेकर --अपीलार्थी
डवरीनगर गेट नं. २, गणेश चाळ,
अलीयावर जंग मार्ग, सांताक्रुज (पूर्व)
मूंबई - ४०० ०५५.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (परि ९) --उत्तरवादी.
पश्चिम नियंत्रण कक्ष यांचे कार्यालय,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ५०
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष यांचे कार्यालय,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ५०

*--विवेचन---*

श्रीयुत रमाकांत वि. शिर्सेकर यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या दि. २३/२/२००८ रोजीच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ३१/१०/२००८ रोजी घेण्यांत आली होती. त्यावेळेला अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींस त्यांच्या दि. ३१/७/२००८ रोजीच्या पत्रानुसार अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार त्यांनी दि. १९ जून २००५ रोजी नळाचे पाणी वापरण्यास मनाई करणे, पैशाची मागणी करणे तसेच ठार मारण्याची धमकी दिली होती ती तक्रार नोंदवून न घेण्याच्या कारणांची माहिती पाहिजे होती.

त्यास दि. ३०/११/२००७ रोजी उत्तर देताना वाकोला पोलीस स्टेशनचा अहवाल देण्यांत आला. त्यानुसार पुढीलप्रमाणे निवेदन करण्यांत आले.

" अपीलार्थी यांनी अर्जासोबत जोडलेल्या तक्रार अर्जातील बाब ही दिवाणी स्वरुपाची आहे. त्यामध्ये नळाच्या पाण्यावरुन झालेल्या किरकोळ भांडणाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याचे तक्रारी बाबत

दि. १५/४/२००७ रोजी अदखलपात्र गुन्हा नोंद क्रमांक १७०७/०७ अन्वये नोंद घेण्यात आलेली असून तक्रारदार व विरोधक यांना योग्य ती समज देवून आवश्यक वाटल्यास उभयपक्षकारानी न्यायालयात दाद मागावी असे कळविण्यात आले आहे.

कायद्याच्या कक्षेतील व तक्रारदारांच्या तक्रारीतील गांभीर्यानुसार पोलीसांनी योग्य ती दखल घेवून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद केलेला आहे. त्यामुळे अपीलार्थींची तक्रार नोंदवून घेतली नाही असे अपीलार्थींचे म्हणणे समर्थनीय वाटत नाही. त्यांना विरोधकाकडून धोका वाटत असल्यास त्यांनी पोलीस ठाण्यास तशी तक्रार दिल्यास योग्य ती दखल घेण्यात येईल. "

त्यामुळे अपीलार्थीस रेकॉर्ड प्रमाणे असणारी माहिती देण्याबाबत कुचराई झालेली दिसून येत नाही. सबब पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. ३१ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२९८९७/अपील क्रमांक-३२६८/०२

श्री. मंगेश माने --अपीलार्थी
बी.डी.डी. चाळ नं.९, रुम नं. ५५,
वरळी, मुंबई - १८

विरुध्द

१. सह सचिव --उत्तरवादी.
मुख्य सचिव यांचे कार्यालय, ५ वा मजला,
मंत्रालय, मुंबई - ३२
२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
मुख्य सचिव यांचे कार्यालय, ५ वा मजला,
मंत्रालय, मुंबई - ३२

*--विवेचन---*

श्री. मंगेश माने,वरळी, मुंबई यांनी सह सचिव तथा प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ३१/१/२००८ रोजी दिलेल्या आदेशा विरुध्द आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

सदर अपीलाची सुनावणी दि. ३१/१०/२००८ रोजी आयोजित केली होती. त्या सुनावणीस अपीलार्थी उपस्थित होते. मा. मुख्य सचिव कार्यालयाने दि. २३/१०/२००८ रोजी पाठविलेले निवेदन विचारात घेण्यात आले असून अपीलार्थीनी मागितलेली माहिती सामान्य प्रशासन विभागातील वेगवेगळया कार्यासनाशी संबंधित आहे. वास्तविक पाहता अपीलार्थीनी ती माहिती सामान्य प्रशासन विभागाकडून मागणे अपेक्षित होते. तसे न करता त्यांनी सदर माहितीची मागणी मुख्य सचिव कार्यालयाकडे केलेली आहे.

श्री. मंगेश माने यांनी मागणी केलेल्या माहितीचा अर्ज व प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी निर्ममित केलेले आदेश स्पयंस्पष्ट असून त्योमध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>*---आदेश---*</u>

अपील फेटाळण्यात येत आहे.

अपीलार्थी यांनी त्यांचे अर्ज, अपील अत्यंत क्लिष्ट भाषेत न करता साध्या सरळ भाषेत करावेत अशीहि सूचना त्यांना करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. ३१ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ./२७२८९/अपील क्रमांक-३०२२/०२

श्री. नरवंदा प्रसाद मिश्रा --अपीलार्थी
राजीव गांधी मेमोरियल हायस्कूल,
परेरावाडी, साकीनाका, मुंबई ७२

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (परि ९) --उत्तरवादी.
पश्चिम नियंत्रण कक्ष ,बांद्रा (पश्चिम)
मुंबई ५०
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष ,बांद्रा (पश्चिम)
मुंबई ५०

*--विवेचन---*

जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक ३०२२/०२ मध्ये अपीलार्थीस चुकीची माहिती दिल्याबद्दल दि. ३/१२/२००८ रोजीच्या आदेशाने त्यांचेवर शास्ती का लादण्यात येवू नये याचा खुलासा जन माहिती अधिका-यांनी करावा असे निर्देश देण्यांत आले होते. त्यानुसार दि. ३१/१२/२००८ रोजी जन माहिती अधिकारी उपस्थित राहून त्यांचा खुलासा सादर केला. त्यांच्या म्हणण्यानुसार रेकॉर्डला साकीनाका पोलीस स्टेशनने गु.र.क्र. २८८/०६ , कलम ३४२ भादंवि या गुन्हयास "ब" वर्गीकृत समरी मंजूरी मिळणेबाबत टिप्पणी आयोगास सादर केली आहे ती पुढीलप्रमाणे --

" विषयांकित गुन्हयाचे तपासी अधिकारी व पोलीस निरीक्षक (प्रशासन, असा अहवाल सविनय सादर करतात की, साकीनाका पोलीस ठाणेस नोंद गुरक्र.२८८/०६ कलम ३४२ भादविसं यातील फिर्यादी नामे प्रकाश मोतीश झाळके , यांनी दिलेल्या फिर्यादीस अनुसरुन विरोधक नामे नर्मदाप्रसाद सिताराम मिश्रा यांचे विरुध्द दि. १७/७/२००६ रोजी कलम ३४२ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयांचे कागदपत्र "ब " समरी वर्गीकरण मंजूरीकामी न्यायालयात सादर करणेकामी वरिष्ठांचे दि. ४/८/२००६ रोजी आदेश मिळालेले असून सदरच्या आदेशानुसार मा.महानगर दंडाधिकारी , २२ वे न्यायालय, अंधेरी मुंबई येथे सदरचा गुन्हा " ब " समरी वर्गीकरण मंजूरीकामी दि. १९/८/२००६ रोजी सादर करण्यात आलेला होता. परंतु पोलीस अभियोक्ता, श्री. श्रीकंत बोरसे यांनी सदर कागदपत्राचे अवलोकन करुन नमूद गुन्हयातील आरोपीतांचे फिर्यादीवरुन त्याच घटनेसंदर्भात साकीनाका पोलीस ठाणेस गुरक्र. २८७/०६, कलम १४३, ४५१, ५०४,५०६ भादविसं अन्वये प्रकाश झाळके व इतर चार आरोपीतांविरुध्द (गुरक्र.२८८/०६ मधील फिर्यादी ) गुन्हा दाखल असल्याचे नमूद दोनही परस्पर विरुध्द गुन्हयांचा विचार करता मा.न्यायालयाकडून गुरक्र.२८८/०६ चे गुन्हयास "ब" समरी वर्गीकरण मंजूरी मिळणे अशक्य असल्याचा तोंडी अभिप्राय त्यांनी दिलेला आहे.

गुरक्र.२८७/०६, कलम १४३, ४५१, ५०४,५०६ भादविसं गुरक्र.२८८/०६, कलम ३४२ भादवि हे एकाच घटनेशी संबंधित व परस्पर विरोधी फिर्यादीवरुन नोंदविण्यात आलेले गुन्हे असल्याने नमूद दोनही गुन्हयापैकी कोणत्याही एका गुन्हयास मा.न्यायालयाकडून "ब" समरी वर्गीकरण मंजूरी मिळणे अशक्य असल्याने दोनही गुन्हयांचे दोषारोपपत्र न्यायालयास सादर करणेबाबत पोलीस अभियोक्ता, २२ वे न्यायालय, अंधेरी यांनी स्पष्ट तोंडी अभिप्राय कळविलेला आहे.

गुरक्र. २८८/०६ कलम १४३, ४५१, ५०४,५०६ भादवि या गुन्हयांचे दोषारोपपत्र मा.महानगर दंडाधिकारी ,२२ वे न्यायालयात सादर करण्यात आलेले असून गुरक्र.२८७/०६, कलम ३४२ भादंवि या गुन्हयाचे "ब" समरी वर्गीकरणाचे प्रस्तावास मंजूरी देण्यासंदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपासंदर्भात वरिष्ठांचे पुढील योग्य ते आदेश मिळणेस विनंती करणेत येत आहे. "

तसेच पुढील प्रमाणे खुलासाहि सादर केलेला आहे.

"

| अ क्रं | मा.मुख्य माहिती आयुक्तांचा निर्णय आदेश | खुलासा |
|---|---|---|
| ०१. | अपिलार्थी नर्वदा प्रसाद मिश्रा यांच्या विरूध्दच्या गुरक्रं २८८/०६, कलम ३४२ भादवि या गुन्हांसंदर्भात सहाय्यक सरकारी अभियोक्त श्री.बोरसे, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांनी कोणताही तोंडी अभिप्राय पोलीस स्टेशनला दिलेला नसताना, तसेच गुन्हा 'ब' | अपिलार्थी श्री.नर्वदा प्रसाद मिश्रा यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत यापूर्वी अर्ज सादर करून त्यांचे विरूध्दच्या गुरक्रं.२८८/०६. कलम ३४२ भादवि. या गुन्हांच्या तपास कामी केलेल्या कार्यवाहीची इत्यंभूत माहिती मागणी केलेली |

| | | |
|---|---|---|
| | समरी वर्गीकृत केलेला नसताना त्याचे दोषारोपपत्र सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री.बोरसे यांचे तोंडी अभिप्रायावरून मा.न्यायालयात दाखल करण्यात आलेले असल्याची चुकीची माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली.<br>चुकीची माहिती दिल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी त्यांच्यावर अधिनियमातील तरतूदीनुसार शास्ती का लादण्यात येउ नये ? याबाबत आदेशप्राप्ती दिनांकापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे खुलासा सादर करणेबाबत व दिनांक ३१ डिसेंबर २००८ रोजी संबंधित अधिकारी व्यक्तीशः सकाळी ११.०० वाजता आयोगासमोर उपस्थित राहातील, तसेच अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती अद्याप दिली नसेल ती ५ दिवसाचे आत त्यांना देण्यात यावी व अहवाल आयोगास पाठवावा. असे आदेशीत करण्यात आले आहे. | होती. त्यांचे मागणीनुसार नमूद गुन्हांचे तपासकामी केलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल जाक्रं.६५८२/वपोनि/साकीनाका/०७, दि.०१.०९.२००७ अन्वये मा.माहिती अधिकारी, पश्चिम प्रादेशिक विभाग यांचे कार्यालयामार्फतीने अपिलार्थी यांना देण्यात आलेला आहे. गुन्हाचे दोषारोपपत्र कोर्ट केस क्रं.६६८/पीएस/०७, दि.०३.१०.२००७ रोजी मा.महानगर दंडाधिकारी, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांचे न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच गुन्हा तपासासंदर्भातील अपिलार्थी यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रे (गुन्हाचा प्रथम खबरी अहवाल, साक्षीदारांचे जाब-जवाब, तपासी अधिकारी यांनी विरष्ठांना सादर केलेले टिपण्णी प्रस्तावाच्या छायांकित प्रती) ही देखील त्यांना जाक्रं.१०७४८/वपोनि/साकीनाका/०७,दि.२१.१२.०७ अन्वये मा.माहिती अधिकारी यांचे कार्यालयामार्फतीने यापूर्वीच देण्यात आलेली आहेत.<br>मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे दि.०३.१२.२००८ रोजीचे सुनावणी निर्णय आदेशास अनुसरून अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२७.१२.२००८ रोजीचे आपले विनंती अर्जाव्दारे गुरक्रं.२२८/०६ मध्ये तपासी अधिकारी यांनी दि.२७.१२.२००६ ते दि.१४.०७.२००७ या कालावधीमध्ये केलेल्या तपास अहवालाच्या कागदपत्रांची मागणी केलेली आहे. मात्र नमूद कालावधीमध्ये केलेल्या तपास अहवालाच्या कागदपत्रांची मागणी केलेली आहे. मात्र नमूद कालावधीमध्ये गुन्हांची मूळ कागदपत्रे ही, आरोपीताविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणेकामी मा.वरिष्ठांचे परवानगी मंजूरीकरीता टिपण्णी प्रस्तावासोबत पाठविलेली असल्याने, तात्कालीन तपासी अधिकारी यांनी सादर कालावधीमध्ये गुन्हाचा कोणताही तपास केलेला नाही.<br>सबब अपिलार्थी मागणी करीत असलेल्या त्याच कालावधीतील तपासाची कोणतीही कागदपत्रे त्यांना देणे शक्य नाही. त्याबाबत जा.क्र.१४८७६/०८, दि.२९.१२.२००८ अन्वये अपिलार्थी यांना लेखी पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे. त्यांची प्रत माहितीस्तव सोबत जोडीत आहे.<br>तसेच कोणत्याही गुन्हास अ,ब,क अथवा ॲबीटेड (मयत) समरी मंजूर करण्याचे अधिकार हे |

| | | |
|---|---|---|
| | | मा.न्यायालयाचे असून, अपिलार्थी यांना यापूर्वी पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांचे विरूध्दचा गुन्हा हा मा.न्यायालयाकडून 'ब' समरी वर्गीकरण मंजूर झालेला आहे. अशी कोणतीही चुकीची माहिती त्यांना कधीही देण्यात आलेली नाही. तसेच मा.सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री.बोरसे, यांनी दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करणेकामी, मा.वरिष्ठांची परवानगी मिळणेकरीता तात्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक दावणे (सद्या सेवानिवृत्त) यांनी दि.२६.१२.२००६ रोजी तसा टिपण्णी प्रस्ताव मा.विरष्ठांना सादर केलेला होता. गुन्हे कागदपत्रातील टिपण्णी प्रास्तावातील परिच्छेद क्रं.१८, १९ व २० मधील त्याच नोंदीच्या आधारे अपिलार्थी यांना तशी माहिती या पोलीस ठाणेकडून पुरविण्यात आलेली आहे. टिपण्णी प्रस्तावातील संबंधित मुद्दाची नोंद असलेल्या पृष्ठांची छायांकीत प्रत आवलोकनार्थ सोबत जोडण्यात येत आहे.<br>गुरक्रं.२८८/०६ चे तपासासंदर्भात तात्कालीन तपासी अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची कोणतीही चुकीची वा खोटी माहिती अपिलार्थी अर्जदार यांना माहिती अधिकारी अधिनियम, २००५ अंतर्गत पुरविण्यात आलेली नाही. |

वरील खुलासा मान्य करण्यात येत आहे व त्यांच्यावर शास्ती दालण्याचे कारण नाही असे आयोग ठरवित आहे. मात्र संबंधित पोलीस उप आयुक्त (परि-९) यांनी सदरील केसमध्ये झालेली कारवाई ही योग्य आहे याची खात्री करून घ्यावी.

***---आदेश---***

प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )

दि. ३१ डिसेंबर, २००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ./११७१८/तक्रार क्रमांक-२०६/०२

श्री.अशोक हिरजी छेडा ----तक्रारदार
अशोक स्टोअर्स, शॉप नं. १०(o.s.)
बी.आर. गावडे म्युनिसिपल मार्केट,
वरळी नाका, मुंबई -- ११

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक (अभि.सेवा व प्र.) --उत्तरवादी.
महानगरपालिका मुख्य कार्यालय, विस्तार बिल्डींग,
३ रा माळा, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - १

२. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता (प्लॅनिंग व डिझाईन)
महानगरपालिका मुख्य कार्यालय, विस्तार बिल्डींग,
५ वा माळा, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - १

*--विवेचन---*

श्री. अशोक हिरजी छेडा , मुंबई यांनी दि. १५/९/२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार नगर अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहिती मागविली होती. सदर माहिती अर्ज देवून ६८ दिवस उलटले असून अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही म्हणून तक्रारदारांनी दि. २३/११/२००६ रोजी तक्रार केली आहे.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने दि. १८/८/२००७ च्या पत्रान्वये संबंधित जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मागितला होता. जन माहिती अधिकारी यांनी दि. १/९/२००७ च्या पत्रान्वये त्यांचा खुलासा आयोगास सादर केला असून खुलाशाबाबत कांही प्रतीही देण्यात आलेल्या आहेत.

नगर उप अभियंता (शहर) तथा सार्वजनिक माहिती अधिकारी यांचा खुलासा व सोबतची सहपत्रे पाहता असे दिसून येते की, श्री. अशोक हिरजी छेडा यांनी मागितलेली माहिती सहायक मनपा आयुक्त

(बाजार) २ रा मजला, महात्मा ज्योतीबा फुले मार्केट, मुंबई यांचे कार्यालयाशी संबंधित होती. श्री. छेडा यांचा माहितीचा अर्ज, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३) (ii)नुसार संबंधित कार्यालयाकडे ५ दिवसांचे आत पाठविणे आवश्यक होते. तथापि त्या कार्यपध्दतीचा अवलंब न करता त्या कार्यालयाकडून माहिती मिळवून घ्यावी असे दोन महिन्यानंतर कळविले आहे.

तक्रारदारांची तक्रार दि. २३/११/२००६ रोजीची आहे व प्रथम अपीलाची सुनावणी दि. २२/१२/२००६ रोजी होवून दि. २६/१२/२००६ रोजी आदेश देण्यात आले आहेत. या आदेशात अपीलार्थीस योग्य ती माहिती व मार्गदर्शन करण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी यांना मात्र अर्जातील माहिती दुस-या सार्वजनिक प्राधिकरण/ जन माहिती अधिकारी यांचेशी संबंधित असेल तर स्वतःच तो अर्ज संबंधित जन माहिती अधिका-यांकडे पाठवावयाचा आहे याची नोंद घ्यावी.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. ३१ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००८/रामाआ/अपील/सीआर २२९/०२

सौ. पुष्पलता दादासाहेब लगड -- अपीलार्थी
ओमसाई निवास, हनुमान नगर,
दौंड रोड, अहमदनगर, ४१४ ००६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त -- उत्तरवादी
नाशिक विभाग यांचे कार्यालय, नाशिक.
२. जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक
विक्रीकर सहआयुक्त नाशिक यांचे कार्यालय,
नाशिक.

*- --विवेचन---*

सौ. पुष्पलता दादासाहेब लगड, अहमदनगर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी, विक्री कर सह आयुक्त कार्यालय नाशिक यांचेकडे दि. २२/११/२००५ च्या अर्जान्वये त्यांच्या पतीची बदली अहमदनगर येथून जळगांव येथे का व कोणत्या कारणास्तव केली याबाबतची माहिती मागविण्यात आली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (जे) नुसार नाकारली होती. त्याविरुध्द अपीलार्थीनी दि. २/११/२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी विक्रीकर सह आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि. २/२/२००६ च्या आदेशान्वये अपीलार्थींनी मागितलेली माहिती देण्यात यावी असे आदेश दिले. ते आदेश विचारात घेवून जन माहिती अधिकारी यांनी दि. ३/२/२००६ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती दिली.

सदर माहितीने समाधान झाले नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि. २३/९/२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती त्यास अपीलार्थी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते.

अपीलार्थी यांचा माहितीचा अर्ज पाहता असे दिसते की, त्यांनी त्यांच्या पतीची आस्थापनाविषयक माहिती मागितलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशान्वये अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. त्या माहितीत कागदोपत्री जशी वस्तुस्थिती (बदलीची कारणे) होती तशी दर्शविलेली आहेत व माहिती अधिकार अधिनियमाखालील कार्यवाही त्यामुळे पूर्ण होते. त्यांतील कारणमिमांसा जर मान्य नसेल तर प्रशासकीयरित्या त्यांनी दाद मागावी.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. ३१ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ /अपील क्र. ३३६९ व ३३७०/०२

श्री. संदिप महादेव डोंगरे, ------ अपीलकर्ता
३०, डोंगरे निवास, जयभिम नगर,
पोस्ट भगवान नगर,
नागपूर - ४४००२७

विरुध्द

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, ------ उत्तरवादी
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत,
म. गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१
२. जन माहिती अधिकारी तथा उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत,
म. गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१

विवेचन

श्री. संदिप महादेव डोंगरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यांकडे दि. १७.०९.२००७ च्या अर्जान्वये "अधिव्याख्याता (चित्रकला व रंगकला) दि. ६ ऑगस्ट २००७ रोजी झालेल्या मुलाखतीबाबत " माहिती विचारली होती. अपेक्षित कागदपत्रे प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन श्री. संदिप डोंगरे यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडे दि. ६.११.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलाची सुनावणी दि. २३/११/२००७ रोजी आयोजित करण्यात आली. परंतु श्री. डोंगरे हे उपस्थित राहिले नाही. तद्नंतर लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात दि. ७/१२/२००७ रोजी याबाबत सुनावणी घेण्यांत आली. या आदेशाची प्रत दि. २९/१२/२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपीलार्थी श्री. डोंगरे यांनी नमूद केले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशाने व्यथित होवून दि. १४/१/२००८ रोजी

अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाचे मुख्यालय व नागपूर खंडपीठाकडे प्रत्येक एक द्वितीय अपील दाखल केले. या दोनही अपीलांमधील मागणी (prayer) सारखीच आहे. या अपीलांची सुनावणी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित करण्यात आली होती.

द्वितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलकर्ते श्री. संदिप महादेव डोंगरे यांना नागपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये व्हीडीओ कॉन्फरन्ससाठी बोलावून ही सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील जन माहिती अधिकारी श्रीमती. मिरजकर या राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील मुख्यालयात उपस्थित होत्या. सुनावरणी दरम्यान अपीलकर्ते श्री.डोंगरे संबंधित अधिकारी यांचे तोंडी जबाब व उपलब्ध कागदपत्रांचा साकल्याने विचार करण्यात आला.

श्री.डोंगरे यांना माहिती नाकारण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे माहिती त्रयस्थ पक्षाची असणे होय. त्यातही एका उमेदवाराच्या अनुभवाच्या दाखल्याबाबत शंकास्पद परिस्थिती असल्याचे श्री.डोंगरे यांनी यावेळी सांगितले. हे कागदपत्र शंकास्पद असूनही त्या उमेदवाराला नोकरी मिळाली असे त्यांनी पुढे नमूद केले. यावर जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केल्यानंतर अशा उमेदवाराच्या जातीच्या, अनुभवाच्या इ. दाखल्यांची पडताळणी संबंधित विभागाने करावयाची असल्याचे व तसे करणे त्या विभागाचे काम असल्याचे आयोगास सांगितले.

असे जरी असले तरी त्रयस्थ व्यक्तीने दिलेली माहिती इतरांना देताच येत नाही असे नाही. त्या त्रयस्थ व्यक्तीला लोकसेवा आयोगाने त्यांनी सादर केलेला अनुभवाच्या दाखल्याची प्रत अपीलार्थीस देण्यास कांही हरकत आहे कां असे विचारावे व त्यांचे म्हणणे विचारात घेवून अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्यावर निर्णय घ्यावा व तो अपीलार्थीस कळवावा.

---आदेश--

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १ महिन्याचे आंत वरील कार्यवाही पूर्ण करुन अपीलार्थीस कळवावे.

(डॉ. सुरेश वि. जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दि. ३१ डिसेंबर, २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक रा.मा.आ-२००८/३३३३९/अपील क्र ३०६७/०१

श्री. निळकंठ विनायक जोशी -- अपीलार्थी
ब्लॉक नं. ३१८, ३ रा मजला,
सिध्देश्वर को.ऑप.हौ.सोसायटी,
सिध्दार्थ नगर, अलियावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१

विरुध्द

१. उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी -- उत्तरवादी
ना.क्षे.क्र.म. बृहन्मुंबई, प्रशासकीय इमारत,
५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१
२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
ना.क्षे.क्र.म. बृहन्मुंबई, प्रशासकीय इमारत,
५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१

*---विवेचन---*

श्री. निळकंठ विनायक जोशी, मुंबई यांनी माहितीचा अधिकार्र्इर अधिनियम २००५ च्या कलम १९(३)अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. ४/१०/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

मा. मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छाधिकारातील सदनिका वाटप संदर्भात संबंधित संचिका क्रमांक सी/युएलसी/क्र.८/१०/वाटप /१९७८/९७ या संचिकेच्या सर्व कागदपत्रांच्या नकला मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अपीलार्थीनी माहितीचा अर्ज केला होता. यामध्ये अपीलार्थीना प्रामुख्याने गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या दि. ६/८/१९९७ च्या पत्राची प्रत अपेक्षित होती. जन माहिती अधिका-यांकडील संबंधित संचिकेमध्ये सदर पत्राची प्रत नसल्यामुळे ती अपीलार्थींना मिळू शकली नाही. प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

याच विषयासंदर्भात अपीलार्थींनी आयोगाकडे आणखी एक अपील दाखल केले आहे. दोन्ही अपीलांचा (अपील क्र. ३०६६ व अपील क्र. ३०६७) विषय एकच असल्यामुळे तसेच त्यातील बाबी एकमेकांशी निगडीत असल्यामुळे या दोन्ही अपीलांचा आयोग येथे एकत्रितपणे विचार करत आहे.

उपस्थितांचे म्हणणे ऐकल्यानंतर व आयोगाकडे सादर झालेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर सदर प्रकरणाच्या खालील बाबी स्पष्ट होतात.

अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या दि. ६/८/१९९७ च्या पत्रान्वये मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छाधिकारातील सदनिका वितरणाबाबत अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी ,बृहन्मुंबई नागरी समूह यांना कळवले. अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार त्यांना वाटप करण्यात आलेल्या सदनिकाचा या पत्रात उल्लेख होता. जन माहिती अधिका-यांनी कळविल्यानुसार अपीलार्थींनी संबंधित संचिकेची कार्यालयात जावून पाहणी केली. मात्र त्यांना सदर संचिकेत दि. ६/८/९७ च्या पत्राची प्रत मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी संचिकेमध्ये सदर पत्र उपलब्ध नसल्याने सदर पत्राची अपीलार्थींनी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडे मागणी करावी असे अपीलार्थींना कळवले.

मा. मुख्यमंत्री यांच्या स्वेच्छाधिकारातील सदनिका वितरण हा विषय गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडे वर्ग झाल्यामुळे अपीलार्थींनी दि. ६/८/१९९७ च्या पत्रासाठी नगर विकास विभागाकडे माहितीचा अर्ज केला. यासंदर्भात जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सन २००० मध्ये मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छाधिकारातील सदनिका वितरण हा विषय गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडून नगर विकास विभागाकडे वर्ग झाला. परंतु सदर हस्तांतरण करताना अपीलार्थींच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांची/नस्तीच्या हस्तांतरणाची कोणतीही नोंद मिळत नाही. नगर विकास विभागाच्या संबंधित कार्यासनातही सदर कागदपत्र आढळून आले नाही. तसेच अशा विषयाची नस्ती दप्तरदाखल केल्याची नोंद मिळत नाही. उपलब्ध अभिलेखात अपीलार्थींना अपेक्षित असलेली माहिती नसल्यामुळे तसेच सदनिका वितरणाबाबतची सर्व कागदपत्रे संबंधित सक्षम प्राधिका-याकडे पाठविण्यात आली असल्यामुळे

दि. ६/८/९७ च्या पत्रासाठी अपीलार्थीनी अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी बृहन्मुंबई नागरी समूह यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थींना कळविले. उपलब्ध अभिलेखामध्ये सदर पत्र नसल्याने अपीलार्थींना माहिती देणे शक्य झाले नाही हे विचारात घेवून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील अमान्य केले.

वरील सर्व बाबी पहाता अपीलार्थीना दि. ६/८/१९९७ चे पत्र नगरविकास विभाग व अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई कार्यालय या दोघांकडूनही प्राप्त झालेले नाही असे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी ,नगर विकास विभाग यांनी उपरोक्त नमूद दि. ६/८/९७ च्या पत्राचा व संबंधित नस्तीचा कसून शोध घ्यावा. व आवश्यक वाटल्यास गृहनिर्माण विभागाकडे सुध्दा चौकशी करावी. व कागदपत्रांचा कसोशीने शोध घेवून अपीलार्थीस माहिती द्यावी.

वरील सर्व कार्यवाही हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आंत पूर्ण करावयाची आहे.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

वर दर्शविल्याप्रमाणे संबंधितांनी कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, नाजकधा-३ व जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, नाजकधा-३, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना उपरोक्त आदेशानुसार कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावी.

(डॉ. सुरेश वि. जोशी )

दि. ३१ डिसेंबर, २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त